१०३४
म. ग्रं. सं. ठाणें
विषय इतिहास
सं. क्र. ८८८
REFBK-0005117
REFBK-0005117

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ प्रत. 803

Selection No. 42.

PAPERS REFERRING TO PRATAPSINH, RAJA OF SATARA (1818-1840).

History has so far taken small notice of the resuscitated kingdom of Satara, which was set up by the British Government after the fall of the Peshwas and entrusted to Pratapsinh, then a promising young man about 23 years old, in a formal treaty contracted with him on 25th September 1819. Captain Grant, afterwards Grant Duff, the illustrious historian, was appointed first Resident at the Satara court. The papers here presented are of great historical value, and throw a flood of light upon the somewhat mysterious circumstances which led to the deposition of the Raja. Pratapsinh, after standing in the good graces of the company for eighteen years, about 1837 fell under a cloud and two years later was deposed and banished to Benares (September 4, 1839).

Marathi versions of six letters addressed by Grant Duff to Pratapsinh from England between the years 1829–1833 have been discovered. The two most important of them have been included here, and will convey an idea of the firm mutual friendship and regard that existed between them, long after Grant Duff's retirement at the end of 1822. Pratapsinh was in the habit of ordering curious and fancy articles of western manufacture from England and had left for that purpose large amounts of money with Grant Duff who has rendered in these letters a minute account of all the sums he received from the Raja.

In dealing with the Raja, Captain Grant Duff observed no ceremony but treated him as his younger brother, he himself not being more than about four years his senior. Elphinstone and he had shared with Pratapsinh the dangers and hardships of the last Maratha war, and in consequence ever afterwards felt a warm interest in Satara and its affairs. Almost the first thing which Grant Duff persuaded the Raja to do was to keep a regular record or diary of his daily doings, mentioning in it all important visits, talks, discussions and other incidents. Pratapsinh faithfully carried out this advice and has left a diary in a large number of volumes which have been preserved intact in the Satara section of the Poona Daftar and which are available there for inspection. The diary opens on the Dassera day of 1818 (October 24) and 21 Volumes have been discovered going down to September 27, 1838, i.e. just a year before Pratapsinh was actually deposed. It seems that the ordinary daily routine was entered by a secretary or clerk, while the concluding portions, which are in a different hand and style, appear to be Pratapsinh's own. They often contain private discussions which took place between the Raja and the Resident or during a visit to the Governor or some other notable. Each volume of the diary contains about 300 pages. It would not therefore be possible to reprint all the 21 books : nor are all their contents of equal value. They have been submitted to a careful scrutiny, and representative selections have been made which are here

नो. नं ७२८८
इतिहास ८०३

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

४२

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वतः प्रत
सं. 5 नं. ८०३
ता.
ठाणें.

राजा प्रतापसिंहाची रोजनिशी
व
इतर कागद

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७२८८
ठाणें.

[किंमत—१ रुपया १२ आणे किंवा ३ शिलिंग]

५९९८

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

REFBK-0005117
REFBK-0005117

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

reproduced. These shew that Captain Grant immediately on arrival at Satara undertook two important matters :—his first care was to instruct Pratapsinh in the administration of the state, impressing upon the Raja how he should deport himself in public and private and how he should receive visitors and conduct himself generally in all matters concerning the welfare of himself and his state. Grant's second great undertaking was the collection of material for his History of the Marathas—a task which he seems to have set before himself as soon as his appointment was announced. He instituted for this purpose several points of enquiry in connection with old practices, for instance, the precise meaning and mode of exacting the *chauth*. The entries in the diary show how indefatigably Grant Duff toiled in collecting state-papers and getting them translated for his use. After the period of tutelage was over, the Raja was on April 5, 1822, invested with full powers of administration, and on the last day of the year Grant Duff handed over charge of his office to his successor Captain Briggs, the well-known translator of Firishta's *History of the Dekhan* and a scholar like his predecessor, and retired to England where he settled down to the task of writing his monumental work.

The Raja freely mentions in the diary the talks and discussions he held with the British Residents and Governors, and explains with what eagerness he learned from them news of important events in Europe. Mountstuart Elphinstone, the Governor of Bombay, continued to receive good reports about the Raja from Satara and was relieved at the success of an experiment about which he had had grave doubts at the start.

Pratapsinh was a strenuous upholder of the antiquity of the Bhonsle clan, and zealously maintained his descent from the ancient solar family of Udaipur, claiming for himself all the rights and privileges of a Kshatriya. This deeply offended the susceptibilities of the orthodox Brahmins of Wai and Poona, who found in Balajipant Natu, the permanent native assistant to the Resident, a staunch supporter of their cause. Pratapsinh obtained special permission to send his emissaries to Udaipur to make enquiries about his ancestral connections. He met with a ready response from the Rana, who dispatched to Satara Dipavijaya Kaviraj, his family priest, in October 1822 with authentic genealogies and papers supporting the blood relationship of the Bhonsles with the Udaipur line. An exchange of letters and complimentary presents long continued between the two courts. Later on Pratapsinh sent his private agents to Udaipur in order to negotiate a marriage between his daughter and a member of the Rana's family. This proposal however fell through, and the only upshot of the negotiations was the bitter communal tension that was left behind. The Brahmin party refused to perform Vedic rites for the Raja and his favourites, the Prabhu Chitnises, and thus created a commotion which, although only social and religious in the beginning, soon assumed a factious and acrimonious aspect, ultimately to the great detriment of the Raja himself. The incident which actually started the trouble between the Raja and the Company was a dispute about the control of the six Jagirs mentioned in the Treaty of Pratapsinh's installation, but his claim

of equality with the solar race of Rajputana is an indication of the growth of a proud temper which, after the removal of the restraining influence of his mentor, Grant Duff, led the Raja to break with the British authorities.

Another important paper containing a questionnaire on the origin, status and condition of serfs, both male and female, in the Deccan, and the replies obtained after prolonged enquiry, will be read with interest by students of social history.

Yet another important incident fully recorded in these papers is the foundation of the Sanskrit College at the Vishrambag, a Government Notification concerning which appeared on 21st August 1822, with full details about the control and regulation of the institution, which was formally opened on 1st October 1822 and which later developed into the famous Deccan College of Poona.

Various other affairs are occasionally dealt with in these papers, such as the rebellion of Umaji Naik which was crushed in 1830. About the year 1836, when Sir Robert Grant came as Governor of Bombay, the cordial relations which had till then existed between the Raja and the Company began to undergo a gradual change. Col. Lodwick, the Resident of Satara, had a most delicate part to play, advising the Raja on the one hand to abandon his unyielding attitude and assuring the Bombay authorities of the groundlessness of their suspicions about the Raja's loyalty. Timely submission on the part of the Raja would possibly have saved him, but his defiant spirit refused to submit to this indignity, and as a result he had to undergo the ignominy of deposition and banishment. He sent five agents to England to represent his grievances before the home authorities, and the last few letters describe how these agents were stranded in a foreign land destitute of money or other means of subsistance. The full and authentic life story of Pratapsinh remains to be written, and it is hoped these papers will be found to be of some assistance, should the biography of this unfortunate prince be undertaken at some subsequent date.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ प्रत. क्र. 5-८०३ ता. ....
नोंद क्र. २८८

No. 1] [8-10-1818

"छत्रपति प्रतापसिंह यांचे रोजनिशींतील उतारे."

स्वस्ति श्रीराज्यभिषेक शके १४९ बहुधान्यनाम संवछरे शके १७४० सुा तिसा आशरीन मयातैन व अलंफ माहे जिल्हेज ऊर्फ अश्विन मास मुाा सातारा.

१ शुध्ध नवमी गुरुवार दसऱ्याकरिता ग्रांट बाहादूर तिसरे प्रहरी येऊन स्वारीबराबर पलटणचा बेत ठराऊन गेले. त्या समई सचिव मंत्री यास पोषाख द्यावयाचे आहेत त्यावरून ग्रांट यानी उतर केले की द्यावे व ते देतील ते घ्यावे, याप्रमाणे तीन कलमे ठराऊन गेले. त्याप्रमाणे केले. कलम.

¶*Captain Grant talked over with Pratapsinh the arrangements and position of the British troops on the following Dassara procession.*

वा. क्र. ३११८

[9-10-1818

१ शुध्ध १० भ्रगुवार विजयादशमीचे दिवसी श्वारी ठरविल्याप्रमाणे सीमा उलघनास जाऊन अली. नंतर नजरनजराणा, ब्राह्मणाचा असीर्वाद व कारकूनमंडलीचा जाहाला. मराठे यापैकी बाल्याबा भोसले व दाजीबा माहाडीक या उभयतांचा जाला. बाकी मराठेमंडलीचा जाला नाही.

¶*The procession of Pratapsinh and his Darbar on the occasion of the Dassara is described.*

[12-10-1818

१ शुध्ध १३ इंदुवार नित्यानेम करून कचेरीस आलो तो ग्रांट याकडील चोपदार आला तो नारायणराव व आम्ही बसलो होतो. चोपदाराने विनंती केली की, ग्रांट येतात. येणे असे बोलली, तो आले. मग बोलिले की माहाराजानी जे नित्यावृत होईल ते वहीवर ल्याहावे व कारभारी कोण करावा. मग आम्ही उतर केले की तुम्ही वाकबगारी, विठलपंतास करावे. मग ते व आम्ही मिलोन चालऊ. बरे आहे असे बोलले. लाट साहेब याचे हताखाली आलपिस्तन, त्याचे हाताखाली तुम्ही. त्यास त्या दोघाचे ठिकाणी आम्हास तुम्हीच अहा.

¶*Captain Grant visited Pratapsinh and advised him to keep a diary of his daily work. It was agreed to appoint Vithalpant Fadnis as Diwan.*

[14-10-1818

१ शुध १९ बुधवार ग्रांट येऊन बोलले की, शुक्रवारी भोजनास सारे साहेब लोक मागील तीन घटका दिवस राहाता येऊ. याप्रमाणे बेत करून गेले.

A dinner to Captain Grant and other English gentlemen was arranged on the following day.

[17-10-1818

१ वद्य ३ शनवार नित्यनेम करून हिसेब पाहात बसलो तो विठलपंताचा निरोप आला की बेत चांगला राखावा. दस्तुराप्रमाणे सारा बेत जातीने पाहून तयारी जाहाली. मग माईसाहेबास बोलावयास भिकू मुलगा जाऊन घेऊन आला.

[24-10-1818

१ वद्य १० मंदवार नित्यानेम करून नंतर ग्रांट येऊन बोलिले ती कलमे. वाकब व्हावे. गावचे पाहाणे व शेते व जमाखर्च पाहावा. दाजीबा उपाधे यानी आम्हाकडे दो चौ रोजा येत असावे, त्यावरून दाजीबाची ग्रांटाची भेट करून दिली. बालाजीपंत येक वेळा भोजनास यावयाविसी ग्रांटास बालाजीपंतास सागणे ऐसे बोलिलो. बरे आहे म्हणोन बोलले. आम्ही बालिलो, ती कलमे आम्ही वाकब नाही. तुम्ही वाकब करणे, आम्हापासी मनुष्य नाही. आमचे विश्वासूक विठलपंत आहेत आसा कोणी नाही. तुम्ही त्यास वाकब करणे. आमचे राज्य दिवसोदिवस वाढे असे तुम्ही व इलपिस्तन यानी करूंन देणे. बरे, होईल असे बोलिले. आम्ही बोलिलो की तुम्ही व अलपिस्तन येथून गेला तरी तुम्हास व अलपिस्तनास जाणतो. बाकी आम्हास कोणी ठाऊक नाही. मग बहुत चांगले ऐसें बोलिले.

¶*Captain Grant advised Pratapsinh on various points of administration.*

[26-10-1818

१ वद्य १२ सोमवार नित्य नेम करून आस्ती कासीस पाठवावयाच्या ठराऊन बरावर खर्चास रुा ५०० पाचसे त्याजबरावर चतरसिग भोसले याच्याहि अस्ती बरावर देविल्या.

¶*Pratapsinh despatched the remains of his father and uncle to be immersed into the Ganges at Benares.*

शके १४६ बहुधान्यनामसंवछरे सुा तिसा अशरीन मयातैन व अलफ माहे जिलेज छ ता माहे मोहरम छ ऊर्फ कार्तिक मास मुा सातारा.

[30-10-1818

१ शुध्ध प्रतिपदा शुक्रवार. नित्यानेम करून रंगमाहालात माईसाहेब याकडे वोवाळणी मोहरा पाच व सतका रुा २, वाड्याकडे मोहरा २ सतका रुा १, बाईसाहेब मोहरा २ दोन सतका रुा १, जिजीसाहेब मोहरा २ सतका रुा १ येकूण मोहरा तेरा व रुपये पाच. नंतर ग्रांटाकडून येसोबा आले. त्यानी सांगितले की, ग्रांट येतात. नंतर आले, आणि जमा-खर्चाची वही सरंजामे यांची दाखविली. वहीवर जमा माहाराजाचे नावे केली. तकसीरदार याचे पारपत्याचे व फासी देण्याचे पर्याय बोलिले. नंतर वाकबगारीचे पर्याय कोणी फिर्याद केली तरी लागलीच जफ्ती करू नये. चौकसीने करावे व माहाराजाचे हातास मुल्लक जलद आला, तर चौकसी नीट ब्राह्मण लोक करणार नाहीत. माहाराज दस्तूर चांगला समजो लागले व कंपणी सरकार इतलाने करणे ते कळऊन करावे म्हणजे काम दुरस्त होईल व ब्राह्मण लोक पैकाहि खाणार नाहीत. कलम.

¶*Captain Grant initiates Pratapsinh into administrative details.*

१ शुध्ध ३ रविवार. नित्यानेम करून बालाजीपंत वगैरे श्रेष्ठ मंडलीसुधा फराल करून कचेरीस स्वारी येऊन बसली. नंतर बालाजीपंत व विठलपंतसमेत खासा स्वारी वर खोलीत बोलत बसली. बालाजीपंत बोलिले किले सारे पाडावे. आम्ही उतर केले की, प्रतापगड देवीची जागा व परली गुरूची जागा हे दोनी न पाडावे याप्रमाणे उतर केले आथवा इलपिस्तन याचे विच्यारास येईल तैसे करावे. किले न पाडावे याची नावनिसीची याद विठलपंतास ग्रांटासी बोलावयाची दिली, बिा :— किले सातारा व प्रतापगड व परली व प्रचितगड व केळजा येकूण पाच किले न पाडावे. बाकीचे पाडावे. पाच किले याचे संरक्षणास पाचसे सिबंदींत सांभाळतो. हा विच्यार दाजीबा उपाधे व नारायणराव यास विच्यारला. आम्ही बालाजीपंतासी किलेप्रकर्णी उतरे केली ही ठीक किंवा कसी? दोघानी उतर केले ठीक आहे.

¶........*Balajipant Natu suggested to Pratapsinh that all the forts in his territory should be dismantled. Pratapsinh desired that Satara, Pratapgad, Parli, Prachitgad and Kelanja may be saved.*

7313

[10-11-1818

१ शुध्ध १३ मंगलवार. रपेटीस जाऊन अलियावर नित्यानेम करून बसलो तो ग्रांट आले. त्यास पुसले त्यानी सागितले की, स्वारी माहुलीस जाऊन राहू नये. तोफेबराबर स्वारी मात्र तयारी आगोधर आसावी. दुसरे बोलणे बोलले की गावची वाकबगारी आसावी. हिसेब वहीवर येक हातचा करून ध्यावा व वसूल कसा करावा, काही येक गोष्ट इलपिस्तन पुसतील की वाकब कसे आजपरयंत जाहालेत. याजकरिता वाकबगिरीची सावधगिरी असावी. काही राज्यकारण माहाराजाकडे अले किंवा नाही? येक दो रोजात अले नसले तरी येईल कळावे. आणिक बोलले की बंड जाहाले आहे तरी माहाराज लढाई करतील की नाही. आम्ही उतर केले की ते वेळेस जे होईल ते खरे. नंतर विठोबा बोलिले की लढाई बाजीरायाचे प्रसंगीं पाहिली आहे. पुढेहि घेतील. नंतर ग्रांट बोलिले की जे वेळेस संकट कंपिणी सरकारास पडेल ते वेळेस दोस्तीकारिता दुसमानावर गेले पाहिजे. त्याजवर उतर केले की हे खातरजमा दिवसोदिवस होईल ती कंपिणी सरकारने पाहावी ऐसे आमचे बहुत मानस आहे. याजवर ग्रांट बहुत खुसी जाहाले. ग्रांटाची वडील बहीण विलायतेस होती ती मेली यास्तव बहुत खट्ट होते. नंतर ताबूद पाहून मंजमदार याचा मार कचा विठोबानी ग्रांटास समजाऊन ग्राटानी उतर केले की माहाराजानी नीट केले हे ठीकच आहे. याप्रमाणे बोलणे जाहाले हे विठोबानी येऊन कळविले. नंतर निद्रा जाली.

¶*Captain Grant initiating Pratapsinh into the administration, asked him whether he would fight for the British Raj. The latter showed his great willingness to do it.*

शके १४६ बहुधान्यनाम संवछरे सुा तिसा अशरीन मया तैन व अलफ माहे मोहरम छ ताा माहे सफर छ ऊर्फ मार्गसीर्ष मास मुकाम सातारा

[15-12-1818

१ वद्य ३ मगलवार विठोबानी ग्रांटाचे बोलणे सांगितले की अलीपिस्तन बहुत खुसी जाहाले: माहाराजाचे फार चांगले होईल. पाटणकर यास माहाराजानी येऊ देऊ नये. याप्रमाणे ग्रांटाचा निरोप कळविला आणि निरोप घेऊन गेले.

¶*Pratapsingh was informed by Captain Grant that Elphinstone was highly pleased with him.*

मराठी ग्रंथ संग्रहालय I. ८०३
मराठी ग्रंथ संग्रहालय ८२०८

पौष मास मुकाम सातारा.

[5-1-1819

१ शुध्द ९ मंगळवार. बाळाजीपंत बोलिले की जगदेवराव पाटणकर यास दोन रोज येऊ देऊ नये म्हणऊन कळविले, परंतु आज आले होते व खेडचे बागेतहि आले होते. धनुर्मासाचे दिवसी घोडी फेरत ते समई आले. त्यानी येऊ नये ऐसे असोन ते ऐकत नसल्यास कैद करू. आम्ही इजा देणे हे ठीक नाही. इंग्रजासी ठरले यात अतर केले म्हणजे तह बिघडतो ऐसे होते. हे मनांत वागऊन चालावे. नंतर वासुदेव माहाजणे यास ताकीद केली की तुम्ही जाऊन पाटणकर यास सागावे की तुम्ही निवोन जावे. त्याप्रमाणे वासुदेव जाऊन सांगून आला. त्याचा निरोप सांगितला की बाळाजीपंत व विठलपंत याची भेट घेऊन आज्ञेप्रमाणे उदईक जाईन. नंतर बाळाजीपंत गेल्यावर भोजन करून निद्रा जाली. कलम.

¶*Jagdevrao Patankar was prohibited from visiting Pratapsinh.*

[16-1-1819

१ वद्य ९ मंदवार. नित्यानेम सारून रंगमाहालात माईकडे भोजन जाले. तिरंदाजी खेळून घोडी फेरोन स्वारी आली. नंतर विठोबापासी मकरसंक्रमणाचे तीळ पाठवावयाचे त्याची याद दिली होती. त्याचे ग्रांटानी सांगितले की इलपिस्तनास व जरनेल इस्मितास मात्र पाठवावे. बाकी कोणास न पाठवावे. सरकारपदरचेहि कोणी असले तर पाठऊ नयेत. वारंवार हे तुम्ही आम्हास पुसू नये. आझूण दाहा महिने जाले, आमचे दस्तूर माहीत नाहीत हे काय? हे माहाराजाचे मनात व तुम्ही पदरचे मंडळीचे मनात वागत नाही. याने आमचे हातून बरे होणार नाही. तुमचे पदरचे आहेत ते बडेसाहेब इलपिस्तन तुम्हाकडेसच लाऊन देतील. सारे नीट होईल. हाली काही ऐसे पुसले तर याची धोरणे वेगळी आहेत. तुमचे बरे होईल ते मी करीत आहे. याप्रमाणे माहाराजास सागून ठेवावे व मीहि आणिक सांगेन. बाकी कामे विठोबानी पुसली नाहीत. याप्रमाणे मजकूर ऐकोन घेऊन भोजन करून निद्रा केली.

¶*Captain Grant advised that the customary present of sesamum seeds should be sent only to Elphinstone and General Smith and to no one else.*

[21-1-1819

१ वद्य १० गुरुवार नित्यानेम करून माहुलीस सर्व मंडळीसमेत भोजन करून स्वारी माघारी आली. येतेसमई वाटेस बाळाजीपंत नातू भेटले. आज

माहुलीस जाण्याचे कारण ऐकिले, की पनाळकर याचे गुरूचे लेक भाऊ माहाराज वकिलीस पुण्यास जातात. ते माहुलीस आले सबब नातू भेटीस जातात. ते प्रतिनिधीकडीलहि सरंजामाचे बोलणे बोलणार व पनाळकराकडील इंग्रजासी बोलावयाची वकिली त्याजकडेस आहेच. येक साहेब याने चपरासी याचे विद्यमाने बकरे घेतले त्याचे किमतीत चपरासी याने लबाडी केली. दोन रुपये धणगरास दिल्हे व दोन रुपये मधी घेतले. हे ग्रांटास कळले म्हणोन त्या चपरासीयास येक जागा कमच्या पाचसे मारल्या.

¶*Balajipant Natu visited Pratapsinh on his way to Mahuli.*

[22-1-1819

१ वद्य ११ शुक्रवार नित्यनेम करून नारायणराव याजपासी बसोन हिसेब रुजू करून माईचा समाचार घेऊन आलो तो ग्रांट आले, आणि तपसील बोलले की माहाराजाचे स्वाधीन राज्य व्हावे आणि माहाराजानी काही वाकब व्हावे. आम्ही बोलली की ठीकच आहे. नंतर वादप्रतिवादे याचा मजकूर माहाराज कसा ठरवितील? आम्ही उतर केले की जाहिरनाम्यात लिहिले आहे चाल ती वहिवाट ठेऊन वादेप्रतिवादे याचे मनास आणीत जावे. ग्रांटानी उतर केले हेच लक्षी ठेऊन काम करावयाची तजवीज मनात राखीत जावी. नंतर परलीस जावयाचे विच्यारले. त्याचे उत्तर केले की, माहाराजाचे मरजीस येईल तेव्हा जावे.

¶*Captain Grant advised Pratapsinh to make himself quickly conversant with administrative details.*

माघ मास मुकाम सातारा

[6-2-1819

शुध्द १२ मंदवार आपासाहेबास भ्रम पडून वाखा बहुत जाहाला म्हणोन समजले, तो मागाहून येक हुजऱ्या अला. त्याने सांगितले कीं उतार पडला. याप्रमाणे कळले. नंतर येऊन त्याचा समाचार घेऊन आलो. तो ऐकले कीं बाबूराव कात्रे याजकडे बाजीराव याचा ऐवज होता तो त्यानी कळविला नाहीं, सबब इंग्रजाचा तगादा बसला आहे. याप्रमाणे वर्तमान ऐकोन नंतर रात्रौ भोजन करून निद्रा केली.

कलम

¶*Shahji Appasaheb became suddenly ill but soon got better.*

[7-2-1819

१ शुध्ध १३ रविवार. ग्रांट येऊन परलीचे कामावर उछाहाचे बंदोबस्तास चितोपत भाटे नेमले. ग्रांट बोलिले कीं फार जपावे. फितूर व बंडवाले लोक जमा जाले आहेत, याकरिता चौकसी आसावी. बंडवाले लोक फार जमा होऊन दगा करितील याकरिता सावधगिरी आसावी.

¶*Captain Grant warned Pratapsinh against rebels on the occasion of the celebration of Dasnavami at Parli.*

[13-2-1819

१ वद्य ४ मदवार बालाजीपंत नातू येऊन ग्रांटाचा निरोप कळविला की इलपिस्तन यास विलाइतेहून किताबत गोरनर जनराल म्हणौन आली आहे. ही घराऊ बातमी आहे. सरकारी बातमी आली म्हणजे प्रशस्त समजेल. याप्रमाणे सागोन निरोप घेऊन गेले.

¶*A false report was heard that Elphinstone was appointed Governor-General.*

[16-2-1819

१ वद्य ७ मंगलवार विठोबा येऊन बोलले की ग्रांटानी मामलेयाचे कामावर व कोतवालीचे कामावर कारकून आज तुम्हाकडील द्यावे. दुसरे ग्रांटाचे म्हणे सरकारचे पंधरा स्वाराचे काम बाल्याबा भोसले यास सांगावे. स्वारानी येक दस्तुराची पागोटी व आंगरखे घालावे याप्रमाणे सांगितलें आहे. नंतर कारकून समई जावयाजोगे नाहीत याजकरिता राहिले. रामसिंग शहरचे कोतवालीवर चांगला म्हणोन पाठविला. ग्रांटानी रामसिंगास पुसिले की आजपावेतो कोठे कोठे रोजगार केलेत. रामसिग बोलिला की लाहाणाचा थोर येथे जाहलो. पाच सात वर्षे चाकरी गोखले याचे जवळ केली. नंतर त्यासी काही बोलले नाहीत. विठोबासी बोलले की ऐसी माणसे तुम्ही किती ठेविली? त्याचे उतर विठोबानी केले की याद पाहून सांगतो. ग्रांट बोलिले की ऐसी माणसे ठेवणे हे चांगले नाही. त्याचे उत्तर विठोबानी केले की बाजीराव याचे चाकरीवर ऐसे बहुत होते. नंतर येऊन बालाजीपंतासहि मजकूर बोलोन आम्हास समजाविला. नंतर भोजन करून निद्रा जाली कलम.

¶*Captain Grant discussed with Pratapsinh the appointment of Ramsing as a City Police Officer.*

[17-2-1819

१ वद्य ८ बुधवार. नित्यानेम करून परलीस जाऊन किल्यावर जाताना सरकारी पालख्यावर व मेण्यावर इंग्रजाचे खाना खावयाचा वोझ्याचा बैल स्वारीस बिचकोन पालख्यावर व मेण्यावर आला. तो चुकोन येका बाजूस गेला. संत्री यानी देवास व तल्यास उपद्रव सिवतासिवत केला. नंतर नरसूस पाठऊन जाहाले ते समजाऊन साहेबाकडून ताकीद केली. कलम.

¶*The report of an ox belonging to the Residency getting loose and doing harm is mentioned.*

१ वद्य ९ गुरुवार नित्यानेम करून देवदर्शन घेऊन आलो. नंतर काल ताकीद करविली अस्ता पुना संत्रीचा देवास उपद्रव लागला व माईचे राहावयाचे जाग्याचे पुढे चौकीचे भिंतीचे आत गेले व देवाचे कोठीवर दगा करून कर्णीक नेली. जाताना देवाचे छबिन्याचे वेळेस स्वारीत खासा असता आले. दुसरे बोलिले याजकरिता त्याचे आंगावर धावले आणि म्हणो लागले क़ी आम्हास मरिले ऐसी गिला केली. नंतर संत्रीचा सुभेदार बोलाऊन ताकीद करविली, परंतु संध्याकाली ब्राम्हणाची पात्रे बसतात तो येक संत्री मधोन गेला. सरकारचे माणसानी धरोन त्याचे सुभेदाराकडे न्यावयास लागले तो दाहा पंधरा आसामी संत्री जमा होऊन हिसकोन नेऊ लागले. परंतु सरकारचे लोकानी सुभेदार याचे हवाला केला.

१ वद्य १० शुक्रवार नित्यानेम करून देवदर्शन घेऊन आलो तो संत्रीचे बोभाट बहुत जाले, सबब साहेबाने नरसूस बोलाऊन नेले आणि बोलिला की हे बोभाट आले याची रुजुवात करावी. नंतर नरसू बोलिला की रुजुवात मिळोन संत्री बोलतात बोभाट नाही. आम्ही बोलतो हे खरे. हे आपले मनात आल्यास पाहावे. संत्रीचा बोभाट आहे किंवा नाही, काल संत्रीस धरून सुभेदार याचे स्वाधेन कसे जाहाले हे पाहावे. नंतर साहेब संत्रीस रागे भरून सुभेदारास ताकीद केली.

वद्य ११ मंदवार नित्यानेम करून तीन रोज यात्रा सालाबादीप्रमाणे येऊन गेली. गलबला यात्रेचा जाहाला नाही. इंग्रजाचे स्वार पाई येणार त्यास हत्यारे घेऊन येऊ नये हे साहेबाने सांगितले. त्याजवरून बिन हत्यारी घेतले.

[23-2-1819

१ वद्य १४ भोमवार नित्यानेम करून ग्रांट आले. बोलिले की रामसिंग शहर कोतवालीवर ठेवावयाचा नाही. गोखले याजपासी फार दिवस राहिला

याजकरिता. नंतर ग्रांटासी उतर केले की हा आमचे खातरजमेचा आहे. लाहाणाचा थोर येथे सरकारात जाहाला. त्यास राजू कोतवाल गुरुवार पेठेचा याजकडे कोतवाली सांगितली. त्याचे हाताखाली रामसिंग द्यावा. ग्रांट बोलिले की हाताखाली दिल्हा तर बबरा होईल, ठीक नाही. विठलपंत माहाराज आपल्यास कचे आम्ही जे दस्तूर माहीत करावयास सागतो ते करितात की नाही? त्याचे उतर केले की करतात. नंतर स्वार बाल्याबा भोसले लहाण आहेत, परंतु हुशार व माहाराजाचे हितास चागले. परंतु किरकोल काही आम्हास बोलावे लागेल त्याचा त्यास राग आला म्हणजे माहाराजासहि राग येईल, सबब काम चालवावयाचे कसे? आम्ही बोललो की आमचे हिताचे बोलता त्यापेक्षा कंपिणीसिवाय कोणीच नाही तेव्हा राग कश्यास येईल! याप्रमाणे बोलणे होऊन गेले.

[6-3-1819

१ शुध्ध १० मंदवार नित्यानेम करून नाच अयली व बक्षीचा जाहाला. तीस पातल कलबुरगी दिल्हे. नंतर श्रेष्ट ब्राम्हण मेळऊन त्याची संभावना प्रा ब्राम्हणास रुा १ प्रमाणे देऊन भोजन करून दोन प्रहरी निद्रा केली. बायका मंडली बाग पाहून आली. बालाजीपंत नातूस व विठोबास ग्रांट बोलिले की, माहाराजापासी सरे ब्राम्हण मिळोन पैका ब्राम्हणास देवितात. नंतर रात्रौ भोजन करून निद्रा केली.

१ वद्य प्रतिपदा शुक्रवार. नित्यानेम करून दुलवडीचा खेळ, कुस्त्या व गाणे होऊन नंतर दोन प्रहरी भोजन करून घोडी फिरोन मोहिते याचे लग्नास बाजारपेठ्याचे चौकीवर चपरासी दिल्हा. मानसिग याने प्राथ:-कालचे वरदीत कळविले की येक बंदीवान यास फलटणास येथून मध्यरात्री नेला. बराबर स्वार २९ व पायेदल २९ पंचवीस होते. सायंकाली गोपालराव याने सांगितले की पंढरपुरी बडवे याचे घरी ठेव बाजीराव व बापू गोखले याची आहे. त्याजवरून ग्रांटास इलपिस्तनाने लिहिणे पाठविले आहे की, येथून कारकून आला आहे. तो चौकसी करील, तुम्ही करू नये, याप्रमाणे वर्तमान कळविले. नंतर रात्रौ भोजन करून तमाशा जाहाला व बाहेर तमाश्या सर्वास द्रिष्टी पडावयास करविला. नंतर लेहून स्वामीचे क्रियेस खर्चास रुा २०० देविले आणि निद्रा जाली, कलम

१ वद्य २ मंदवार. नित्यानेम करून हिसेब पाहून काही लिहिणे लेहून गवयाचे गाणे जाले. विठोबासी बालाजीपंत नातू बोलले की इलपिस्तन

येणार त्यास माहाराजाचे राज्य माहाराजांचे स्वाधेन केले म्हणजे ठीक आहे. विठोबा बोलले की हे घडविणे तुम्हाकडे आहे. याप्रमाणे बोलणे विठोबानी समजाविले. रात्रौ भोजन करून निद्रा जाली. कलम.

१ वद्य १२ मंगलवार बाजीराव याची बायको कराराप्रमाणें बाजीरायाकडे गेली नाही म्हणोन तिजला लाऊन देण्यास डाकतर गेला.

शके ४६ वैशाख मास मु॥ सातारा

१ शुध्ध ३ मंगळवार इंग्रजानी अशेरी किला घेऊन तेथील लोक व पलटणे जालन्यास आली. तेथें नागपूरवाले भोसले नाहीत. याप्रमाणे वार्ता ऐकिली.

१ वद्य १० बुधवार नित्यानेम करून पंडितराव याचे कंन्येचे लग्न लाऊन स्वारी आली. नंतर पागेचे माईचे वाड्यात ब्राह्मण भोजन जाले. नंतर जाहीरनामे इंग्रजानी लिहिले की हत्यारबंद फिरावे. पहिले न फिरावे म्हणोन जाहीरनामे होते. दुसऱ्याने पंचवीस फिरावे म्हणोन केले. तिसऱ्याने हली पाच्याने तो फिरावे म्हणोन केले.

ज्येष्ठ मास मु॥ सातारा

[*19-6-1819*

१ वद्य १२ मंदवार येक विपरीत ऐकिले की डोंगर गरजले व गांव कापले व उतेरडी पडल्या व सेळीस पोर आठ. बायकोस बोलत होते ते समई हती आकृती पोर पाहाताच मेली, किला कापला, माणसाने माणसे धरली.

आशाढ मास

१ वद्य चतोर्थी सह पंचमी रविवार नित्यानेम करून नंतर आईकले की कछ भोजचा किला व शहर कापून बहुत माणसे मेली व चयनापटणासहि याप्रमाणें जाहालें.

१ वद्य ९ गुरुवार नित्यानेम करून हिसेब लेहून मग ग्रांट विठोबासी बोलले की इलपिस्तनास कोणी समजावले आहे की, माहाराज याजपासी कागद आहेत, परंतु दाखवीत नाहीत. आणिक तो बोलिला की माहाराज लिहितात किवा नाही. तेव्हा विठोबा बोलिले लिहितात, परंतु कारकुनासारखे आताच आज कसे होईल; कारण बाजीराव यानी काही येक

३. ४०३

५२१७८

विद्या सिको दिली नाही, परतु हली लिहितात. नंतर ग्रांट बोलिले की लिहीत असले तरी राज्य आज नाही उद्या हस्तगत होईल. परतु या साऱ्या गोष्टी बाळाजीपंतास कलऊ नका. तुम्हीहि कळू देऊ नयेत व माहाराजानाहि कळऊ नयेत. नंतर सारेच कागद नेऊन दिल्हे. नंतर ग्रांट आबा पारसनीस यासी बोलले की या कागदाच्या नकला तुम्ही येऊन करून देणे

१ वद्य ११ मंदवार सिवाजी माहाराज यास मुद्रा बक्षीस व दिर्लीचे निशाण जाले हे खरे.

श्रावण मास मुकाम सातारा.

[26-7-1819

१ शुध्ध ५ मंगलवार वर्तमान ऐकिले की गुजराथीत गाव डोलले, बेलापूर येथील किल्याचे बुरूज पडले, वृक्ष आहारले त्याचे सेंडे मात्र राहिले. जमीन उकलली. त्यातून पहिल्याने अग्निज्वाला निघाली, मागाहून पाणी निघाले

१ शुध्ध ८ शुक्रवार नित्यानेम करून लिहिणे लेहून ऐकिले की ग्रांटाची तैनात रुा १५००० पंधरा हजार, बारनेट याची तैनात रुा १००० हजार व लिटीण याची तैनात रुा ७०० व बालाजीपंत याची तैनात रुा ५०० व इंग्रजाकडील सरंजाम बालाजीपंतास रुा १२००० बारा हजार व अंगरे याजकडून रुा २००० व पनालकर याजकडून रुा ५००० या प्रमाणे सरंजाम व याखेरीज रुा पाचसे येणेप्रमाणे बालाजीपंताची नेमणूक आहे.

१ वद्य २ शनवार बालाजीपंत नातूस बोलावले ते आले. त्यासी बोलिले की सारे हिंदूचे मनात इंग्रज राज्य घ्यावयास आले नाहीत त्यापेक्षा कोणतीहि आडचण पडू नये. ते बोलिले की आडचण पडणार नाही.

१ वद्य ५ मंगलवार. नित्यानेम करून नंतर लेहून हिसेब पाहिले. नंतर ऐकिले की, गुजराथ येथे येका देवीचे कवच पडले त्यातून रक्त निघाले ते नरमदेस मिळाले. भूमीतून पाणी निघोन घरे पडली, सरप बहुत निघाले. सातारा येथे शनवार पेठेत कावळा बोलला की जागा पाहा व घाटगे याचे मलवडीत गाईचे वासरू बोलिले की कसे करू? गाय बोलिली की च्यार महिन्याने काय होईल ते पाहो. गुजराथ येथे च्यारी दिसेने अग्नि निघोन उज्याला पडला. शंभु माहादेवी देवाचे नाहाणीतून रक्त निघाले. नंतर भोजन करून रात्रौ निद्रा जाली. कलम.

[11-8-1819

१ वद्य ६ बुधवार नित्यानेम करून गोपीनाथ शास्त्री यास आदभुत शांतीचा निर्णय पुसला. तो ऐकिले की, रेटरे येथे येक घोडी तीन रोज पसत होती. तिसरे दिवसी पसेली, सिंगरू जाले. त्यास डोळ्याचे जागा डोळे नाहीत. दोही डोळ्याचे मधी येक डोळा याप्रमाणे ऐकिले.

१ वद्य ७ शुक्रवार नित्यानेम करून बाल्याबाचे आईचे क्रियेवदल भरणी वर्ष-श्राद्ध सुधा रुा ५०० पाचसेपर्यंत खर्च करणे याची याद अलाहिदा आहे.

अश्विन मास मुकाम सातारा

[22-9-1819

१ शुध्ध ३ बुधवार नित्यानेम जालियानंतर ग्रांट येणार म्हणोन त्याचे भालदार यानी कळविले, नंतर आले. दाहा कलमाची तहाची याद त्यानी करून आणून तेच म्हणतात की तुम्ही ठरविली व सारे त्याप्रमाणे चालावे. पंत सचिव व अकलकोटवाले व प्रतिनिधि व डफळे व जानराव निंबालकर वगैरे असी लिहिली. त्याचे तपासिलाची याद आहे ती वाचून दाखविली

१ शुध्ध ५ शुक्रवार. नित्यानेम जालियानंतर बालाजीपंत येऊन तह प्रकरणी बोलनी बोलोन बोलिले, की इंग्रजानी तह ठरविला आहे त्यास रुकार द्यावा. नंतर ग्रांट व बालाजीपंत येऊन बोलिले. आम्ही बोलिलो की, जो कंपिणी सरकारातून तह ठरला तोच काईम. नंतर याद हदीची गाव व प्रांत याची दाखविली. नंतर खुणेकरितां मोर्तब करून चालवावे. पुढे सिका होईल. तहात आमचे नाव चालवावे. दसऱ्याचे मुहुर्ताने मामलेदार व किलेदारास पत्रे आमचे नावाची रवाना करावी. याप्रमाणे ठराऊन गेले.

१ शुध्ध ६ मंदवार. नित्यानेम जालियानंतर बालाजीपंत व ग्रांट आले. त्यानी स्वारीचा बेत विच्यारून उदईक अनंदराव केशरकर याची व ग्रांटाची रुजुवात करून दिली. उदईक जाऊन ग्रांट जसी वाट स्वारी दाखवितील तसी पाहून यावे. बालाजीपंतानी मायना ग्रांटास व विठोबास पुसून मामलेदारास दसऱ्याचे दिवसापासून माहाराज याचे सरकारात कंपिणी सरकारातून मुलूक हावाली जाहाला. त्यास या मोर्तबाचे खुणेने जसी पत्रे हुकूम येईल तसी कामे करणे. तहाची प्रकर्णी बोलणी होणे त्या वेळेस बालाजीपंतास ग्रांट बोलिले की तुम्ही बाहेर जावे. नंतर विठोबास बोलिले की बोलावे. नंतर आम्ही बोलिलो की तहात नाव दोघाचे घालावे. त्यास

आता विठोबाचे घालावे. मग ठरऊन सागू तसे दुसरे नाव घालावयास येईल. याप्रमाणे बोलिलो. नंतर ग्रांट बोलिले की, आम्ही बडेसाहेबास लिहितो. नंतर पंचाइतीवर आमचे तरफेचे दोघे नेमणे आहेत. त्यास बापू सुभेदार पहिलेच आमचे चाकर आहेत. ग्रांट बोलिले की आम्ही बाहेरून एकले आहे चागला म्हणोन. नंतर ग्रांट बोलिले की माहाराजाचे हुकूम खावंद मुखत्यार आहे. परंतु जे करणे ते येथे कंपिणी सरकारचे सरदार राहातील त्याचे मसलतीने केले म्हणजे तेहि माहाराजाचा हुकूम मानूनच चालतील. येविसी काही दिवस माहाराज जसे राज्य करितील तैसे माहाराजाचे हती देतील. पहिल्याने माहाल मुलूक हातात येऊन मग फौज ठेऊन सारे जाहाले म्हणजे घरचे मंडलीसुत्धा व चाकरसुत्धा कमी करणे आथवा ठेवणे ते माहाराज घालवितील व ठेवतील ते ठेवोत. परंतु जो सरदार राहील त्यास कळऊन करावे. तहावर आमचे हातचे रूजू व त्याप्रमाणे इग्रजी लिपीची करार रुजू करून नंतर आमचा सिका विठोबानी केला. ग्रांटाचे मोर्तब ग्रांटानि लाखेचे तहावरचे कागदावर ठोकलें. नंतर ग्रांट बोलिले की लाटाचा तह होऊन येई तोपर्यंत हाच तह. आम्ही बरे म्हटले. प्रतिनिधि जवळ आहे त्यास पोशाख देणे तो द्यावा. बुढण भालदार यास व दाजी नारलकर यास शाला दिल्या व पेमास(?) दुपेटा दिला व भाऊसाहेब यानी पेमास तोडा दिला. नंतर रात्रौ कीर्तन जालियानंतर लेहून भोजन जालियानंतर निद्रा जाली. कलम

[28-9-1819

१ शुध्द ९ मंगलवारचे दिवसी दसरा. नित्यानेम जालेयानंतर भोजने जाली. यानंतर सिलंगणास स्वारी गेली. इंग्रजाकडील पलटणे पायदल याची फयर जाली. पहिले येकवीस बार तोफेचे व मागाहून येकवीस बार होऊन फयर जाली. नंतर स्वारी वाड्यात आली. नंतर सर्वाचे नजर-नजराणे जाले. सोने सांप्रदायप्रमाणे देऊन नंतर अन्याबा चितले व तात्या आभ्यंकर व कृष्णराव यास साडे तीन सनगे देऊन ग्रांटाचे हवाली रुप्याची दऊत व नवे मोर्तब देऊन नंतर रात्रौ भोजन जालियावर उछाहा-निमित्य ललित जाले. श्रीचे प्रसाद घेऊन नंतर निद्रा जाली. कलम.

[29-9-1819

१ शुध्द १० बुधवार सारे पेठ्यास याद हुकुमाची गेली. हुजूर पत्र लिहिणे. लाखोट्यावर श्रीमंत माहाराज नाव पत्रावर नंबर म्हणो नये. पत्र म्हणोन वर आख घालावा. पत्रात येवनी शब्द लेहू

१ आम्ही ग्रांटास सांगितले की माईसाहेब व भाऊसाहेब व आपासाहेब या तिहीतून बळावणे जाले तर जाणे. तो बोलिला की जाईन, परंतु काय बोलावयाचे ते माहाराजानी कलवावे. कलम.

१ माईसाहेब व भाऊसाहेब व आपासाहेब यास येक बाग द्यावी व कुरण येक प्रमाणे व खासगीस लाख रुा पाा द्यावे. कलम.

१ बालाजीपंतास दसरियाचा पोशाख याची सनगे ५ पाच प्रमाणे लावली आहेत. ग्रांट बोलिले की साडेतीचा संप्रदाय, पाच का? मग आम्ही बोलिलो की तुम्ही मेजवानी केली ते वेळेस विठोबास सनगे पाच दिली सबब आम्ही दिली. ग्रांट बोलिले की विठलपंत दिवाण आपले. कंपणीचा कारकून बालाजीपंत सबब साडे तीन. आम्ही बोलिलो की वाईट वाटेल सबब. मग बरे म्हणोन बोलले. नंतर आम्ही बोलिलो की बालाजीपंतास आम्ही आबदागीर किवा पालखी चोपदार चवरी दिली तरी कसे? ग्रांट बोलिले की इंग्रजी चाकरास देऊ नये. आम्ही बोलिलो की वाईट लागेल विठोबास दिली आस्ता सबब. ग्रांट बोलिले की मी बोलतो की मजला चवरी आबदागीर, पालखी द्यावी, माहाराजाचेंहि मनात आहे, परतु न देणे. मी बोलावेसे नाही व प्रथक मेजवानीहि करू नये. कलम.

१ कंपणी सरकारचे मुलकात जी वतने चालत आहेत तसी माहाराजाकडे चालतील. मग पुढे लाटाकडून तहनामा होऊन आला म्हणजे मग पुसून घेणे येईल. याप्रमाणे तुलजापूर व जेजोरी आमचे राज्याबाहेर सबब. कलम.

१ सेखमिरा आमचेकडे येईल किवा कुंपिणी सरकारकडे? ग्रांट बोलिले की फार दिवसाचा चाकर माहाराजाचा सबब येईलसे वाटते; मग पाहावे. कलम.

१ आमचे तीर्थरूप याचे तेरावे दिवसी भूमिदान रुा २०० दोनशाचें उदक सोडले आहे. ग्रांट बोलिले की सारा बंदोबस्त जाला म्हणजे देता येईल.

१ बापू कानूचे काम हस्तगत होऊन आणवावे लेहून. बरे म्हणोन ग्रांट बोलिले.

१ विठलपंताची तयनात रुा ६०० व पालखी बाा १०० पुढे मेहनत केली अस्ता बगावयास येईल रुा ३००, येकूण दर महा रुा १०००. कलम.

१ बलवंतराव भोसले याना इतलाकी स्वार व जातीची तयनात रुा ९०० होईल.

१ बलवंतराव चिटणीस यास तैनात सध्या रुा २००, मेहनत केली तरी १००, येकूण रुा ३००

¶*These are some of the extracts from Pratapsinh's diary mentioning important occurrences in his daily life during the period February to October 1819. They also refer to various points discussed by the Raja with Capt. Grant regarding officials and stipendiaries serving under him.*

No. 2] *[7-7-1819*

"छत्रपति प्रतापसिंह याचे रोजनिशींतील उतारे."

रोजनिसी राजमंडळ सुाा आशरीन मया तैन व आलफ

१ छ १३ रमजान रोज बुधवार प्रात:काली उठोन स्नानसंध्यादि नित्ये क्रम होऊन खोलीपुढे कचेरी जाली. वामन गोसावी याणी सतार वाजऊन दाखविले नंतर निद्रा जाली. त्रितीये प्रहरी ग्राटसाहेब याणी बलवंतराव चिटणीस यास बोलाऊन नेले आणि प्रतिनिधिपद कधी कोणते कारकीर्दीत जाले, पद जाले त्याचे नाव व घालमेल कसी हे पुसिले. प्रल्हाद निराजीस राजाराम कारकीर्दीस चंदीस पद जाले, ते परशराम त्रिंबक प्रतिनिधिपर्यंत लेहून घेतले. सन शक लेहून घेतला. नंतरी पुढे आणखी घालमेली आहेत. बलवंतराव बोलले त्याचे उत्तर केले. पुढील व घरगुती आद्यापि पाहात नाही. तूर्त आमल प्रतिनिधींनी बागा फार चढविल्या वगैरे कारण आहे तितके पाहातो. पुढे प्रतिनिधि कारकीर्द आम्हापासी लागली आहे. नंतर प्रश्न केला की, पूर्वी तुमचे वडील याणी माहाराजाचा घोडा पडिला तो वोढून काढिला. बहुत बहुत कामे केली, बहुत खुसी आहे आम्हास, आणि हाली माहाराजाचा घोडा[1] पडिला तो तुम्ही का काढिला नाही. उतर केले की, आम्ही जवल नव्हतो. यैसे विनोदाचे बोलणे जाले. नंतरी प्रश्न केला की, बाबती व सरदेशमुखी

---

१ या संभाषणाच्या आधी पंधरा दिवसापूर्वी प्रतापसिंह महाराजांचा घोडा पडल्यामुळे त्यांचा पाय दुखावला होता त्याला अनुलक्षून हा विनोद केला आहे.

नये. माहाराष्ट्र शब्द लिहिणे. पेठ्यातील कारकून किल्याचे आहेत त्यास कळवावे लिहिणें. लिहिणे पत्र त्यास श्रीकाराचेवर डिकवावयाची जागा वही चिकटावयाची सबब पत्र रुंद बंदाचे येते त्यास लाहाण बंदी लिहीत जाणे. नंतर रात्रौ भोजन करून निद्रा जाली. कलम.

१ वद्य ३ बुधवार नित्यानेम करून नंतर रात्रौ नाच होणार याजकरिता तरी रात्रौ आपासाहेबास दगा जाहाला नंतर निद्रा जाली. कलम.

१ वद्य ९ मंगलवार बलवंतराव चिटणिसाणी इंग्रजाचे वाड्यातील ऐकिली कलमे. बारनेट बोलिला बाजीराव याचे राज्य इंग्रजी सरकारात आले त्यास सारे फौजेवर येक सरदार आला. कृष्णराव याचा निरोप मुजऱ्यास येण्याची आज्ञा. मी बोलिलो की येणे. नंतर चवदापेठेयात खिलारी फिरावे याप्रमाणे दस्तक द्यावे म्हणोन बारनेट बोलिला. मग विठोबानी सांगितले की "ग्रांट बोलिला की माहाराजाचे मनात येत असेल की हे राज्य आम्हास देत नाहीत. नाव मात्र चालू आहे. असे नाही. माहाराज वाकब जाले म्हणजे आमची मगदूर नाही. सारे माहाराजाचे आहे." नंतर रात्रौ भोजन करून निद्रा जाली. कलम.

१ वद्य ११ गुरुवार आम्ही पुढे आलो तो ऐकिले खचित. आदितवार पेठ बागवानाचे घरापासी माइरे हतीवरील माहुत नरसू आसनातून उडून पडला, वर मागे आपासाहेब होते. माहातास पुसिले की कसे जाहाले? तो बोलिला की चपराक मारिली सारखे जाले. बारनेट बलवंतराव चिटणीस याचे देखत बोलिला की, तात्या अभ्यंकर यास रागे भरला की, तुम्ही कृष्णराव आमची याचे तुम्ही सारी मडली द्वेष करिता, परंतु हे ठीक नाही. आम्ही ग्रांट आला म्हणजे त्यास सांगू. मग तात्या अभ्यंकर बोलिला की मी चुकलो. नंतर येसोबास बोलाऊन सांगितले की आमची मंडली ग्रांटाचे वाड्यात गेली, परतु चितपावन राग करून घालवावयाचे बगतात. येसोबा बोलिला की हे खरे आहे. मग आम्ही बोलिलो की तुम्ही आमचे मंडलीस सुचवीत जावे व मलाहि सुचवावे. हे ग्रांटासहि सुचवावे. नंतर किले सातारा येथून बदोकीचे भारे सात व पडदल्याचे भारे तीन याप्रमाणे खाली आली. नंतर भोजन करून निद्रा जाली. कलम.

[17-10-1819

१ वद्य १३ रविवार. नित्या नेम जालियानंतर ग्राट आले आणि सागितले की, माहाराजानी जसे पाहिजे तसे करावे बागा किनई व पुसेसावळीच्या. नंतर भिकाजीपंत पाईचे लोकाचे काम करीत आहे तो लोक घेऊन येईल त्यातील निवडून घेणे लोक शंभर. नंतर पचाइती प्रकर्णी बोलले की फिर्याद माहाराजानी सर्वाची ऐकावी. पंचाईत पंच करीतच आहेत. स्वार रिसाला दुसरा येणार आहे. त्यास माहाराजानी बारगीर शंभर ठेवावे. ते माहाराजानी नावे योजून याद करावी. आम्ही बालाजीपंतास ठेऊन दोन तीन महिने वसूल मुलकी पाहून येऊ. माहाराजानी आता दोन तीन महिनीयाने वाईचा वसूल वैवाट जाऊन पाहावी. पुढले साली सारी पाहावी. नंतर बोलिला की आमचे साहेब लोकासी आपण कोणतीहि गोष्ट बोलू नये. त्याप्रमाणे आम्हीहि बोलणार नाही. कुसाजी माहाडीक यानी बंड चतरसिंग प्रकर्णी धरून आणले, सबब ग्रांटानी कंपिणी सरकारातून ठराऊन आणिले वर्षासन रुा १५००. नंतर बापू सुभेदार बोलला की परवा वरये येथील माहार मारले. त्याचा मुदा आपले तोडाने मी मारले असे बोलिला नाही म्हणत असता, चवघाचे सईने मारले ऐसे येते, सबब मारला. म्हराठे लोक यानी पूर्वी इजा दिली असे बोलतात सबब काम न सांगावे, ऐसा ग्रांट बोलिला. नंतर रात्रौ भोजन करून निद्रा जाली. कलम.

[18-10-1819

१ वद्य चतोर्दसीसह आमावाश्या सोमवार नित्यनिम करून ग्रांटास पुसली ती कलमे रुकाराची आमचे मरजीची बीाा

१ स्वार शंभर पागेचे ठेवणे पोटी कलमे बीाा

१ जमादार येक ठेवावा	२ दफेदार
१ कारकून	२ पनासात निशान व दोन प्राा
२ भालदार	

येकूण आठ.

१ पायचे लोक निवडून घेणे शंभर, त्यात जमादार गुलाम हुसेन व कारकून येक व ताशा, मरफा, निशाण. कलम.

१ माईसाहेब व भाऊसाहेब व आपासाहेब याणी पाईचे लोक ठेऊ नयेत व ज्याप्रमाणे स्वार स्वारीचे वेळेस लागतील ते वेळेस देणे. कलम.

7325

१ आम्ही ग्रांटास सांगितले की माईसाहेब व भाऊसाहेब व आपासाहेब या तिहीतून बऊावणे जाले तर जाणे. तो बोलिला की जाईन, परंतु काय बोलावयाचे ते माहाराजानी कळवावे. कलम.

१ माईसाहेब व भाऊसाहेब व आपासाहेब यास येक बाग द्यावी व कुरण येक प्रमाणे व खासगीस लाख रुा पाा द्यावे. कलम.

१ बाळाजीपंतास दसरियाचा पोशाख याची सनगे ५ पाच प्रमाणे लावली आहेत. ग्रांट बोलिले की साडेतीचा संप्रदाय, पाच का? मग आम्ही बोलिलो की तुम्ही मेजवानी केली ते वेळेस विठोबास सनगे पाच दिली सबब आम्ही दिली. ग्रांट बोलिले की विठलपंत दिवाण आपले. कंपणीचा कारकून बाळाजीपंत सबब साडे तीन. आम्ही बोलिलो की वाईट वाटेल सबब. मग बरे म्हणोन बोलले. नंतर आम्ही बोलिलो की बाळाजीपंतास आम्ही आबदागीर किंवा पालखी चोपदार चवरी दिली तरी कसे? ग्रांट बोलिले की इंग्रजी चाकरास देऊ नये. आम्ही बोलिलो की वाईट लागेल विठोबास दिली आस्ता सबब. ग्रांट बोलिले की मी बोलतो की मजला चवरी आबदागीर, पालखी द्यावी, माहाराजाचेंहि मनात आहे, परतु न देणे. मी बोलावेसे नाही व प्रथक मेजवानीहि करू नये. कलम.

१ कंपणी सरकारचे मुलकात जी वतने चालत आहेत तसी माहाराजाकडे चालतील. मग पुढे लाटाकडून तहनामा होऊन आला म्हणजे मग पुसून घेणे येईल. याप्रमाणे तुळजापूर व जेजोरी आमचे राज्याबाहेर सबब. कलम.

१ सेखमिरा आमचेकडे येईल किंवा कुंपिणी सरकारकडे? ग्रांट बोलिले की फार दिवसाचा चाकर माहाराजाचा सबब येईलसे वाटते; मग पाहावे. कलम.

१ आमचे तीर्थरूप याचे तेरावे दिवसी भूमिदान रुा २०० दोनशाचें उदक सोडले आहे. ग्रांट बोलिले की सारा बंदोबस्त जाला म्हणजे देता येईल.

१ बापू कानूचे काम हस्तगत होऊन आणवावे लेहून. बरे म्हणोन ग्रांट बोलिले.

१ विठलपंताची तयनात रुा ६०० व पालखी बाा १०० पुढे मेहनत केली अस्ता बगावयास येईल रुा ३००, येकूण दर महा रुा १०००. कलम.

१ बलवंतराव भोसले याना इतलाकी स्वार व जातीची तयनात रुा ९०० होईल.

१ बलवंतराव चिटणीस यास तैनात सध्या रुा २००, मेहनत केली तरी १००, येकूण रुा ३००

¶*These are some of the extracts from Pratapsinh's diary mentioning important occurrences in his daily life during the period February to October 1819. They also refer to various points discussed by the Raja with Capt. Grant regarding officials and stipendiaries serving under him.*

No. 2] [*7-7-1819*

"छत्रपति प्रतापसिंह याचे रोजनिशींतील उतारे."

रोजनिसी राजमंडळ सुा आशरीन मया तैन व आलफ

१ छ १३ रमजान रोज बुधवार प्रातःकाली उठोन स्नानसंध्यादि नित्ये क्रम होऊन खोलीपुढे कचेरी जाली. वामन गोसावी याणी सतार वाजऊन दाखविले नंतर निद्रा जाली. त्रितीये प्रहरी ग्राटसाहेब याणी बलवंतराव चिटणीस यास बोलाऊन नेले आणि प्रतिनिधिपद कधी कोणते कारकीर्दीत जाले, पद जाले त्याचे नाव व घालमेल कसी हे पुसिले. प्रल्हाद निराजीस राजाराम कारकीर्दीस चंदीस पद जाले, ते परशराम त्रिंबक प्रतिनिधिपर्यंत लेहून घेतले. सन शक लेहून घेतला. नंतरी पुढे आणखी घालमेली आहेत. बलवंतराव बोलले त्याचे उत्तर केले. पुढील व घरगुती आद्यापि पाहात नाही. तूर्त आमल प्रतिनिधींनी बागा फार चढविल्या वगैरे कारण आहे तितके पाहातो. पुढे प्रतिनिधि कारकीर्द आम्हापासी लागली आहे. नंतर प्रश्न केला की, पूर्वी तुमचे वडील याणी माहाराजाचा घोडा पडिला तो वोढून काढिला. बहुत बहुत कामे केली, बहुत खुसी आहे आम्हास, आणि हाली माहाराजाचा घोडा[1] पडिला तो तुम्ही का काढिला नाही. उतर केले की, आम्ही जवल नव्हतो. यैसे विनोदाचे बोलणे जाले. नंतरी प्रश्न केला की, बाबती व सरदेशमुखी

---

१ या संभाषणाच्या आधी पंधरा दिवसापूर्वीं प्रतापसिंह महाराजांचा घोडा पडल्यामुळें त्यांचा पाय दुखावला होता त्याला अनुलक्षून हा विनोद केला आहे.

व मोकासा, चौथाई व साबोत्रा, जाहगीर ही वाटणी कसी आहे; आमल कसा घेतात व स्वराज्ये हे काये, याचा आर्थ, मायेने काये? याचे उतर केले जैतापुरी दादा चिटणीस लेहून पुर्जे कागद व माहिती शोध करून आणऊन समजाऊ. तसेच आष्टप्रधान यास वेतन काय? नख्त पोहचत होते की सरजाम वगैरे हे कसे हे लेहून आणावे. सांगितले बरे आहे. उतर केले तो आताच चिठी लेहून आणा बोलले. नंतरी फर्मान पादषाहाचे साल सन कोणतें, किती वर्षें जाली? त्याचे उतर केले की पारसनीस मुनसी आहेत त्यास माहिती दखल आसेल. त्यास बोलाऊन आणा बोललेवरून आबा पारसनीस आणिले. त्याणी उतर केले, पत्रे फारसी फर्मान किल्यावरी आहेत. आणून पाहून सांगतो. नंतर जुनी पत्रे याच्या नकला करून नेल्या होत्या त्या आणिल्या. ठेवाव्या बालाजीपंतासी बोलले. त्याचे उतर बालाजीपंतानी[१] झिडकाऊन केले की, तात्या आभ्यंकरापासी द्या. हे ग्रांटानी यैकून, ये क्या बात म्हणून बलवंतराव यासी बोलले. नकला आणिल्या बहुत खुसी जाली. बरे जलद आणिल्यात. रुमाल सोडून त्यात बांधून ठेवाव्या सांगितल्यावर बालाजीपंत उगेच राहिले. नंतर सांगितले उद्या लौकर यावे.

[8-7-1819

१ छ १४ रोज गुरुवार

नंतर बलवंतराव चिटणीस यास ग्रांटाकडील बोलावणे आलेवरून गेले. दाखला निवडून आणिला, पुसिले. आद्यापि जैतापूरच आला नाही परंतु आमचे मनात माहीत आहे ते बोलू परंतु मुकरर नव्हे, लिहिले येईल ते खरे. बरे आहे. तुम्हांस काल सांगितलें किती, फार सुस्तावा केला. फार नाकारी गोष्ट केली. चिंता नाही. तों फडणीस आले. जे बोलो हेच फार करून लिहिले येईल. त्यावरून लिहिले यादीवर दाखवावे वरून, सरदेशमुखी दाहा रुपये व बाबती आठ रुपये व चौथाई मोकासबाब पचवीस रुपये व साहोत्रा साहा रुपये यो येकूणपनास रुपये व येकावन रुपये जाहागीर यैसे आहे. परंतु चाली येक प्रकारच्या नाहीत. जसा जेथे अमल जबरी तसा साठच्यालिसी घेतला. मोगलाच्या जबरीत च्यालीस देऊन साठ घेतात यैसे तरेने चालले. येक दस्तूर का

१ नातू.

चालला नाही. फार फिकीर आहे. कोणी पुरा माहीत बुढा आहे की नाही शहरात, बोलले. नंतर आबा पारसनीस बोलले बुढ्यास काये माहीत, आमल का बुढा होना. नंतर बालाजीपंत बोलले जे आमात्येपंत याचा कारकून सदासिव भगवंत आहे त्यास आणवावे. कागदपत्र बहुत माहिती त्यास आहे व त्याजवळ आहे त्याजवरून त्यास बोलावणे पाठविले. नंतर स्वराज्य हे काये, याचा आर्थ काये, आमल काये, पुसिले. त्यास उत्तर चिटणीस याणी केले, दरोबस्त आपला अमल जाला त्यास स्वराज्ये म्हणतात. यावरी बालाजीपंतानी वाद घातला की आसे नव्हे. आमल काये सदोबा येईल तो सांगेल. नंतरी ग्रांटानी पुसिले की मोकासा याचे माईने आर्थ काये ? त्याविसी बहुत वेल उठोन वह्या काढून आर्थाचा शोध केला. परंतु आर्थ बसला नाही. नंतरी प्रल्हाद निराजीस प्रतिनिधी कोणते साली जाली, त्याची हिजरी सालानी किती साले जाली, साल कोणते आले हे पुसोन लेहून दिल्हे. नंतर सदासिव भगवंत आले. त्यास पुसिले. त्याणी आनन्वित सांगितले. चौथाईत बाबती वगैरे व स्वराज्यात चौथाई. नंतरी याद फडणिसापासून लेहून देविली, की इतके दाखले कागदपत्र आणून दाखवावे. त्याजवरी सदोबा फडणिसानी बोलले आमचे रुमाल सारे तुम्ही वाड्यात नेले, आम्ही काये दाखवावे ? मग याद घेऊन उठोन गेले. ग्रांटानी जा सांगितले. आबा पारसनीस याणी सनदेची सालची मेलवणी करून दिल्ही. नंतरी सरदेशमुखी आमल जुना की नवा पुसिले. चिटणीस याणी उतर केले, जुना सिवाजी माहाराजापासून आहे. जुना आहे तरी फर्मानात नवीन करून दिल्हे. तुम्ही जुना म्हणता, यास आधार काये बालाजीपंत बोलले. त्याजवरून जुनी याद फर्मान आणावयास गेले. त्यात लिहीले की सरदेशमुखी चौथाई साधले त्याचे फर्मान करून आणावे. त्याजवर कल्पना बालाजीपंतानी घेतली की, साधेल म्हणा साधले आसे म्हणू नका. मात्रा धवर द्या, लवरी देऊ नका. यावरी वाद बहुत जाला. ग्रांट बसून बोलले, बहुत आछा लढते. यापूर्वी फर्मानेचे राजाराम सिवाजी याणी आपले वतन सरदेशमुखी लोकास दिल्ह्या, पत्रे करून दिल्ही, ते चालते आणि नवीन कसे होईल ? साधन समये आला, तेव्हा फर्माने करून मात्र घेतले इतकेच आसे जाले. नंतर खाना खावयास गेले. दरबार बरखास्त केला. आज आला याहून उद्या लौकर या, चिटणीस फडणीस यास सांगितले, नंतर गेले. उभयता निघोन वाड्यात आले. माहाराजास वृ(त) निवेदन केले.

7329

[9-7-1819

१ छ १५ रोज शुक्रवार ग्रांट याकडेस विठलपंत फडनीस व बलवंतराव चिटणीस गेले. जाऊन बसले. यादी वगैरे दाखले आणिले विच्यारिले. आद्यापि आले नाही. हे बहुत काम नाकारा सुस्ताई. याणी सरकारकामे कसी निभतील बोलले.

फर्मान पादशाई आणवा बोलल्यावरून वाडियातून आणावयास पाठविले. तो कागद किल्यावर आणावयास माहाराजानी जामदार पो ते वृत ग्रांटास फडणिसानी सांगितले. नंतरी आपले लिहिण्यास गुंतले. गलबल करू नये बोलो नये म्हणून लिहावयास लागले. नतरी फडणीस बसून कंटाळून उठोन खाली आले. मागे बलवंतराव बसून कंटाळून उठोन आले माहाराजास वृत निवेदन केले. नंतरी किल्यावरील कागदपत्र सर्व आले. फर्माने देऊन आबा पारसनीस व जामदार पो तो ग्राट खाना खावयास उठोन गेले. पारसनीस परत आले. फडणीसहि मागते आले. वरकड कागदपत्र माहाराजानी पाहून माफजादीने बांधून ठेविले. मल्हारराव चिटनीस यास जैतापुराहून आणविले ते येऊन पोहचले. नंतरी फडणीस व उभयेता चिटणीस व दाजीबा उपाधे व खासे बसून येकांत जाला. मजुमदार याकडील कारकून दफ्तरदार जुने केशवराव आगटे याणी आणून भेटविले. नजर करविली व सदासिव भगवंत त्याणी रुमाल त्याचे होते त्यापो कागद निवडून काढिले. नंतर माहाराजानी आज्ञा केली जे, कागद ग्रांटास दाखऊन न ठेविता माघारे आणणे. आणि न्याहाल त्याची यादी लेहून सेरा मारून घेऊन जाणे. यावरून यादीस लेहून सेरा मारून दोन यादी सदासिव भगवंत याणी नेहल्या. नंतर कचेरी बरखास जाली. फडणीस याणी चिटणिसास सांगितले जे उद्या लवकर ग्रांटानी दाहा घटका दिवसास बोलाविले. लौकर जावयाचे करावे.

[10-7-1819

१ छ १६ रोज शनवार बलवंतराव चिटणीस व विठल पंत फडणीस उभयता ग्राटाचे वाड्यात गेले. सरदेशमुखी व बाबती वगैरे जुने दाखले व आष्टप्रधान याकडे जिल्हे हे काये व त्याची तैनात काये व सरजाम किती व नख्त काये पावत होते वगैरे प्रस्न केला. दादा चिटणीस जैतापूरचे आणविले तेहि पाठविले.

7330

४९९८

नंतरी बोलणे जाले. नंतरी आष्ट प्रधान याची तैनातीची याद दाखविली तैनात होन

१३०००	प्रधान	१००००	सुमंत
१२०००	आमात्य	१००००	न्यायाधीश
१००००	सचिव		पडितराव यास सरंजाम गांव आहेत
१००००	मंत्री		
१५०००	प्रतिनिधि	९०००	सेनापति
		१००००	राजआज्ञा.

याप्रा दाखविली व सरंजाम व इनामगाव काही नख्त पावत होते, ते हिशेब यादी दाखविली. सरदेशमुखी व बाबती वगैरे चौथाई जाहागीर वगैरे प्रांताप्रांती सारखी चालू नाहीं. जेथे जसी चाल पडली तसी साठ च्यालसी, जसी जबरी पडली तसा अमल उगवला, यैसे बोलणे जाले. नंतरी सरदेशमुखी व चौथ हा अमल पूर्वीपासून नव्हे, म्हणणे फर्मान आणिले त्यापासून आहे. त्याजवरून राजारामसाहेब याणी वतनपत्र चिटणीस यास चेऊल प्रांतचे खासा स्वामीचे वतन ते तुम्हास दिल्हे आसे म्हणून होते ते दाखविले. फर्मान यास वर्षे येकसे च्यार जाली व या पत्रास वर्षे येकसे चोवीस जाली. तेव्हा पूर्वीचे दोनी आमल खरे व सिर्के यास मावळ प्रांती सरदेशमुखीची पत्रे सिवाजीमाहाराज याणी दिल्ही तसेच चौथाई मोकासे सिवाजी माहाराजानी दिल्हे आहेत वगैरे बोलता, ग्राट याणी उतर केले पूर्वीचे खरे. फर्मान उगेच साधनपर करऊन आणिले, यैसा निश्चये होऊन पूर्वीचे खरे जाले. नंतर येशवंतराव पोतनीस यास बोलाऊन आणून बोलले. जिल्हा याचा यैवज कसा येत होता वगैरे यादी पाहिल्या. बोलला यास कमाविसदार मोठे मातबर याजकडेस प्रांत ठेविले, आमल सांगितला, त्यास जिल्हा म्हणावा. जिल्हा याचा माइना असा होतो. स्वारी सिकारी होईल त्यास सरकारी दरखदार आहेत. खर्च होईल तो जमा जमेल ती पाहून बाकी राहील ती सरकारात यैवज जमा करावा. सचिव याजकडे पीलखाना खर्च सांगितला तो जाऊन बाकी सरकारात द्यावे. तसेच प्रतिनिधीकडे पागा व मुदबाख खर्च, आसेच सर्वांकडे माहालचे हिशेब द्यावे, यैवज जमा पोत्यास करावा, किले याजवर दरखदार व सरनोबत वगैरे हवालदार हुजूरचे, हुजूर बंदोबस्त माहाल मात्र जिमेस यैसे होते. पुढे शाहू माहाराज समाप्त जाल्यावरी ज्याचे हातात ते जिल्हेदार होऊन मालक जाले. पुसणार कोणीच नाही. येकमेक सर्व

7331

लाजिमदार वशाले. कोणास कोणी पुसावे? याप्रो जाले. सर्व समजल्यावर दादा चिटणीस यास निरोप दिल्हा. विडे आतर गुलाब देऊन नंतर गेले. सदासिव भगवंत याणी याद आणून दाखविली. सन लागला नाही. वरी सन लागला कागद आहेत. दाखवितो बोलले. वर घेऊन या सांगितले. नंतर खाना खावयाचा वेळ जाला. निरोप दिल्हा सर्वास आणि आपण गेले आणि उद्या लौकर यावे सांगितले.

[11-7-1819

१ छ १७ रोज रविवार बलवंतराव चिटणीस यास बोलावणे आलेवरून ग्रांट याजकडेस गेले. बाळाजीपंत ग्रांट बसले होते. येण्यास इतका उसीर का केला ? जलद येत जावे सांगितले. माहाराजाची खुसी वगैरे पुसिले. काये करितात बोलले. नंतर प्रश्न केला. सिवाजी माहाराजाचा तहनामे वगैरे साधनी कागद काही जुने आहेत पुसिले. त्याजवर उतर केले, की रायगडास औरंगजबाचा वेढा पडिला. किला घेऊन शाहू माहाराज कबिले सर्व धरून नेले. संभाजी माहाराजास धरून नेले आणि मारिले. नंतर यास नेले तेव्हा मालमालियेत दौलत कागदपत्र सर्व पादशाहाचे हस्तगत जाले. राजाराम मात्र सडे पळून निघाले त्याजमुळे जुना कागद तहनामे राहिले नाही. येक सावताचा तहनामा होता तो बाजीराव रघुनाथ याणी सावंताचे तंब्यात पाच च्यार वर्षात पाहावयास म्हणून बाजीराव याणी आम्हांपासून नेऊन कार्य होताच जवाहीरखान्यात नेऊन ठेविला, परत दिल्हा नाही. तेथे शोध होऊन यावयाजोगे आसलियास शोध करावा. आछा बोलले. नंतरी इग्रजाचा व शाहू माहाराजाचा तहनामा पूर्वी सिवाजी माहाराजाचा तहनामा रायगडी जाला, त्याचा उधार आणून लिहिला तो काढून नकल दाखविली. हा सिवाजी माहाराजाचा तहनामा काय? नव्हे शाहू माहाराजाचे वेलेचा आहे. परंतु पूर्वीचा उधार आला आहे उतर केले. नंतर शाहू माहाराज येथे कधी दिलीहून आले, शक वगैरे व बालाजी विश्वनाथ दिलीस गेले ते येकटेच किंवा आणखी सरदार होते बराबर व मुख्तियार कोण हे विच्यारिले. बखर काढून शक व वर्तमान येकून लिहून ठेविले. नंतर नारायेणराव याजकडे नकल इंग्रजी यादी उतरावयास दिल्ह्या त्या तयार जाल्या की नाही पुसिले. येक दोन रोज लागतील. उमजाऊन नारायेणराव यास दिल्हे, परंतु तयारीस दोन रोज लागतील. बरे आहे बोलले नंतर सदासिव

भगवंत जुने काही कागद यादी दाखविल्या. रोज गुदस्त त्यास शेक सन नव्हता, आहेत ते यादी दाखवितो बोलले ते घेऊन आले. त्याजवरून बालाजीपंतानी कानावर घातले, त्यास उतर केले वरता बोलाऊन याद घेऊन ठेवावी. आता खाना होणार वेल जाली. उद्या पाहू व बखर वगैरे कागद उद्या पाहू. बोलोन खाना खाण्यास उठले. उद्या लौकर यावे बालाजीपंतास व बलवंतराव यास सांगून उठले.

[15-7-1819

१ छ २१ रोज गुरुवार प्रात:काली उठोन श्नानसंध्या देवतार्चन करून खाली कचेरी जाली. नंतर विठलपंत फडणीस येऊन येकांत जाला. बलवंतराव चिटणीस यास बोलावणे पाठविले होते ते येऊन पोहचले. केशवरावहि येऊन पावले. आज्ञा जाली की, फडणीस सारे कागदपत्र येकंदर आहेत तो बस्ता साराच नेत आहेत. ग्रांटाकडे तुम्ही व आबा पारसनीस फडाणि-साबराबर जाऊन यावे. यावरून बलवंतराव याणी पुसिले की कागद सारेच नेण्याचे कारण नाही व दिलात संषये आथवा कारण तूर्त काये पडले आहे! त्याजवर उतर केले की कारण काहियेक नाही. गंजिफा पुन्हा चालवा व काये आहे ते सारेच पाहणार बोलले. कागद ठेऊ नका सांगितले. फडणीस याणी बस्ता उपटून ग्रांटाकडे गेले. मागोन बलवतराव चिटणीस व आबा पारसनीस निघोन गेले. ग्रांटानी पत्रे पाहण्यात बादशाहाचे पत्र सिवाजी माहाराजास आलेले केशरी पंज्याचे थोरले ते आबा पारसनिसापासून वाचऊन यैकिले. वरकड हिंदवी पत्रे पेशवेसुधा येकंदर बालाजपंत याणी पाहिले. सरदेशमुखी फर्मानापूर्वी होती काय वगैरे पुसिले. त्याचा मजकूर बोलले. फर्मानातील दोन कलमे पुसिली. किले साहा यास आठ हाजार रुपये सिबंदीखर्चास द्यावे, बारा हजार पाहिजेत हे लिहितात. यातील कसे? आठ काय? बारा काय? पेशकसी बेरजेच्या हिशेबास मिलत नाही हे कसे? त्याजवरून आबा पारसनीस यास बोलाविले. त्यास पुसिले परंतु अक्षराचा मतलब न जुले. आक्षराचा आर्थ होतो परतु मतलब कसा तो निघत नाही. याची दरियाफ्ती करून उतर करू बोलोन ग्राटाकडे आले. नंतर ग्राटानी सांगितले की सारे कागद बस्ताच येथे ठेवणे. नकला करून घेऊन पाहून नंतर घेऊन जावे. आबा पारसनीस याणी दाहावे घटकेस येत जावे. आमचा मुनसी व ते याणी चवथे मजल्यावरी बसून जलद तयार करावे. किती दिवसात तयार कराल पुसिले. पधरा दिवस लागतील बोलले. बरे आहे. यावर फडणिसानी आग्रह केला की

कागदपत्र येथे कश्यास ठेवावे? पारसनीस आपले घरी बसून तयार करितील अथवा वाडियात करितील, मुनसीस सागावे. त्याजवरून रागास आला, इतका संशय का? पाहिजे तरी आम्ही हर बस्त्यावर मोहर करू आथवा तुम्ही करा. इतके दिवस ठेऊन काये केले व पुढे ठेऊन काये करणार! आम्ही उतरून बुकात छापून विलायेतेस पाठऊ. तेथून ठरेल तरी तुमचा उपयोग. यैसे बोलले. नंतरी आग्रह करीत होते. आबा पारसनीस याणी सांगितले फडणिसास की आता आग्रह करू नये. हा मजकूर बलवंतराव यास माहीत नाही. बारनिटाकडे होते. तेथून आल्यावर कागदपत्र सारे ठेवण्याविसी आग्रह करून बलवंतराव बोलो लागले. ग्राटानी तोंडाकडे पाहिले. काय म्हणून पुसिले. तो आबा पारसनीस याणी सुचविले की आसा मजकूर जाला, तुम्ही आग्रह करून फल नाही. नंतर बालाजीपंतानी सरदेशमुखी वतन नव्हे आसे ग्रांट यास सांगितले आणि बुकात लिहविले. सरदेशमुखी पहिली नव्हे हा रिंगा चाललाच होता. नंतर ग्रांट खाना खावयास उठिले. सर्वास निरोप जाला. वाडियात येऊन पावले. सर्व वृत निवेदन केले. नंतर फडणीस याणी सांगितले की पारसनीस याचे संमतानी ठेविले कागद. नंतरी च्यार घटका रात्रीस फडणिसाचा निरोप घेऊन गेले. नंतरी बलवंतराव व आबा पारसनीस व चिंतोपंत व दाजीबा उपाध्ये व खावंद बसून येकांत जाला. त्यातील मजकूर. कागदपत्र सारे गुंतले, त्यात इंग्रजप्रकर्णी राजकारणाचे पूर्वीचे कागदपत्र सारे पेशव्याचे व इकडील उतराच्या नकला वगैरे व आणखी कितेक कागदपत्र जुने हिंदवी सारे गुंतले. द्रिष्टी पडावयाचे व न पाडावयाचे हे काढून आणावे. त्यास आबा पारसनीस लिहावयास जातात तेव्हा युत्तया निघतील तितके काढून आणावे यैसे ठरले. दादा चिटणीस यास पत्र व मेना जैतापुरास आणावयाकरिता रवाना केला. बारनेट प्रश्न पुसिल्याचे उतर माहीतगारीने करण्यास विचार करावा याकरिता आणावयास पाठविले.

[*17-7-1819*

१ छ २३ रोज शनवार प्रात:काली उठोन श्नान करून देवघरात गेले तो विठलपंत फडणीस येऊन येकांत जाला. बलवंतराव चिटणीस यास बोलाविले. बालाजीपंत याणी ग्रांट यास सांगितले की फडणीसासी बोलोन माहाराजास पुसावे की आणखी कागदपत्र काये आसतील ते सारे दाखवावे. आणखी कागदपत्र काये आसतील आसा संषये वाटतो. माहाराजापासी आथवा चिटणिसापासी आसतील. पुर्ता शोध करावा. त्याजवरून फडणीस

याणी वर्तमान सांगितलेवरून महाराजानी सांगितले काहीयेक कागद नाही. बलवंतराव तुम्ही उतर करा. त्याजवरून बलवंतराव याणीहि उतर केले की जे होते ते कागद दिल्हे आहेत. बखर दिल्ही यापरता साधनी कागद नाही. त्याजवरून फडणीस यास आज्ञा जाली की बालाजीपंत यास सूचना करून तुम्ही ते येथेच यावे. समक्षच बोलणे होऊन नंतर ग्रांटास कलवावे. त्याजवरून बालाजीपंतास घेऊन फडणीस आले. माहाराज, फडणीस, चिटणीस, बालाजीपंत बसून तावदानाचे खोलीत बोलणे जाले. आदौ स्वाभाविक पावसाच्या वगैरे गोष्टी जाल्या. नंतर फडणीस, चिटणीस उठोन बाहेर आले. बालजीपंत व येजमानाचे बोलणे जाले. नंतर फडणीस यास हाक मारून आत बोलाविले. सवेच चिटणीस यास हाक मारून आत बोलविले. माहाराजानी सागितले की, आमचे मनात संशये आसता तरी सारे कागद पेशव्यासुधा तुमचे पूर्वीचे राजकारणसुधा कशास देतो? दोस्ती जाली तेथे संशय काही नाही. जे होते ते कागद दिल्हे. यापरते कागद नाहीत. तिलगूल वगैरे किरकोल कागद असतील ऐसे बालाजीपंत बोलले. माहाराजानी उतर केले की दिल्हे यापरते नाही. आलीकडील तिलगुलाचे वगैरे कागद येत ते कासीपंत बंद्रे निा बाजीराव याणी वाचून दाखऊन आपले जवल ठेविले. नंतर बालाजीपंतांनी बलवंतराव चिटणीस यास पुसिले की तुमचे दफ्तरी काही आणखी आहेत? त्याजवरून बलवंतराव याणी उतर केले की, जे होते ते पुण्यात तुम्हांस दाखविले. नकला तुम्ही करून घेतल्यात. हालीहि नकला दिल्ह्या. बखर होती तीहि दिल्हीच आहे. यापरता साधनी आम्हाजवल नाही. त्याजवरून त्याणी उतर केले की, आणखी येखादे समई निघालियास नीट नव्हे. यावर उतर केले की, नाहीच मग निघतो कश्यानी. नंतर बालाजीपंत माहाराजास बोलले की, सारे कागद पाहून छाप्यात छापून विलायतेस जाईल. सर्वास माहाराजाचा पराक्रम राज्ये वगैरे जाहीर होईल. याकरिता करितात व ग्रांटाचे लक्ष माहाराजाचे ठिकाणी फार. आसा दुसरा साहेब कोण्ही नाहीं. वारंवार माहाराजाची कालजी वाहणें व माहाराजाचा बंदोबस्त चांगला व्हावा, आपणास येश यावे हेच चितात. याजवर माहाराजानी उतर केले की, कागदपत्रावरी व सनदेवर काये आहे? आम्ही दोस्ती केली मेलविली त्याअर्थी जे देतील ते आमचे, आधिक उणे काही म्हणावयाचे नाही. तुम्ही हिंदु आहा पाहिजे ते करा. आमचे मनात आधिकउणे वाटल्यास तुम्हापासी बोलू. त्यापासी काही बोलावयाचे

7335

नाही.   बलवंतराव चिटणीस व चिंतोपंत भाटे व बापू माहाडीक होते. जुने गोष्टी पेशवे याचे घरी राज्य चिटणीस याणी घातले हे माहाडकानी काढिले वर चिटणीस याणी उतर केले की, ताराऊ साहेब याचा पूर्व द्वेष शाहू माहाराजाकडेस मिलाले तो धरून मारावे, प्राण घ्यावा हा संकल्प; व रामराजे यास कैद केले तेव्हा माहाराजाचा लक्ष साडोन यास मिलावें हा धर्म नव्हे; व पूर्वील द्वेष सर्वास मारावे पारपत्य करावे हे धरिले. याणी राज्य बुडविले आणि दुसरेवर दोष ठेऊन फल काय? माहाराज बोलले आता याचे कारण काय? नंतरी निद्रेस गेले. नंतर फडणीस ग्रांटाकडे गेले होते तथून दादा चिटणीस यास बोलावणे ग्रांटाचे सांगण्यावरून पाठविले. जाऊन पोहोचेत तो ग्रांट खाना खावयास गेले, गाठ न पडली. नंतरी त्रितीय प्रहरी कचेरी तावदानात जाली. मंडली सर्व आली. नंतरी आबा पारसनीस ग्रांट याजकडून आले. त्याणी वर्तमान सांगितले की, जुनी बुके नाना प्रकारची काढून वाचून दाखविली आणि बोलले जे, आम्हापासी लिहिले आहे यास व चिटणीस याणी बखर लिहून दिल्ही यास मिलत नाही. माहाराजाची बढाई करून लिहिले आहे. लटके आहे व सर्व राज्य दिलीपासून मोजावयाचे आहे व सिवाजी माहाराजास जरीपटका निशाण कधी पादशाहानी दिल्हे वगैरे पुसिले. पहिले सिवाजी बंडच होते, पादशाहाचे देणे नव्हे, व गादीवर पादशाहा बसले नव्हते व मूल होते तेव्हाचे संत्र+ ते आहेत, यैसे कितेक बोलले. ते वृत सांगितले. नंतर माहाराजानी चिटणीस यास सांगितले की जे पुसतील माहीतगारी ते बखर दिल्ही या आधारावरच धरून बोलावे. जे पूर्वीपासून माहीत आहे ते असे आहे. मग तुमचे लिहिले असेल ते खरे म्हणावे. आग्रह करू नये. जबरदस्तापुढें आ[ग्रह] करून कामाचा नाही व आग्रह करून सिध्ध करून फल होते असे ना[ही]. होणार ते होईल. व कागद आणखी आहे पुसतील तरी नाही म्हणावे. हे दोन जाबसालानी उतरे करावी. रिकामा विच्यार विवंचना थोर करून लभ्ये नाही. समये परत्वे होय म्हणत असावे.

[19-7-1819

१ छ २९ रोज सोमवार प्रात:काली   बलवंतराव चिटणीस यास ग्रांटानी बोलावणे पाठविलेवरून गेले. येकटेच ग्रांट होते. प्रश्न केला की, गदाधर प्रल्हाद यास प्रतिनिधि दिल्ही किती वर्षे होती व बालाजी विश्वनाथ आंगरे याजवर मुलूक घेण्यास गेले तेव्हा प्रतिनिधि

+ हा शब्द लागत नाहीं. सतंत्र, स्वतं त्रे

परशरामपंत होते किंवा गदाधर प्रल्हाद होते? प्रतिनिधि मोठे पद वरिष्ठ आसता प्रतिनिधि मनसव्यावर का न गेले? बालाजी विश्वनाथच का गेले? प्रतिनिधि नाकारे प्रल्हाद निराजी म्हणून किंवा परशरामपंत कैदेत होते किंवा मोकले. याचे उतर सांगितले की याचा शोध मितिवार लागणे. घरी कागद पाहून करितो. त्याजवर ते बोलले आणखी कागद कोणते? बखर येथे आली. त्याचे उतर केले की ज्यावरून तयार केली त्याची टाचणे आहेत. त्याजवर पाहून मिति वार लागेल न लागले पाहून सांगतो. बरे आहे बोलले. दुसरा प्रश्न चंदरराव मोरे हे पातशाई चाकर किंवा बंड होते? व बंड बुडऊन राज्ये घेणे कारण काय? व त्याचे बापाचे नाव काय? हाहि शोध करून उतर केले. दादा चिटणीसाहिं मागून गेले. त्यास पानदान देऊन निरोप दिल्हा.

[23-7-1819

१ छ २९ रोजे शुक्रवार ग्रांटाचे वाडियातून नारायेणराव इंग्रजी लिहिणार याणी माणूस पाठविले की, बलवतराव चिटणीस यास सांगावे जे, ग्रांटसाहेब याणी काही तुम्हांस पुसोन ल्याहावयास सांगितले तरी यावयाचे करावे. हे वृत येजमान स्वामीस कलविले. आज्ञा जाली की उतर सांगून पाठवावे. ग्रांटसाहेबाचे बोलावणे नाही. त्यास तुम्ही येथे यावे, नंतरी समजून घेऊन माहाराजाची आज्ञा घेऊन सांगणे आथवा तेथे येणे तसे करिता येईल. यावरून नारायणराव येथे आले आणि सांगितले की, बखर इंग्रेजींत उतरावयास सांगितली आहे. तुम्हांस बसऊन जेथे आशंका येईल तेथे विचारून लिहीत जावी सांगितले. माहाराजाचे वाडियात बसून तयार करावी सांगितले. ग्रांटाकडे बखर दिल्ही ती ज्याजवरून लिहिली तेच चिटणीसाजवल आहे. त्याजवरून उतरावे सागितले. सिवाजी माहाराजाचे पलीकडील आसेल तेहि ल्याहावे सांगितले. त्याचे उतर केले, आमची पैवस्ती सिवाजी माहाराजापलीकडे नाही. माहीत कशावरून आसावे? नंतर कचेरी बरखास होऊन रात्रौ भोजनास स्वारी बसली. यावर फडणीस चिटणीस यास आणखी पुसावे. जुने कागदपत्र साधनी माहाराजाचे आसलियास पुसावे दाखवावे. नाही म्हणून मग निवालियास नीट नव्हे. तसेच तात्या जोसी यापासी काही आसलियास व आमात्यपंताकडे आसा शोध करावा. त्याजवर उतर केले की मजूमदार आम्हासी नीट बोलतील, उतर करितील हे अपणास माहीत आहे. तात्या जोसी याकडे कागदाचा संमंधच नाही. चिटणिसास

पुसतो. त्याजवरून तात्या जोसी याचे घरी आलो त्यास पुसिले. त्याणी सांगितले आम्हाजवल कारण काय? आमचे पोतदारीचे साधनाचे आहेत याप्रो जाले. नंतरी बखर लिहून दिल्ही त्याची टाचणे प्रती आसतील त्यावरून इग्रजी उतरऊन द्यावे. शक, साल लागेल तितके लावून द्यावे आज्ञा झाली. नंतरी निद्रेस स्वारी गेली. फडणीस चिटणीस यास घरी जाण्यास निरोप दिल्हा.

[25-7-1819

१ छ २. रोज रविवार ग्रांट आले. फडणीस चिटणीस जवल होते. जुन्या तसबिरा आणऊन पाहिल्या. त्याजवर संन शेक सापडेल हा आंदेशा यामुले बराबर दौत व पराच्या लेखण्या घेऊन आले. तो तसबिरावर सन शक नव्हताच. नंतर बलवंतराव चिटणीस यास पुसिले. चंदराव मोरे मारले त्यास का मारिले? बंड होते? पातशाहाचे नौकर नव्हते की होते, समजून द्यावे व त्याचे बापाचे नाव काय? त्याजवरून सांगितले की, त्याचे बापाचे नाव ठिकाण लागत नाही. मुलाचे व भावाचे व दिवाणाचे नाव ठिकाण आहे. मारले वगैरे मजकूर बखरीत आहे. त्याजवर उतर केले, रडतोंडीचे घाटात मदत केली सिवाजीस, आसे आमचे बुकात आहे. तुम्ही बखरीत का लिहिले नाही हे समजले. काये कसे म्हणून माहाराजानी पुसले. त्याजवर ग्रांटानी उतर केले की, सिवाजी माहाराजास मदत केली. उपयोगी पडले, त्यास मारिले राज्ये लोभे, तेव्हा हारामखोरी माहाराजाकडे येईल याकरिता लिहिले नाही. याजवर बलवंतराव चिटणीस याणी उतर केले की मदत केलीच नाही. केली आसती तर लिहितो. परंतु केलीच नाही म्हणोन लिहिले नाही. साहेब म्हणतात त्यास त्या वेलेचे नव्हे, आम्ही पाहिले नाही. वडिलानी जे लिहिले ते खरे म्हणोन आम्ही मानतो. वरकड आम्हास दखल काय? त्याणी का लिहिले नाही खरे-खोटे त्यांचे ते जाणेत. नंतर शाहू माहाराजाचा कुतरा त्याचे वर्तमान पुसिले की कुतरे यास पालखी दिल्ही. त्याणी वाघ मारला तो कोणत्या डोगरात? कोणते रानात? तीथ वार संत्र शेक काढून दाखवा. बखरीत असेल ते खरे उतर केले. नंतर रामरावणयुध्धाची तसबीर पाहिली. त्यास बोलले जे हे सर्व लटके, कोण्ही पाहिले आहे? लबाड सर्व. नंतर तसबिराचे मागे पारसी लिहिले होते. वाचावावयास आबा पारसनीस यास बोलाऊन वाचविले. बैतां[१] होत्या. नंतर पुसिले की मुसलमानात व

१ कविता, सूक्ति.

इ. ८०३

आमच्यात नवी बुके शास्त्र करितात. हिंदूत आहेत काय? तुम्हास काही शास्त्र संस्कृत समजते काये? काही म्हटले काये? म्हणून आबा पारसनिसास पुसिले. थोडे थोडे म्हटले बोलले. नंतर शास्त्र करणार कोणी आहेत, काय पुसिले वरून आबा बोलले, गोपालशास्त्री व रामाशास्त्री आहेत, करितील, म्हणताच आम्हाकडे पाठवा बोलले. माहाराजानी उतर केले त्यास नवे करावयास येत नाहीं. जुने वाचतात म्हणून उडविले.

[*26-7-1819*

१ छ ३ रोज सोमवार प्रात:काली उठोन बलवंतराव चिटणीस व खासे बसून खोलीत खलबत जाले. त्यात विनंती केली की ग्रांटापासी बूक आहे. ते नारायणराव इंग्रजी लिहिणार त्याजवल दिल्हे आहे. बखरीस यास रुजू पाहून खास चौकसीने होईल ते इंग्रजी ल्याहावे. त्यास त्या बुकात माहाराणाजी याचे नाव कसालेचा माहाराजाचा वंश आसे लागले आहे. त्याविसी नारायेणराव पुरसीस करितात. आपला तरी राणाजीचा वंष. त्याणी आसी लबाडी मांडली आहे याचे कसे? यावरून येजमानानी आज्ञा केली की, आपले आहे ते लिहून द्यावे. पुरवणी तुम्ही कागदोपत्री करावी. नं र स्नानसंध्या देवतार्चन आटोपून खोलीपुढे येऊन जगदेवराव जाधव यास बोलाऊन आणून चतुरसिंग+ उदेपूर व जयपुरास गेले, तेथे जेवणे वगैरे कसे जाले हे वृत पुसिले. त्यास ते तेथे नव्हते. नंतर आणा डबिरास आणऊन पुसिले. त्याणी सांगितले की येथास्थित जाले. वंषावलहि मिलविली. त्याची परवानगी घेऊन काढऊन लाविली. नंतर लिहून मजकूर आणानी सांगितले आणि बापू कान्हो फडणीस चतुरसिंगाजवल कारभारी होते. हाली पुण्यास. त्यासहि पत्र जासूद रवाना केला की माहीतगारी लिहून पाठवणे. नंतर पाये सेकून फराल करून निद्रा केली. नंतर स्वारी त्रितीय प्रहरी श्रीकृष्णेश्वरास जाऊन येऊन भोजन केले. बखरींतील मालुमात वाचऊन पाहिली. चिटणिसानी विनंती केली, आज्ञा तसी पुरवणी कागदोपत्री व बोलून करितो, परंतु सरकार व फडणीस याणी मदतीस आसावे. नाही तरी आम्हास काये आसे म्हणू नये, बरे प्रातच बोलणे म्हणून. नंतरी बलवंतराव चिटणीस निरोप घेऊन जैतापुरास गेले. नंतर तावदानात बसून पाये सेकून भोजन केले. उपरांतिक निद्रा जाली.

+ महाराजांचे चुलते चतुरसिंग भोसले स. १८०५-०८ च्या दरम्यान उत्तर हिंदुस्थानांत फिरत होते.

7339

१०७६ . ६ ७०१

१ छ ७ नंतर विठलपंत फडणीस आले. त्याणी नीलकंठशास्त्री व ग्रांट याचे बोलणे शास्त्राचे हिंदूचे चालीचे याजवर दूषण देऊन बोलले. याणी उडऊन देऊन उतर केले ते वर्तमान सांगितले. आबा पारसनीसहि तेथे होते सांगितले.

१ छ ८ नारायणराव इंग्रजी बखर उतरतात त्याचा निरोप आला जे जुनी टाचणे बखर कशावरून केली ती द्यावी. त्याजवरून वही जुनी व टाचणे पत्रके वगैरे द्यावयाची आज्ञा जाली यावरून दिल्ही.

[11-8-1819

१ छ १९ बुधवार माहाराज सुटले होते. रास्त्याची लढाई जाली. शहर लुटले तेव्हाची माहाराजास याद आहे? नाही+ सांगितले. फडणीस चिटणीस तेव्हा किल्यावर होते सांगितले. याद जावता माहाराजानी दरखदाराचा लिहिला तो ग्रांटास दिल्हा. बखरीचे वर्तमान चिटणिसास पुसिले. इंग्रजी लिहिणे चालले की नाही? चालले आहे सांगितले. बखर केली परंतु सारी माहाराजाची बढती चांगलीच लिहिले. येखादे वेलेस वाईट चालले आसते तरी लिहिले नाही. तेव्हा संषय येतो. सारेच चांगले आसते आसे नाही. त्याजवर चिटणिसानी उतर केले की, चांगले जाले ते चांगले लिहिले, वाईट जाले ते वाईट लिहिले आहे. संभाजी माहाराजाची वर्तणूक चांगली जाली नाही सर्व बुडविले ते लिहिले आहे. सिवाजी महाराजाची चाल चांगली जाली ती लिहिली आहे. नंतर महाराजास सांगितले कीं शिवाजी महाराजानीं तरवार केली बहुत थोर नाव जाले. आपण आकलेनी थोर नाव करावे. मेहनत फार फार करावी. राज्य आलेवरी होणार नाही. थोडे दिवस उरले, मेहनत फार फार करावी. फडणीस चिटणीस मर्जीजोग बोलतील. स्पष्ट बोलणार नाहीत. माहाराजानी मनात आणून वागावे.

[15-8-1819

१ छ २३ रोज रविवार . चतुरसिंग हिंदुस्थानात गेले तेव्हा जोतपूर, ज्यैपूर, उदेपुराकडे गेले असतील. तेथे राणाजी आपण येक याचे कसे जाले ते वृत बापू कान्हो फडणीस बराबर होते ती माहीतगारी लिहून आणविली. ती याद आली. ती व जगदेवराव जाधव याणी याद दिल्ही ती पाहून त्याजवरील कलमे उपयोगी निवडून काढून चिटणीस याकडून तयार करविली.

+ टीप—धाकटे शाहूची व पेशव्यांची लढाई स. १७९८ त झाली.

[23-7-1819

शके १७४७ प्रमाथीनाम सवछरे सुा अशरीन मयातैन व अलफ माहे रमजान छ रोज ताा माहे सवाल छ रोज ऊर्फ श्रावणमास सुा सातारा.

१ शुा २ शुक्रवार नंतर काही तसबिरा दाखविल्या त्या पाहून ठेवल्या. नंतर बोलला की मी सागेन त्या समई पाठऊन द्याव्या म्हणजे समईस लाऊन देऊन. उतरून घेऊन त्या माघाऱ्या आणवितो. आणिक बोलिले की मुसलमान लोकानी तारीफ फार करून किताब लिहिली ती लबाड फार. हिंदूचे लिहिणे निमे खरे व निमे खोटे याप्रमाणे आहे. नंतर बादशाहाची नावे याची याद खुदब्यात लिहिणे आहे ती घेतली, ती पाहिली. त्याजवर हिंदु शक व पातशाही शक व कोणी पातशाहाने राज्य किती दिवस केले याप्रमाणे घेतली. ग्रांटानी व इलपिस्तनानी लाटास लिहिले की माहाराजाचे मनात सातारा किला नीट करावा. त्यानी उतर पाठविले की करावा. त्यातच लिहिणे की तेथे माहाराज कैदेत होते मग माहाराज याची मरजी का किल्यावर? किल्याचे नाव पहिले हुकेबैन हिंदूंनी नाव सातारा ठेविले. शहराचे नाव शाहूनगर.

[25-7-1819

१ शुा ४ रविवार नित्य नेम करून तदनंतर भाऊसाहेब म्हाहुलीस जाऊन आले. बखर पहिली मूळ शाहीचे पोरास वाचावयास दिली होती, ती पोरांनी पाहाऱ्यातून उतरून घेण्यास नेली होती ती चवकसीने आणली. नंतर दोन प्रहरी भोजन जाले. नंतर ऐकिले की इग्रजी बुकात लिहिले की सिवाजी राजे याचा वंश भोसाई म्हणोन उदेपूरकर यानी ठेविली तिचा वंश याप्रमाणे लिहिणे.

[6-8-1819

१ श्रावण वद्य १ भ्रुगुवार श्रावणी करून नित्यानेम सारून बालाजीपंतास बोलाविले होते ते कोडव्याचे बागेत गेले होते. नंतर ग्रांट बोलिले की लाब जाहाजे गेली तेव्हा ही धुरूची डबी+ जाली. तिकडील माणसानी केली तेव्हापासून आहे. ती माणसे मेली परतु त्याबराबरचे कुतरे आहे. तदनंतर बापू कानूचे पत्र आले की 'चतरसिंग जयपुरास व जोतपुरास मी उदेपुरास गेलो होतो. तेव्हा तिही जागे चतरसिंग गेले त्यानी चतरसिग याची मान्यता करून बोलले की सातारा व हे संथाने येकच म्हणोन राणाजी व चतरसिग येका गादीवर बसले. नंतर लेहून रात्रौ भोजन करून निद्रा जाली. कलम.

+ ध्रुवाची डबी=Mariner's Compass=होकायंत्र.

[15-8-1819

१ वद्य १० रविवार नित्यानेम करून ग्रांटाकडे असल याद बापू कानूकडून आली ती चतरसिंगबावा जेपुरास व मारवाडवाले याची भेटी होऊन वंशावळप्रकर्णी तपसिलाची आली ती दिली. ती समक्षच स्वाधेन केली.

¶The above extracts from Pratapsinh's diary range over a period of five or six weeks and refer to the method and regard for truth and accuracy of Captain Grant Duff in collecting and verifying information about the history of the Marathas, a task which it seems from these papers, he had set before himself from the beginning of his appointment at Satara as Resident in 1818. Many knotty points were freely discussed and referred for explanation to Pratapsinh and his officials. How papers were traced and placed at the disposal of Grant is well illustrated in these papers, which certainly possess an interest of their own.

No. 3] [*1820?*

श्री

सुभा धारवाड. सवाल.

कुणबीण व गुलाम प्रकर्णी सवाल.

१. किती जात पौ गुलाम बंदी आहेत?

ब्राम्हणखेरीजकरून वरकड इतर जातीचे गुलाम बंदी आहेत ते दुसऱ्याचे घरी ताबेदारी राहातात. धेड मांग यांत मात्र गुलाम बंदी बहुतकरून नाहीं. कारण की, त्या जातीचे मनुष्य इतर ऊंच जातीचे घरी राबावयास उपयोगी नाही सबब.

२. छिनाल्यात अथवा युध्धात धरिले ते, व आपराध केले ते, कर्जदारीत आले ते, व दुष्काळात खरिदी केले ते, व आपणच विकून घेतले ते, ऐसे लोक गुलाम होत आहेत किंवा नाहीत? यात जे गुलाम होत आहेत तो सरकारचा जाहालियास कैसे, लोकाचा जाहालियास कैसे? त्यानी जातीवार करण्याची चाकरी काम काय? देशमर्यादा करून उत्तर ल्याहावे.

बहुत करून या प्रांती पुरुषास गुलामगिरी प्राप्त होत नाही. आपले घरच्या कुणबिणीच्या पोटचा असल्यास गुलाम होतो, अथवा लाहान मूल क्षामात खरेदी केल्यास होतो. लस्करातून व छिनाल्यातून व कर्जदारीत किंवा आपराधाने व आपण विकून घेतले हे काही गुलाम बहुतकरून होत नाही. गुलाम झाले त्याणी घरचे काम जे हुकूम करतील ते, घोड्याची खिजमत व आपली खिजमत, घर सारवणे धुणे वगैरे जे काम पडेल ते व शेतकामसुधा करावे. बासनबर्तन

मांजणेसुधा. कुणबीण होणे ते छिनाल्यात सापडल्यास क्वचित कोठे सरकारवाले कुणबीण करीत होते. लढाईतहि धरतात. दुष्काळात विकत घेतात. क्वचित आपणहि विकून घेतात. परंतु कर्जदारीत व आपराधात कुणबीण होत नाही. कुणबिणीने काम घर सारवण, भांडी घासणे धुणे धुवावे, शेतकाम करावे, गुराची चाकरी करावी व हरयेक पडले काम धणी हुकूम करील दळण कांडणसुधा करावे. येखादा धणी आपल्या इष्काकरिताहि ठेवितो. सरकारांत जाहाल्यासहि आसेच व लोकाचे घरी आसल्यासहि आसेच. परंतु बंदीची जात उंच आहे तरी बहुत करून नीच घरी राहात नाही. उंच घरी नीच जातीची राहिल्यास आपल्या नीच जातीच्याप्रो काम करावे. कदाचित उंच जातीची नीच जाती मुसलमान वगैरे याणी घेतल्यास जातिभ्रष्ट होऊन नीच जातीप्रो राहाती. हे बहुतकरून नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत चाल आहे.

३. छिनाल्यास बंदी करीत आहेत त्यास शास्त्र आहे किंवा जुलमाने बंदी करितात आणि कोणत्या जातीची जाहालिया बंदी होती? तिला विकतात किंवा नाही?

शूद्र वगैरे नीच जातीची छिनाल्यास सापडली असतां, तिच्या भ्रतारास आगर तिजला दंड द्यावयास सामर्थ्य नसल्यास, विशेष प्रसिधीच्या ग्रहस्ताची नसल्यास, क्वचित कोठे येखादा मक्तेचा मामलदार कुणबीन करून कोठीत ठेऊन कोणास देत होता अथवा विकीत होता. यास शास्त्र नाही. जुलमाने कुणबीण करितात. शास्त्रांत कुणबीन करावी आसे नाही. काही दंड काही प्रायश्चित्त आसे आहे. त्यांत दंडायैवजी कुणबीन करतात जुलमाने.

४. लढाईत जबरदस्तीने धरतात किंवा सलुकाने दुसऱ्यास देतात? दोघेहि गुलाम. सारख्यात अधिकउणे आहे की काय?

१ ऐन कलम

२ लढाई जाल्यावर राज्यानें आपले देशास जाऊन पावल्यावर या गुलामास विकीत आहेत की नाही? कदाचित विकल्यास कोणते रीतीने विकितात?

३ येक राज्याने दुसरे राजाच्ये लोकास धरिल्यानंतर अमूक यैवज खंडणी देतो म्हटल्यास सोडण्यास मुखत्यार आहे की नाही?

३

लढाईत कोणी पुरुषास धरीत नाहीत व गावगना लुटीचे समईहि कोणी पुरुषास धरीत नाहीत. गावगना लुटीचे समई बायकास अगर मुलीस मात्र

धरून आणितात. परंतु सलुकाने देत नाहीत. बायका व मुली लुटून आणिल्या त्या कुणबिणी होतात. त्यास देशी अल्यावर विकतात. पुरुष कोणी सलुखाने बोलीकरिता देतात अथवा मातबर पाहून बोली धरून आणितात. हे काही गुलामासारखे नव्हेत. बोली धरून नेल्यास देशी गेल्यावर विकीत नाहीत. बोलीच्या खंडाचा यैवज आल्यावर सोडतात.

५. जो अपराधामुळे गुलाम होत आहे तो कोणत्या आपराधाने गुलाम होतो व कोणत्या जातीचा?

१ ऐन कलम.

२ आपराधाने जो गुलाम होत आहे त्याचे पुत्रपौत्र गुलाम होतात की काय? दुसरे तऱ्हेने जाहालेला गुलाम व हा गुलाम मध्यम जातीत सुधा नून्याधिक्य काय आहे? जसे असेल तसे ल्याहावे.

कोणत्याहि आपराधामुळे गुलाम होत नाही, तेव्हा त्याचे पुत्रपौत्र गुलाम कोठून होतील? गुलाम होतो तो कुणबीन ज्याचे खरीदीची अगर लुटून आणिलेली आथवा कोणी बक्षीस दिल्हेली आसेल तिच्या पोटी होईल तो मात्र एकच पिढी त्या घरचा गुलाम होय. त्याची जात जी त्याचे आईची जात तीच त्या गुलामाची जात होय.

६ व्यभिचाराशिवाय दुसरा आपराध केला ती बायको कुणबीण होत आसे की नाही?

दुसऱ्या अपराधाने कुणबीण होत नाही. लुटून आणिल्यास मात्र होतात आथवा दुष्काळात आईबाप वगैरेकडून खरेदी केल्यास होतात कदाचित व्यभिचारामुळे होतात.

७ कर्ज घेणाराने देणाराचा गुलाम जाल्यावर त्यास सिक्षा करण्यास किंवा चाकरी घेऊन कर्ज फेडून घेण्यास मुखत्यारी आहे की नाही? अगर ता+उमर पुत्रपौत्र गुलामगिरी करितात की कसे? यात स्त्री पुरुष असल्यास नूनाधिक्य जे असेल ते लिहावे.

१ ऐन.

२ कर्जात चाकरी करीत आसता मृत्य पावल्यावर त्याचे पुत्रपौत्राने चाकरी करून अगर कर्ज वारण्यास व मालकाने घेण्यास उभयेतांस मुखत्यारी आहे की नाही?

+ तहाउमर = जन्मभर.

7344

कर्ज घेणार गुलाम होत नाही. कोणी चाकरी करून फेडतात त्यास सिक्षा नि:कारण नाही. त्याजकडून चाकरी घेऊन कर्ज फेडून घेण्याची मुखत्यारी बहुतकरून साहुकाराची नाही. कुळाचे राजीने चाकरी कबूल केल्यास होती. कर्जात ताउमर पुत्रपौत्रादी गुलामगिरी करीत नाहीत. पुरुषहि नाही व कर्जातहि स्त्री कुणबीण होत नाही. कर्जात चाकरी करीत असता मृत्य पावल्यावर त्याचे पुत्राने बहुतकरून चाकरी करीत नाही व गुलामगिरी तर नाहीच. क्वचित कर्ज मात्र कोणी पुत्र वारतो व त्याचे पुत्रावर साहुकाराची मुखत्यारी चाकरी घेण्याविसी चालत नाही. रो मात्र मागावे, दिल्यास घ्यावे.

८ सरकारास बाकी देणेबाबत गुलाम होत आहेत की नाही ? अगर जाहाल्यास दुसरे गुलामाबरोबर याची योग्यता की कमजाजती?

सरकारच्या बाकीत गुलामच होत नाहीं, मग दुसरे तऱ्हेचा गुलामाबरोबर कोठून असेल?

९ कोणते लोक आपल्या पुत्रास आगर कोणास दुषकाळांत अगर यखादे समई विकितात की नाही ? कोणी लोक दुसऱ्यास विकले ते देशमर्यादास विरुद्ध जाल्यास शिक्षा कोणी करावी? आशाकडून यैवज माघारा घेऊन गुलामास सोडावे की नाही? जो विकतो तोच गुला(म)गिरी करण्याचे योग्य आहे की कैसे आणि विकलेल्या शक्शास[1] यैवज द्यावा तरी त्राण नसल्यास गुलाम आणि खरेदी करणारानी काय करावें ?

शूद्र वगैरे नीच ज्ञातीचे मुलास दुष्काळात वगैरे त्याचे आईबाप विकतात. देशमर्यादेकरून विरुद्ध पडल्यास सिक्षा कोणी करावी? ज्ञातीवाले याणी आपणहि करावी व सरकार सांगूनहि करवावी. आशाकडून यैवज परत घेऊन मुलास अगर मुलीस सोडितात. यैवज देण्यास त्राण नसल्यास उभयतानी काय करावे? सोडणार माकूल माणस आहे तरी तो बिनपैक्यानें सोडतो अथवा ज्ञातीचे लेकरू ज्ञातीत यावे सबब मूल जाले नाही तोपर्यंत मुलीस ज्ञातीवाले पैका वरगत करून देऊन सोडवितात, आगर मुलीचे मायबापाचे वारस सोडवितात आणि लग्न लाऊन देतात. गुलाम तर या प्रांती खरेदी विकरी फारसी होत नाही.

१०. दुष्काळात अगर यखादे समई खरेदी केले त्याचा पैका हरकोणी ज्यातीवाले याणी आणून दिल्हे असता मालिकाने सोडून द्यावयास मुख्त्यारी आहे की नाहीं ?

सोडावयास मुख्त्यारी आहे.

---

१ शकस, शखस = माणूस.

११ कोणत्या गुलामास ऐवज घेऊन सोडावे, कोणत्यास नाही. चौवे न्यातीवाले यांची भीड पडली असता जातीचे लेकरू जातींत जाते म्हणोन सोडावे. कुणाबिणीस मूल जाल्यावर कोणी सोडऊन नेत नाही.

१२. ऐवज घेऊन सोडिल्यानंतर तिचा पुत्र गुलामगिरीत असावा किंवा नाही? त्याणे गुलाम होत नसल्यास कोणते तऱ्हेचा पुत्र गुलाम होतो?

कुणवीण आपले घरी आल्यानंतर पुत्र जाहाला तर त्या कुणबिणीस सोड दिल्ही अथवा विकली तिचा पुत्र दाहा वर्षावर आहे तरी सोडते अगर विकते वेलेस करार असेल तसे करावे. त्या गुलामाचा पुत्र तो पुढे केवल गुलामगिरीमधी राहात नाही.

१३ ताउमर गुलामगिरीस कबूल केला ते आपले लेक आणि समंधिकास बदली देतो म्हटले असतां त्यास सोडावयाचे आहे की नाही?

बहुतकरून सोडावयाची चाल आहे.

१४ गुलाम पळून गेल्यास किती वर्षाचे आंत सापडल्यास मालीक मुक्त्यार व किती वर्षानंतर नाही? जातीपैकी कमजाजती असल्यास ल्याहावे.

जेव्हा सापडेल तेव्हा मालीक मुक्त्यार आहे. परंतु बहुत वर्षे जाहाली, त्याचे खाणे वगैरे परभारे होऊन तो थोर जाहाला याजमुळे भरपूर मुक्त्यारी चालत नाही. नीच ज्ञातीस त्याचे भोजन वगैरे न जाहाल्यास जातींत फरक नाही. कुणबीण असल्यास भोजनात संपर्ग जाहाला नाही व स्त्रीत्व प्राप्त जाहाले नाही तोपर्यंत जातीत कमी नाही.

१५ गुलामास दुसऱ्याचा माल हरयेक निमित्ये मिळतो त्यात आपले धण्यास त्याणे किती हिसा द्यावा? कोणी तरी मरत्येसमई आपले माल पौ अमूक गुलामास रो द्यावे म्हणोन वशियतनामा लिहून दिल्हा असतां त्या खावंदाच्या मालास वारस हा होतो किंव्हां किती मालास होतो. २. अदालत कोडतात फिर्याद करणे व वकिली व पंचाईत अशा कामास गुलाम मुक्त्यारी करितो की नाही? असे काम न केल्यास कोण ते काम करीत आसे? ३. गुलाम मेल्यास त्याचा वारस कोण? ४ मालिक पाहिजे तेव्हा सोडावे म्हटल्यास गुलामाने धण्यास सोडू सकत आहे की नाही? मालिक जिवंत असता मर्त्येसमई गुलामास सोडचिठी देऊन मुक्तता करितो की नाही? मुक्तता केली असता मालिकाचे लेकास व गुलामाचे लेकास काही इलाखा आहे की नाही?

गुलामास माल मिळाला तो बहुतकरून त्याचा धणी घेत नाही. कलम १. धण्यानी अमूक रोविसी वसियतनामा[1] गुलामास लिहून दिल्यास तितक्या रोचा मालक गुलाम होईल. साऱ्या मालास मालक होणार नाही. शूद्रात वगैरे वारस दुसरा नसल्यास हा वारस साऱ्या मालास होईल; परंतु पोटचा असल्यास. कलम २. आदालतीत फिर्याद करणे व वकिली करणे, यास हा ल्यायक असल्यास मुखत्यारी करितो. गैरल्यायक असल्यास घरसंसार खिजमतगारी वगैरे करितो. ३. गुलाम मेल्यास वारस धणी होय. ४. मालिकाने पाहिजे तेव्हा सोडावे म्हटल्यास घडेल. परंतु गुलामाने धण्यास सोडू लागल्यास धण्याची मर्जी, गुलामाची मुखत्यारी नाही. ५, मालक मरतेसमई गुलामास सोडचिठी देऊन मुक्तता करतो की नाही? मर्जी अल्यास सोडचिठी देऊन मुक्तता करतो. मुक्तता केल्यानंतर धण्याचे पुत्रास व गुलामाचे पुत्रास काही इलाखा[2] नाही.

१६. येका गुलामास धण्यानें सोडिले असता पुन्हा हरयेक अफतीमुले गुलाम धण्याकडे आला असतां धणी गुलामागिरीत ठेऊन घेत आहे की नाही? किंवा बोलावणेच जरूर? नाही जर बोलावणे केले तर पहिल्याप्रो असावे की काही अधिक उणे आहे?

सोडिले असता पुन्हा आल्यास ठेवितो तो पुन्हा पहिल्याप्रो राहातो. अधिक-उणे नाही.

१७. लोकाच्या गुलामास सरकार सोडवील की नाही? जर सोडवील तर सबब कोणत्याने सोडवील?

बहुतकरून सरकार सोडवीत नाही. जर सोडवील तर काही गैरअन्यायाने अगर जब्रीने गुलामगिरीत आणिले आसल्यास सोडवील.

१८. गुलामाचा लेक मालिकाचे घरी आपले बापाप्रो आसतो की नाही? किंवा काही तफावत आहे?

इमानी आहे तो बापाप्रो असतो. परंतु मालिकाच्या घरी आसल्यास बापाप्रो आसतो. परंतु बिघडून बाहेर गेल्यास मग काही नसतो.

१९. धण्याने केव्हा तरी इरादा केल्यास विकू सकत आहे की नाही?

कुणबिणीच्या पोटचा आहे त्यास धणी येखादेसमई विकू सकेल. परंतु गुलामास विकू सकेल. केवल गुलामाचे पुत्रास विकू सकणार नाही.

२०. गुलाम शिपाईगिरीचे काम कधी तरी करू सकत आहे वा नाही?

करू सकत आहे.

---

१ मृत्युपत्र. २ संबंध.

7347

२१. येका गुलामानें दुसरा गुलाम खरेदी करतो की नाही ?
खरेदी केला असता त्याणे काही द्रव्य मिळविले ते आपल्या धण्यास काही द्यावयाचे आहे की अगदी देऊ नये ?

गुलामाजवळ पैका असल्यास दुसरा गुलाम खरेदी करीत आहे. जो खरेदी केला त्याणे पैका मिळविल्यास आपल्या खावंदास त्यातून काही देत नाही.

२२. गुलामाचे कर्जास अथवा गुलामानें तर्कसीर+ केल्यास धणी जबाबदार आहे की नाही.

धणी कर्जासहि जबाबदार नाही व तकसीरीसहि जबाबदार नाही.

२३. कुणबिणी व गुलामाविसी पहिल्या चालीस व हालीच्या चालीस कमजाजती आसल्यास लिहावे.

पहिली चाल धणी मुखत्यार. हालीच्या इंग्रजी सरकारच्या सिरस्त्यामुळे कोठे कोठे फिर्याद अगर नाबनावामुळे बहुतकरून धण्याचा जोर कुणबीण व गुलामावर चालत नाही.

२४. धण्यावर गुलामानें मुखत्यारीने फिर्यादी करू सकत आहे की नाही ?
पहिली चाल आसी होती की धण्यावर गुलाम वा कुणबिण फिर्याद करीत नवती. हाली कोठे क्वचित फिर्यादी करतात.

२५. गुलाम म्हातारा जाल्यास अगर काम न करीसा जाहाल्यास मालिक सोडीत आहे की मारून टाकीत आहे की नाही ? ते न केल्यास आणखी काय करितो ? गुलामास धण्यानें कोणत्या प्रकारे अन्नवस्त्र देत नाही ?

म्हातारा जाल्यास ल्यायक धणी आहे तो घरबसल्या अन्नवस्त्र पोचवितो परंतु सोडून देत नाही. बदमस्तीनें काम न करीत तर जेरबंदीने मारितो. चांगल्या रीतीने न वागल्यास घालऊन देतो, परंतु जिवानिसी कोणी मारीत नाही. सोडून देण्याचा प्रकार तरी गुलामाने बदमस्तीने काम न केल्यास आगर चोरी करू लागल्यास आगर धण्यास त्याचे पोषणास सामर्थ्य नसल्यास, इतक्या प्रकारे धणी गुलामास सोडून देत आहेत.

२६. गुलाम व कुणबिणीसिवाय दुसऱ्या स्त्रीस विवाह केल्यानंतर तिचा पुत्र गुलाम होतो की नाही ? गुलाम जाल्यास कोणाचा होत आहे आणि कुणबिणीस दुसरे कोणी मुखत्यार षक्स याणे लग्न करून घेतले आसतां तिचा पुत्र गुलाम होत आहे की नाही ? जाहाल्यास कोणाचा गुलाम होत आहे ? आणि गुलाम व बंदी दोघेहि लग्न न करितां दुसऱ्याची सोबत केल्यास त्याला पुत्र जाहाल्यास कसे ? सदरीअन्वये काही तफावत आसल्यास तेहि ल्याहावे.

+ अपराध.

विवाह जाल्यानंतर तिला पुत्र जाला तो गुलाम म्हाणोन होत नाही. पुत्र मालकच होतो. कुणबिणीचे लग्न जाले आसता तिला पुत्र जाला तो काही गुलाम नव्हे, ज्यासी लग्न लागले त्यांचा पुत्र होय. कुणबिणीने दुसऱ्याची सोबत केलीन, लग्न जाले नाही; पुत्र जाला तो ज्याची सोबत केली त्याचा पुत्र नव्हे, कुणबिणीच्या मालकाचा गुलाम होय. गुलामाने दुसऱ्या स्त्रीसी सोबत केली, लग्न जाले नवते, त्यास पुत्र जाला तो गुलामाचा नव्हे. जिच्या पोटी उत्पन्न जाला तिचा पुत्र होय. याप्रो

२७. राखेचा पुत्र गुलाम होतो की नाही?

त्या पुत्राची जात मात्र गुलाम. परंतु ज्या पुरुषापासून उत्पन्न जाला त्या पुरुषाचा गुलाम नव्हे. तिचा पुत्र, त्यास मालक तो नव्हे; ती मालक.

२८. येक जमीन येका गुलामास पोटाकरितां दिल्ही. त्या जमिनीचा मालक दुसरे ठिकाणी गेला. त्या समागमे गुलाम जातो की नाही? अथवा त्या जमिनीस मालक दुसरा कोणी अला तरी ती जमीन आपण करून आसतो की कसे? दुसरे गुलामास व या गुलामास काही तफावत असल्यास ल्याहावे.

मालक दुसऱ्या ठिकाणी गेल्यास गुलामास बरोबर नेण्यास अगर शेतावर ठेवण्यास मुखत्यार मालक होय. मालक गुलाम नव्हे. कदाचित ठेवल्या जमिनीस मालक मिरासदार दुसरा आल्यास बहुतकरून हा गुलाम ती जमीन सोडणार नाही. इनाम असल्यास तो जप्त होऊन दुसरा सरकार आगर इनामदारच दुसरा आल्यास मुखत्यारी नव्या इनामदाराकडे आगर सरकारात जमीन आसल्यास सरकारकडे. परंतु गुलामाच्या धण्याचे हुकमाप्रो गुलामाने वागावे. शेतजमीनवाला गुलाम व घरकामकरी गुलाम, दोघांत फरक नाही.

२९. वाटेत वारस कोणी नसता जे मूल सापडले ते ज्यास सापडेल त्याचे गुलाम होतो किंवा दुसऱ्याचे?

ज्यास सापडले त्याचे अगर पाळण जो करील त्याचे गुलाम. याखेरीज तिसऱ्याचे नाही.

३०. सापडल्या मुलास सरकारने किंवा हरकोणी ठेविल्यानंतर वारसानी वोळखल्यास किती दिवसाचे अत आल्यास सोडावे? न सोडावे किती रोजानंतर? आणि मुलाचे तमाम समंधीक अले तरी सोडावे किंवा आईबाप अले तरी सोडावे कसे? मुदतीच्या आत वारस आल्यास पोटखर्च काय घेऊन सोडावे?

मुलीस मूल होई तोपर्यंत सोडवितात. मुलास थोर होई, पंधरा वर्षांचा होई तोपर्यंत सोडवितात. मुलाचा कोणीहि वारस आगर ज्ञातीवाला आला तरी सोडावे. पोटखर्च घेऊन सोडविण्याचा मार, कालदेशवर्तमान पाहून, चौघे रदबदली करून, जातीचे लेकरू जातीत जावे हेहि मालकाच्या मनातून, काही ल्यायकीवर द्रिष्ट देऊन, पोटखर्च पौ निमेनिम अजमासे सुमार पाहून घेऊन सोडून देतात.

¶*The paper contains a detailed inquiry into the practice of indigenous slavery in the Deccan. The paper is of great social importance.*

No. 4] [*21-9-1821*

श्री

जाहीरनामा सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बाहादर सुा इसने अशेरीन मया तैन व अलफ. तमाम ब्राम्हण लोकास जाहीर व्हावयाकरिता लिहिणेत येत आहे जे:— कुंपणी सरकारची मर्जी आहे की या मुलकात ब्राम्हण लोक बहुत आहेत. विद्या पढून पंडित व्हावे म्हणून, ऐशास शहर पुणे येथे विश्रामबागेचा वाडा पाठशालेस नेमून विद्या पढवणेस शास्त्री वैदिक वगैरेस नेमिले आहे. विद्या पढवणे पढणेचा वगैरे तपसील :

१ पाठशालेत विद्या पढवणेचा तपसील.

८ शास्त्र

१ वैयाकरण

१ अलंकारशास्त्र काव्यदेखील.

१ न्यायशास्त्र

२ वेदांत

१ अद्वैत

१ द्वैत

२

१ वैद्यशास्त्र

१ ज्योतीष

१ धर्मशास्त्र

८

7350

३ वेद

१ ऋगवेद

२ यजुर्वेद

१ आपस्तंभ

१ माध्यांदिन

२

३

११

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थान क्रत
सं. ३- नं. ८०३
ता. ....
ठा. णे.

याप्रमाणे विद्या पढवणेस वैदिक शास्त्री यास नेमिले आहे, त्याणी पढवितील.

२ पढणार लोक जितके येतील तितक्यास विद्याभ्यास जे पाहिजे ते पढवावे. विद्या वाढावयाकरिता अनुत्पन्न पाहून पढणार शंभर विद्यार्थ्यास सरकारातून दरमाहा रूपये ५ प्रो खर्चास पोटाकरिता मिळेल.

३ विद्या पढणेस लोक जे येणार ते आस्विन सुध २ चे दिवसी सर्वत्रानी दफ्तरचे वाड्यामध्ये दाहा घटिका दिवसास प्रात:काळी हजर व्हावें. ज्यास जे विद्या अपेक्षा आहे ते पढवणेस नेमणेत येईल. सुध ५ दिवसापासून पढवणेस प्रारंभ होईल.

४ पढवणार व पढणारसुधा वर्तणूक करणेस विद्याअभ्यास अधिकोतर जसे जसे करितील तसे त्यास दक्षणा अधिक मिळेल. न्याय ज्योतिष वैद्यशास्त्रास जाजती दक्षणा मिळेल; म्हणोन ऐसे वर्तणूक करणेविषई कितेक कलमाची याद निराळी लिहिली आहे, त्याप्रमाणे वर्तणूक करणेत यावे.

येकूण च्यार कलमे लिहिली आहेत. तारिख २१ माहे सतंबर सन १८२१ इसवी मुतावल छ २३ जिल्हेज.

¶*A proclamation is issued that a Sanskrit Pathshala will be opened at the Vishrambag Palace and the Brahmins are asked to take advantage of the same.*

No. 5] [*5-10-1821*

१५-१०-१८२०—५-१०-१८२१

"छत्रपति प्रतापसिंह याचे रोजनिशींतील उतारे."

शके १७४२

आश्विन शुद्ध १३ शुक्रवार शके १७४२, १९-१०-१८२० खेडचे बागेतून येताना विनंती केली संत्रीनें, इंग्रजाचे लषकरचा येऊन बोलला कीं खेडचे बागेत बैरागी

होता तो लषकरात फिरावयास गेला तो इंग्रजाचे लषकरात गाई मारताने पाहिले. मारणार यास बोलला की गाई मारू नको व जरा रागेहि भरला. सबब बैरागी यास मारणार याणी पाहाऱ्यात बसविला. हेहि खंडू सिंदे याचे हातून लिटिल साहेब याजकडे सांगून पाठविले की येथे गाई मारणे हे नाही. कंपिणी सरकारचा हुकूम व लागले तरी बाहीरून आणावे आसे ग्रांटास पुसले. ते बोले व त्याणी हुकूम दिला की जो मारील त्यास धरून आणावा म्हणजे पारिपत्य करू. त्यावरून जान लिटिल साहेबाकडे सांगून पाठविले. त्याणी सांगितले की बंदोबस्त करून सोडवितो. हा मजकूर खंडू सिंदे याने कळविला.

मार्गसीर्ष शुा १४ शनवार शके १७४२, ९-१२-१८२० विठोबाचे व ग्रांटाचे बोलणे जाहाले ती कलमे. तात्या आभ्यंकर व बलवंतराव चिटणीस व कृष्णराव हे पयेका खातात व कोणाचे म्हाराजाचे म्हणजे काम चांगले करावेसे नाही. पयेका मेळवावा हे म्हाराजास ठाऊक आहे किंवा नाहीं? विठोबा बोले की ठाऊक आहे. मग ग्रांट बोलले की ठाऊक असून माहाराज का चवकसी करून ठेऊ नयेत? व माजे हुकुमनाम्यात आहे की आसी माणसे माहाराजानी ठेऊ नये याजकरिता बहुत चवकसी करीत नाही. मग ग्रांट बोले की विठलपंत तुम्ही व माहाराजाचे काम म्हाराजा करतील परंतु मग कोणी नाही. कृष्णराव ठेवणे नाही. परंतु हे पुण्याचे लोकास व चितपावनास दाबाकरिता ठेवणे. येशवंतराव सरसुभेदाराचा पयेका खाणार नाही, परंतु कंपिणी सरकाराची जरब लबाडकीची दाखऊन जरब ठेवील मग चांगला आहे हा बेत त्याचा ठेवावा. दाजीबा सरसुभेदार चांगला आहे परंतु कसा करील हा भरवसा नाही व म्हाराजाचे जवळ चिंतोपंत भाटे आहे तोहि पयका खातो.

माघ वद्य ३ सोमवार शके १७४२, (१९-२-१८२१.) हाली कंपिणीसरकारात साहेबलोक कामगार आहेत व शाहाणे असे कोणी नोहते. हाली मध्ये हे तीन आधिक, आलपिष्टण व मंड्डूरसाहेब+ व हल्ली जो लाट कलकत्यास आहेत. पहिले साहेबलोक होते त्याणी सरकारी काम करावे व आपणहि पयेका मेळवावा जावे. चार वर्षाचे मागे आलिपिष्टणपासी जे रसूल साहेब होता त्याचे वडील भाऊ त्याचे नावे रसूलसाहेब हे नवाब हाद्राबाजवाले याचेकडेस कंपिणीसरकारातून वकिलीस होते. त्याणी काये केले की नबाबाचे मर्जीने आपले काम संभाळून आषआराम केला व केले तरी चिंता नाही, परंतु मेहनत केली नाही. पयेका मेळऊन बारा पंधरा लाख रु. मेळऊन गेले. त्याणी पहिले साहेबाचे चाली प्रो केले. याप्रो ग्रांट बोले समक्ष.

ग्रांट बोले की गुजरातीचे रयेतपासून फार पैका घेतात. बंदोबस्ती कडक नीट नाही कंपणीसरकारचे साहेब लोकाकडून. मग आमी बोलो. नानाफडणीस म्हादजी

+ Munro.

सिंद व निजाम अलीखान हैदरखान आसे जरी शाहाणे तालीवार आणिक फार होते, तरी मुलकाचा बंदोबस्त हाली कंपीनी सरकाराप्रो नहोता. ग्रांट बोले हे खरे परंतु हे शाहाणेच होते. कलम

फाल्गुन वा ३० सोमवार शके १७४२, २-४-१८२१

ग्रांटाची गाठ पडली तेव्हा ग्रांट बोले की बाजीराव फार लबाड आहे. त्यास मालकणसाहेब किंवा आलिपिष्टणसाहेब या दोघांतून येकाची गाठ पडली, सबब नेमणूक इतकी जाहाली. आमची आथवा कोणते साहेबाची गाठ पडली आसती तर फार कमी करिते नेमणूक. या प्रो ग्राट समक्ष बोले. कलम

चैत्र शुा ७ सोमवार शके १७४३, ८-४-१८२१

रामजन्म होऊन मग घोडी फेरून मग आलो. वाटेस पलटणचे साहेब दोघे आले, वाड्यातील बेत पाहिला. पाचवे पलटणचे मेजर त्याजपासी असतो. आपण तिकडे येत जावे व फारच बोले भाषणे दोस्तीने व बोलले की आम्हास नाच हिकडले मुलकाचा चांगला लागतो, येक वेला दाखवणे; व आम्हासहि विषयेयास[1] बायेकू पाहिजे. जर पैका आसता तरी लग्नच केले आसते. नाही सबब दुसरेया बायेका पाहिजेत. मग गेले. कलम

२-४-१८२१

विठोबापासी येका चपरासियाणे कलविले की कासीपंत बंदरे पाटेस चोरून ग्राटाकडे जातात, बातमी आमची कलवितात. कलम

२९-४-१८२१

विठोबापासी पारगावकर सावकार पालीत राहात असतो. त्याणे येऊन कलविले की वॅारणसाहेब व येशवंतराव सरसुभेदार हे चवकसीर आले होते ते वेलेस पारगावकर याणे आपले घरी वारणसाहेब आणला. पानसुपारी देऊन गेले ते वेलेस त्याची घरची कुणबीन ईस नलात बोलाऊन पंचवीस रुा दिल्हे. तिचे संगे बदकर्म केले हे विठोबानी कलविले. जबर, कोणी बोलावे, सबब बोले नाहीत.

३०-४-१८२१

विठोबानी कलविले की साहेब लोक शहरात येऊन रत्स्याने माणसास कमची मारतात व बुगी कलावंतीन इच्या पोरी आहेत त्याजला बोलावीत होते आसे आहे. त्यास ताकीद करावी याप्रो म्हाराजानी सांगितले. मग ग्रांट बोले की करनेलसाहेब यास ताकीद करून ताकीद करवितो. याप्रो ग्रांट बोले म्हणून विठोबानी कलविले. कलम

---

१ इस्कास.

७-९-१८२१

बायकास परस्परे घरात पुरुषाने आथवा बायकास बायकानी दस्तुराप्रो रागे भरले आथवा दाब दिल्हा तरी याजवर बायका जीव देतात, त्या बायकोचा मुरदा नागवा करून झाडास टांगावा. पुढील इंद्रियात काही खोऊन ठेवावे म्हणजे आबरूस भिऊन बायका फार जीव देणार नाहीत. याप्रो जाहिरनामे करावे म्हणजे दस्तुर ठीक चालेल. परंतु ग्रांट बोलिले की आदालतीत सर्व मंडलीचे देखत हे कलम बोलणे म्हणजे सर्वास चांगले दिलात आले तरी जाहीरनामा करावे. कलम.

¶These are a few extracts from a year's Diary kept by Pratapsinh, in which are reported conversations that took place between him and Captain Grant the Resident. The topics discussed are various and interesting, and relate to social and administrative matters. The reflections cast on society and customs prevalent in those days will be found instructive.

No. 6] *[6-10-1821*

श्री

यादी पाठशाले प्रकर्णी कलमे सुरू संन इसने अशरीन मया तैन व अलफ सन १८२१ इसवी माहे अकटोबर ऊर्फ मोहरम अश्विनमास

१ हिंदुलोकाची आबादी व खुषी ठेवावयाचा इंग्रजी सरकारचा सांप्रदाय पहिल्यापासून आहे. यास्तव माहाराष्ट्र दक्षणेचे मुलकास विद्या पढावयाकरिता व ब्राह्मण ज्ञातीत अध्ययन पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणें होत असावे याजकरिता गौनर साहेब बाहादर याणी विद्या कायम राहावयावर नजर ठेऊन शहर पुणे येथे पाठशाला चालवावयाचा निश्चय केला असे.

२ सदरहू हुकूम अमलात आणण्याविषई कामिशनर बाहादर याणी पाठशालेस आरंभ ६ आकटोबर तेरखेस करून दक्षणेस थोर ब्राह्मण विद्यान आहेत त्यापैकी अध्ययन सागण्यास गुरूची नेमणूक केली.

३ वैदिक

१ ऋग्वेदी विठलभट फाटक

२ यजुर्वेदी

१ आपस्तंब शाखा माहादेवभट

१ मध्यंदीन मेघश्याम पाठक

—

२

—

३

7354

७ शास्त्र

१ वैयांकर्ण

१ अलंकार नाटक अनंताच्यार्य

१ न्याय राघवाच्यार्य

१ धर्मशास्त्र

१ ज्योतिष

१ वेदांत राघवाच्यार्य[1]

१ वैद्य

—

७

——

१०

सदरहू दाहा आसामींपैकी येक मुख्तसर शास्त्री केले आहेत व याशिवाय गुरूस मेहेनत भारी होईल सबब चिंतणिका सागणारहि मुकरर केले आहेत.

३ हर कोणी संभाविताचे पुत्र विद्याभ्यास करण्याची उमेद ठेऊन पाठशालेस येतील त्यास काही खर्च न लागता अध्ययन सागण्याची परवानगी होईल. परतु विद्याभ्यासाची बहडती होण्याकरिता सरकारातून शंभर विद्यार्थी यांस हर येकास दर माहा पाच रुपये पोटगीबदल दिल्हे जातील व सदरहू शंभर विद्यार्थी याची हरयेक विद्येस दाहा विद्यार्थी याप्रो नेमणूक होईल.

४ सरकारचा मनसबा असा आहे की जे गरीब लोकाचे मूल विद्याभ्यास करणार परंतु त्यास घरी पोषण करावयाचे सामर्थ नाही असे जे असतील ते ठेवावे. गुरूनी मेहेनत केली असता जे तरबेत होतील, गुरूची मेहनत व्यर्थ जाणार नाही असे असावे. त्यांची परीक्षा पाहावी. दाहा वर्षा-पासून अठरा वर्षांचे उमरीपर्यंत असतील आणि विद्येत प्रवेश जाला असेल ते ठेवावे, म्हणजे गुरूनी मेहेनत केल्याचे व विद्यार्थी याणी अध्ययन केल्याचे स्वरूप होईल.

५ गुरूस उतम प्रकारची नेमणूक केली आहे. त्यास त्यांचे काम हेच आहे की, विद्यार्थी यांस अध्ययन सागोन त्यांची वागणुकीची चौकसी करीत असावे व हरवख्त त्यास चागला बुध्यीवाद सिकवीत असावे. गुरु सरकारचे इलाकेदार[2] असे समजून हिंदुधर्माविसी यकाधे वेळेस कारण पडेल तेव्हा शास्त्रार्थ सरकारातून पुसतील त्याचे उतर गुरूनी वास्तविक

---

१ हा शब्द खोडला आहे. २ताबेदार.

देत असावे. सरकारातून गुरूवर इतबार ठेविला आहे त्यापेक्षा जे काम ज्यास सोपिले आहे त्याची निभावणी खातरजमेने करून आपले लौकिकाची वृध्धी होईल ते करीत असावे म्हणजे त्याचे भूषण कमिशनर बाहादर सरकारांत जाहीर करतील. चाल सोडून चालल्यास तेहि जलदीने सरकारांत समजेल हे त्यांचे मनात असावे.

६ विद्यार्थी जोपर्यंत पाठशालेत कायद्याप्रो वागून आपले अध्ययनाची अभिवृध्धी करीत जातील त्यास पोटगीची नेमणूक करून दिल्ही आहे ती त्याचे अध्ययन पुर्ते होइतोपर्यंत निर्वेध चालेल; परंतु जरकरिता दर्म्यान गैरकायद्याची वर्तणूक किंवा गुरूचे हुकुमाचा अपमान अथवा आपले अध्ययनास आलस्य ऐसे वास्तविक समजोन आल्यास बाहेर काढून दिल्हे जाईल, व कोणी विद्यार्थी यास आपले विद्येची अभिवृध्धी होईना तर वर्ष दोन वर्षे त्याची परीक्षा पाहून त्याची बुध्धी अध्ययनात न चाले तरी पाठशालेतून मौकूफ केले जाईल.

७ वर्षास येक वेल पाठशालेचे चौकसीस सरदार लोक येतील. ते विद्यार्थी लोकाची परीक्षा मोठे मोठे विद्वान ब्राह्मणाचे हातून करवितील. त्यात जे चांगले नजरेस येतील त्याची सिपारस होऊन दक्षणेसमई प्रतिष्टा उतम होईल. वेदशास्त्रामध्ये जे हिंदू लोकानी पाहावयाचे असेल ते त्याणीच पाहावे. यासिवाय आणखी चौकसीची कलमे असतील ती सरदार पाहातील. पाठशालेत विद्यार्थी राहातील त्याणी अध्ययन किती वर्षानी संपूर्ण करावे याची मर्यादा,

१ जे विद्यार्थी अठरा वर्षांचे वयाचे आहेत त्याणी सात वर्षात विद्या करावी.

१ जे विद्यार्थी सत्रा वर्षे सोला वर्षे वयाचे आहेत त्याणी आठा वर्षांत विद्या करावी.

१ जे विद्यार्थी पंधरा वर्षे चौदा वर्षे तेरा वर्षे वयाचे आहेत त्याणी नऊ वर्षात विद्या करावी.

१ जे विद्यार्थी बारा वर्षे अकरा वर्षे दाहा वर्षे वयाचे आहेत त्याणी दाहा वर्षात विद्या करावी.

४

येणेप्रमाणे नेम केला असे. त्याप्रो ज्याचे त्याचे वयाप्रो विद्या संपूर्ण जाली म्हणजे पोटगीची नेमणूक मौकूफ होईल, परंतु दक्षणा त्यांचे योग्यते-

7356

प्रो सरकारांतून ठरेल ती पावत जाईल. ज्या विद्येत त्याचा परिश्रम जाला असेल त्यासारखे सरकारातून कामकाज कारण पडल्यास सागितले जाईल.

८ विद्यार्थी याणी कोणतेहि विद्येचा अभ्यास करावा. त्याविसी सरकारांतून कोणताहि नेम होऊन येणार नाही. परंतु पाठशालेत विद्यार्थी शंभर त्यापैकी सतर शास्त्राकडे, तीस वैदिक याप्रो येकूण दाहा शाला. येकेके शालेस दाहा दाहा विद्यार्थी असावे. इतका नेम सरकारांतून जाला. विद्यार्थी यास यातून जी विद्या पाहिजे ती पढावी, परंतु धर्मशास्त्र व ज्योतिषशास्त्र व वैद्यशास्त्र याचा उपयोग वारंवार सर्व लोकास आहे, याजकरिता याचा अभ्यास अधिकोतर करून जे चागले होतील त्यांची प्रशंसा होऊन बक्षीस मिलेल.

९ पाठशालेची व्यवस्था मुख्य सर शास्त्री व दुसरे गुरू याजकडे सोपून दिल्ही. त्याणी आपलाले कामाचा बंदोबस्त ठेवावा. सरकारांतून तो बंदोबस्त पाहू लागल्यास हिंदुधर्मास विरोध दिसेल. याजकरिता पाहाणार नाही. शास्त्री व गुरू पाठशालेत विद्यार्थी याचे वहिवाटीकरिता चकनामे करितील त्याप्रो गुरूनी व विद्यार्थी याणी वागत असावे. त्यात ज्याकडून काहीयेक अतर पडेल त्यावर सरकारची गैरमर्जी होऊन पाठशालेतून मौकूफ होईल.

१० राघवाचार्य रामानुजण थोर विद्वान जाणोन पाठशालेत मुदतसर केले आहेत. ते गुरूवर व विद्यार्थी यावर व शालेचे इलाखदार यावर हुकूम करितील व वाईटबरे गुरूपासून किंवा सिष्यापासून काय जे होईल ते सरकारात जाहीर करितील. याकरिता सर्वांनी त्यांचे हुकुमात वागत असावे.

११ पुस्तके हाली सरकारांत आहेत ती दरोबस्त पाठशालेंत विद्यार्थी यास विद्याभ्यास करण्यास ठेविली जातील. यासिवाय आणखी पुस्तके लागतील ती समजवावी म्हणजे छापिले पुस्तके कलकतेहून आणऊन पाठशालेत दिल्ही जातील.

१२ पाठशालेस विश्रामबागचा वाडा नेमून दिल्हा आहे.

१२

येकूण कलम बारा व तारीख छ ६ अकटबर मुा छ ९ मोहरम सन १२३१ फसली.

¶*Organisation of a Sanskrit College at Vishrambag, Poona, by the Bombay Government is detailed in this paper. The number of pupils was to be one hundred.*

7357

No. 7] [1821 ?

श्री

यादी पुण्यात दप्तरात आथवा दुसरीकडे शोध हरकोठे करून लिहावयाची कलमे येणे प्रो :—

१ माहादजी सिंदे हिंदुस्थानातून पुण्यात आले तेसमई दिलीहून पातशाहाकडून वजिरात श्रीमंताचे नावे करून खिलत व फरमान आणिले व सिंदे याणी नायबी आपले नावे करून खिलत व फरमान आणिले म्हणौन ऐकितो, त्यास त्याचे असल कागद असल्यास त्याच्या नकला व कैफियत लिहून यावी.

२ माहादजी सिंदे याणी येतेसमई तीन कोट रुपयाची वरात दिलीहून पातशाहाची हैदराबादकर नवाब याजवर आणिली त्या वरातेची नकल असल्यास व कैफियत लिहून यावी व त्या वराते पौ अदा काही जाला असल्यास त्याची कैफियत.

३ खर्ड्याचे स्वारीची लढाई मराठे व मोगल यासी जाली ती कशाकरिता जाली.

४ खर्ड्याचे लढाईचा तहनामाची नकल.

५ खर्ड्याचे लढाईत बतीस लक्षाचा मुलूक नवाबाकडून मराठे याजकडे आला ते माहाल कोणते व तो मुलूक पुन्हा नवाबास दोन तीन वर्षांनी परत दिल्हा तो कोणत्या कारणावरून दिल्हा? तेसमई कारभारी कोण होते ? कोणाच्या विचारे दिल्हा ?

६ सरदेशमुखी बाबती वगैरे स्वराज आमल बेदर वगैरे प्राती श्रीमंताचा होता तो अमल मसीरन मुलूक पुण्यात होते ते सुटले, त्याणीं कुमकेस फौज आणिले ते समई अमल सोडला, त्या वेळेचा तहनामा आसल्यास त्याची नकल व त्यासमई कारभार कोणकोणाचे विद्यमाने ठरले ही कैफियत.

येकूण साहा कलमे दर्याफ्त होऊन कैफियत पुणे दफ्तरातून हर कोठून शोध करून. लिहून.

¶*Instructions are issued apparently by Raja Pratapsinh to secure papers relating to the grant of Nayabship to Mahadji Sindia, the battle of Kharda and the subsequent treaty concluded between the Marathas and the Nizam. It appears these papers were meant for Grant Duff who was collecting sources for his history.*

No. 8] *[5-4-1822*

श्री

जाहीरनामा सरकार दौलतमदार कंपनी इंग्रज बाहादूर तमाम लोकांस महशूर व्हावयाकरिता लिहिलें जाते जे:—सरकार श्रीमंत माहाराज छत्रपतिसाहेब राजे सातारा यांसी कंपनीसरकारांतून राज्य देऊन तहनामा जाहाला, त्या वेळेस असे ठरल होते कीं मुलकाचे आबादी व बंदोबस्ताकरिता व माहाराज व त्याचे अहलकर+ लोक बंदोबस्ताचे कामांस वाकब व्हावयाकरितां काही दिवस मुलकाची वाहिवाट माहाराज यांचे नावाने व माहाराज याचे मसलतीने इंग्रजी सरकारचे सरदार करितील. यास हाली माहाराजाचे सरकारातून दरोबस्त वहिवाट आजपासून होत जावी आसे ठरले. त्यावरून उलियम चापलीन साहेब कमिशनर बाहादूर याणी सातारेयास येऊन माहाराजचे दरबारात मोठे सरदार व जाहगीरदार वगैरे सारे लोक जमा होऊन राज्याची वहिवाट माहाराज याचे सरकारात सुपूर्द केली असे. तरी सरदार व जाहागीरदार लाहानमोठे जे माहाराजाचे इलाख्यात आहेत, त्याणी व तमाम रयत वगैरे हरयेक लोकानी, माहाराज यांचे सरकारचें लक्ष ठेऊन त्यांचे हुकमात वागत असावे. मोठे सरदार व जाहागीरदार याणी आपलाले यादीप्रमाणे वागावे. माहाराजाचे सरकारातूनहि या लोकास हुकुम देते वेळेस यादीप्रो देत जातील. सर्वांनी जाहीरनामा समजोन वागत आसावे. जाणीजे तारीख ५ येप्रिल सन १८२२ इसवी सुा छ १२ रजब सुा इसने आशरीन मयातैन व अलफ.

¶*This is the company's declaration announcing the installation of Raja Pratapsinh.*

No. 9] *[19-7-1822*

श्री

यादी विश्रामबागचे वाड्यांत पाठशाला घातली आहे त्यास वहिवाट करण्याची कलमे शके १७४३ चित्रभानु सवत्सरे.

१ न्यायशास्त्र

१ अलंकार

१ ज्योतिषी

१ वैयाकर्ण

१ धर्मशास्त्र

१ द्वैतवेदांत

+ कारकून.

१ आश्वलायन
१ आपस्तंब
१ वाजसनी

यासी गुरू व उपगुरू व विद्यार्थी याचा येण्याचा वगैरे बदोबस्ताची कलमे.

१ गुरू दोन घटिका दिवसास येतील. त्याणी आठा घटिकानंतर जावे. पांच घटिका दिवसास येतील त्याणी अकरा घटिकानंतर जावे. सर्वांनी सवा दोन प्रहरास यावे ते सध्येस जावे.

१ उपगुरूनी प्रातःकाली यावे. दाहा घटिका दिवसानंतर जावे. सवा दोन प्रहरा यावे ते संध्येस जावे.

१ विद्यार्थी याणी प्रातःकाली यावे. दाहा घटिका दिवस आला म्हणजे जावे ते सवा दोन प्रहरा यावे ते संध्येस जावे. नंतर रात्रौ भोजन करून यावे ते दाहा घटिकापर्यंत पढावे. ज्याची घरी पढावयाची सोय आहे ते रात्रीस न आल्यास चिंता नाही.

१ गुरूनी अनध्यायाचे दिवसी विद्यार्थी यास पढऊं नये.

१ सर्वास घरी विवाहादिक कार्य असता आचार्यास पुसोन जावे.

१ ग्रामांतरांचे गुरू व उपगुरू व विद्यार्थी आहेत त्यांच्या घरीं अत्यावशक कार्य उत्पन्न जाले आसतां घरास जाण्याची परवानगी आचार्यांनी देत असावी.

१ शालेपैकी कोणी आजारी जाहाला तरी सरकारातून वैद्य पाठऊन औषधाचा व पथ्यापाण्याचा बदोबस्त व्हावा.

१ आजारी बहुत दिवस जाहाला तर त्याची अवधि कोठपावेतो त्याची सरकारातून परवानगी सांगावी.

१ गुरू उपगुरू विद्यार्थी यांची नित्यात येण्याजाण्याची हजिरी गैरहजरी कारकुनानी लिहीत असावी आणि सायंकाली राघवाच्यार्य यास दाखवावी.

१ हजिरी गैरहजिरी नित्यानी समजलीयावर निमित असून गैरहजर किंवा कशामुळे ते राघवाच्यार्य याणी पाहून ताकीद करीत आसावे.

१. विद्यार्थी यांचे अध्यायनाची परीक्षा वर्ष किंवा साहा माहन्यांनी होत असावी. गुरूनी पहिले परिक्षेस अध्यायन जाले ते लिहून ठेऊन दुसरे परिक्षेस अध्यायन किती जाले हे गुरूनी समजोन नंतर राघवाच्यार्य याणीहि पाहून अध्यायन अमुक व्हावे परंतु कमी जाले याविसी सागत असावे.

7360

१ विद्यार्थी यांची परीक्षा पहिली जाल्यावर दुसरी परीक्षा होईल त्या वेळेस अध्ययनाची चौकसी होईल व तिसरे परीक्षेस ज्या विद्यार्थीयास अध्यायन सागण्याची मेहेनत करून व्यर्थ असे समजलियास त्याविसी सरकारांत कानावर घालून हुकूम होईल तसे करावे.

१ गुरूनी कोणास वर लिहिल्याप्रो यावयास न होय आणि प्रातःकाली दाहाचे बारावे घटकेस येऊन सायंकाली जावे.

केलमे[१] सहि राववाचार्या

मिा श्रावण शुध्ध १

¶*Rules and regulations for the Sanskrit College at Vishrambag are herein announced.*

No. 10] [*3-10-1822 ?*

५११६

श्री

अर्जी दते दीपविजय कविराज विनंती ऐसी कीं:—हे वंशावली घेऊन छेत्रपति राजे यांजकडे साताऱ्यास जातो, त्यास साहेबानी कृ(पा)ळू होऊन गिरांडसाहेबास चकती करून द्यावी कीं राजे यांची भेट करून द्यावी आणि माझी बरदास्त होईल, चकती द्यावयासी आज्ञा व्हावी हे विनंती.

¶*Deepvijaya Kaviraj going to meet the King with the genealogy of his family requests a letter of introduction to Resident Grant from Governor Elphinstone.*

No. 11] [*3-10-1822*

ताा ३ आकटोबर सन १८२२

श्री

साहेब आलीशा गौरनर साहेब

बाहादूर

यासी उदेपूरकर कुळगुरु उपाध्ये दीपविजये कविराज दुवा सलाम आंकी दरीविला. उदेपुराहून साहेबाची किर्त आइकून आलो. दरशण घ्यावे ही इच्छा फार आहे. हुकूम होईल त्या वेळेस हाजर होईन. श्रीमन माहाराज छत्रपति याची वौंशावळ आहे. भेटीअंती विदित होईल हे दुवा. मिती आस्विन वाा ९ रविवार.

¶*Deepvijaya Kaviraj a family priest of the Rana of Udaipur requests the Governor to grant him an interview.*

---

१ या पुढील मजकूर बालबोधींत आहे.

No. 12] *[21-10-1822*

पौ ता। १ माहे नवेंबर सन १८२२

हू

साहेब मेहरबान करम फर्माय दोस्ता ह(न)-
राबल मौंट इस्टुवार्ट इलफिष्टन साहेब
गवरनर बाहादूर सलामत

६ अजदील येखलास माधवराव अनंत बाद सलाम. अंकी येथील खैरयत जाणून आपली शादनामी हामेशा कलमी करीत आसावी. दरीविला आंसाहेबानी तारीख ९ आकटोंबरचे खत रवाना केले तें पावलें. जंजिरे मुंबईस हाली छापखान्यात माहाराष्ट्र भाषेत पंचोपाख्यान बालबोध लिपीत यंत्रे करून बुके वाचावयास तयार केली आहेत. हा चमत्कार आवलोकनात यावा म्हणौन बुक पाठविले आहे, स्वीकार होऊन मनन व्हावें म्हणून लिहिले ते कलले व बूक पाठविले ते पावले. त्याचा स्वीकार करून बहुत खुषी हासल जाहाली. ज्यांचा जसा महजब त्या रीतीनेच त्यांचे संरक्षण करणे ही बुजुर्गी[1] खुदाने आपल्यास दिल्ही आहे. हारवख्त आपले दानाईची[2] याद होते. हार हामेषा खत रवाना करून मेहरबानगीची तर+क्की करीत आसावें. रा। छ ९ सफर जियादा काय लिहिणे प्यार महबत कीजे हे किताबत.

¶The letter mentions Panchopakhyan as being the first book that was printed at Bombay in the Devanagari types. Madhaorao Anant Raste thanks Elphinstone for a copy of the book having been sent to him.

No. 13] *[1-1-1824*

श्री

विज्ञापना विशेष. कालीचे दिवशीं रोजिट साहेबानी सांगितलें कीं तीा नारायणरायापाशीं शिंदे यांचे बखैरीचे कांहीं बंद राहिले आहे व शिवाजी राजे यांची सगली बखैर राहिली आहे, ते लष्करांत पत्र पाठऊन आणवावे. हर दोनही बखैर मेस्तमारीस साहेबाचा आहे. ते इथें छ ६ जनवारीस येऊन येथील खटल्याचा उलगडा करून घेऊन छ ९ तारखेस निघून विलायतेस जाणार आहेत. त्यास त्याणी हे दा(दो)नही बखैर मागितले तेव्हा त्यास द्यावें लागेल याजकरितां आणवावें म्हणोन सांगितलें. याजकरितां विज्ञापना पत्र लिहून घेतलें आहे कीं सदरी शिंदे याचे बखैरीचे बंद आहेत नाहींत याची तपशीलवार याद

---

१. थोरवी. २ शहाणपणा. + लेखन.

अलाहिदा लिहून पाठविली आहे, ते पाहोन वंद नाहींत याचा शोध करून त्यात बंद जितके असतील तितके व शिवाजी राजे याची बखैर संपूर्ण दोनही लौकर पाठऊन देतसे करावें. कां म्हणाल्यास साहेब मवसुफानी बखर आणविणेविशीं पेशजी येके वेळां सांगितलें होतें; परंतु बालकाचे स्मरणांत राहिलें नाहीं. याजकरितां कालीचे दिवशी फार रागें भरला. यास्तव शिंदे यांचे बखैरीतील कांहीं बंद व शिवाजी राजे यांची संपूर्ण बखैर दोनीही लौकर पाठऊन देतसें करावें अगर बखैर इथेंच ठेविली असल्यास कोठें टेविलें असतील तें सर्व लिहिण लिा पाठवीतसें करावें. विशेष लिहिणेस बालक शक्त नव्हे हें विज्ञापना.

मिति मार्गशीर्ष शुद्ध १० बुधवार शके १७४६
तारीख छ १ माहे जनवरी सन १८२४ इसवी.

¶*The writer probably, a clerk in the Residency at Satara, asks some Satara official to return the few sheets of a bakhar of Sindia and a full bakhar (Chronicle) of Shivaji Raja, which belonged to Mr. Morris and which were given by him to Narayanrao. As Morris was going back to Europe the papers were immediately needed for being returned to the owner.*

No. 14] *[1825*

श्री

जाहीरनामा सरकार दौलतमदार कंपणी इंग्रज बाहादुर सुा सीत अशरीन मयातैन व अलफ. कचेरीचे कामात व अदालतचे कामात तरबियेत लोक हुरमतवाले+ मिलण्याची अडचण आहे, म्हणौन गौरनर कौसलात जाहीर जाले. त्यास सरकारचा इरादा ऐसा आहे की दक्षण व खानदेश नवे मुलकात चिनापटण व गुजराथ वगैरे मुलकातील व दिगर इलाखेतील लोक तलाष करून आणावयाचा नाही; याजकरिता ज्या सुभ्यात राहाणार त्या सुभ्यातच सरकारी कामावर मुकरर करावे म्हणौन, ऐसियास पुणे सुभ्यातील उमेदवार व हुरमतवाले लोकास मालूम होणे बदल कलमी केले जाते जे:—

१ ज्या तेरखेस कमिषनर साहेब पाठशालेत जातील, त्या तेरखेचे इतला केले जाईल. ते दिवसी शालेतील किवा दुसरी खुषबाष उमेदवार वगैरे लोक ब्राह्मण जातीतील किंवा हुरमतवाले मराठे जातीतील अथवा मुसलमान जातीतील सर्वांनी दुसरे कलमात लिहिल्याप्रमाणे मुंबईस जाणारे लोक

+ अब्रूदार.

जमा व्हावें; कारण की उमेदवार हिशेबात व धर्मशास्त्रात व सारेचे कामात व हरयेक भाषेत तयार व्हावयाजोगे बुध्धिमान असतील त्यास मुकरर करून मुंबईत कपतान जरवीस साहेब यांची शाळा आहे तेथे रवाना केले जाईल. ते साहेब पैमायषीचे+ काम व जमाबंदी वगैरेचे हिशेब कितेब व अदालत प्रकर्णी वहिवाट व रिवाज सिकतील त्याचे देखरेख करितील. येणेकडून उमेदवार लोकपैकी जो कोणी दोन तीन सालात मेहनत केलिया सरकार काम करावयाजोगा पुरा तरबियेत होईल, नंतर कपतान जेरवीस साहेब ज्या कामात जो तयार जाहाला असेल, त्यास त्या कामाची तरबियेत जाल्याची पत्रे देतील; म्हणजे मुंबई इलाखेतील मुलकात सरकारकामावर कलकटर साहेब अथवा ज्यडज्य साहेब यांचे इखलासाचे रीत मुकरर केले जातील, तेथे त्याची हुशारी बमोजीब पुढे बढती होत जाईल.

२ सदरहूप्रमाणे हरकोणी उमेदवार जेरवीस साहेब यांचे शालेत राहणेकरिता सिध्ध जाहाल्यास पाठशालेतील मुख्तसर शास्त्री यांजकडे जाऊन आपले नाव व गाव व जात व उमर किती असणेचे सांगावे म्हणजे ज्या रोजी त्याची परीक्षा व्हावयाची असेल त्या रोजी बोलावणी केली जाईल.

३ मुंबईत हरयेक आसामीचे पोटाचे बेगमीस दर महिना आठ रुपये सरकार खर्च करितील.

४ मुंबईस जाणार मुलाचे वडिलास हेच खातरजमा आहे की मुलास मुंबईस पाठवणेकडून काही भय नाही. सरकार कृपाळु होऊन त्याचे चालचलण चांगली असावयाकरिता सरकारातून येक उतम जागा राहाण्यास योजना केली आहे. तेथे काही येक उपद्रव होणार नाही; व ज्या जातीचे असतील त्यास त्या त्या जातीचे नौकरहि ठेऊन देतील. याखेरीज ब्राह्मण वगैरे सदरी हरयेक जातीस त्या त्या जातीचे रिवाजाप्रमाणे कपतान जेरवीस साहेब बंदोबस्त राखितील.

येकूण कलमे च्यार.

¶*This is a Government notification asking for Brahmins and others of high castes to come forth and offer themselves for Government service. The selected candidates will be kept under training in land-survey, accountancy, etc., in a school conducted by Captain Jervis and will be appointed in the Collector's and the Judge's offices. They will receive a stipend of Rs. 8 p.m. while under training.*

+ Land-survey.

No. 15] [1825

श्री

जाहीरनामा सरकार दौलतमदार कंपणी इंग्रजबाहादर सुा सीत असरीन मयातैन व अलफ. तमाम लोकास जाहीर होण्याकरिता लिहिले जाते जे:—या तेरखेपासून दक्षण जिल्हेचे आदालतीत जडजसाहेब किंवा रिजस्तर साहेब आथवा अमीन व मुनसफ हे फी घेतल्यासिवाय अर्ज्या घेणार नाहीं; त्यांचा दर व तपसील येणेप्रमाणे.

बेरजेचे तेरीख

फी घेणेचे

८–	येके+ रुपयाचे अर्जीस
८=	येक रुपयावर दोन रुपयेपावेतो १ २
।·	दोन रुपयावर पाच रुपयेपरियत २ ५
॥·	पाच रुपयावर दाहा रुपये परियत ५ १०
१	दाहा रुपयावर वीस रुपये परियत १० २०
२	वीस रुपयावर तीस रुपये परियत
३	तीस रुपयावर च्यालीस रुपये परयत
४	च्यालिस रुपयावर पनास रुपये परयत
५॥	पनास रुपयावर पाऊणसे रुपये परयंत
७	पाऊणसे रुपयावर शंभर रुपये परयंत
१०	शंभर रुपयावर दीडसे रुपये परयंत
१३॥	दीडसे रुपयावर दोनसे रुपये परयंत
२०	दोनशे रुपयावर तीनशे रुपये परयंत
२५	तीनशे रुपयावर च्यारशे रुपये परयत
३०	च्यारशे रुपयेवर पाचशे रुा परयत
४०	पाचसे रुपयेवर साडेसातसे रुा परयत
५०	साडेसातसे रुपयावर हजार रुा परयत
६०	येक हजार रुपयावरी साडे बारासे परयत

+ संख्यादर्शक शब्दांचे खाली ती ती संख्या अंकांत नमूद केलेली आहे.

7365

७०	साडेबारासे शेवरी पंधरासे पर्यंत
८०	पंधराशे रुपयावरी दोन हजार पर्यंत
९०	दोन हजार रुपयावर पंचवीसशे शे पर्यंत
१००	पंचवीस शे रुपयावरी तीन हजार शे पर्यंत
१२५	तीन हजार रुपयावरी च्यार हजार शेपर्यंत
१५०	च्यार हजार रुपयावरी पाच हजार शेपर्यंत
२००	पाच हजार रुपयावरी साडे सात हजार शेपर्यंत
२५०	साडे सात हजार रुपयावरी दाहा हजार शेपर्यंत
३५०	दाहा हजार रुपयावरी पंधरा हजार शेपर्यंत
५००	पंधरा हजार रुपयावरी पंचवीस हजार शेपर्यंत
७५०	पंचवीस हजार रुपयेवरी पनास हजार शेपर्यंत
१०००	पनास हजार रुपयावरी येक लाख शेपर्यंत
२०००	लाख रुपयावरी जाजती असल्यास.

येणेप्रो इनसाफास ख्वाहीश असणार लोकानी फी देऊन अर्जी गुजरावणेचे आहे.

¶This is a Government notification announcing the charges of court fees fixed for suitors for suits of various amounts.

No. 16]

श्री

यादी गजरा नाइकीण इजला कुणाबिणी पोरी विकत घेता त्याचा दस्तुर पुसता त्याणी सांगितले ते :—

बिा

१ वणजारी बेपारी पोरी घेऊन येतात त्याजवरून आम्ही खरीदीस शंभर दोनसे तीनसेपर्यंत गरजेवर घेतो. काळा दुकालात रुपया दोन रुपये पाच दाहासहि घेतात.

२ पोर कोणते जातीची, म्हणजे बेपारीस पुसतो की ही पोर कोणते जातीची; व पोरीसहि पुसून सयद, सेख, मोगल, पठाण असी सांगितल्यावर शोध करून घेतों.

३ पोरी लाहानहि उमरीच्या वीस वर्षाचे उमरीपर्यंत घेतों.

४ घरात कामकाजास पाहिजे तर तीस च्यालीस वर्षपर्यंतहि घेतात.

५ कोणी एक हिंदूची पोरी असून मुसलमानीन बाटली असी जाल्यास तिलाहि घेतो.

६ ज्या जवळून पोरी विकत घेतो त्याजवळून खरेदीखत सरकारास जाहीर कोतवालचावडीस रुजू करून जकात देऊन घेतो.

७ आपले जवल पोरी असतात त्यातून कोणी उपयोगी नाही असे जाणून तीस दुसरेयास विकतो. व भारी किंमत येत असल्यास देतो.

¶*This is a statement of Gajara Courtezan which shows how the traffic in female slaves was carried on.*

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ३. नं. ८०३
ता.
ठाणे.

No. 17]

२

[पहिला बंद गहाळ.]

३ काळामुळे व राजक्रांतीमुळे आईबाप भाऊ वगैरे पोरी स्वदेशांत व विदेशांत जाऊन विकतात. त्याजवळून जो घेतो तो बटीक म्हणून करितो. तो दार आहे तोपर्यंत तिजला अन्नवस्त्र देऊन काम घेतो. नादार दान जाला म्हणजे तो दुसऱ्यास खरेदीस देतो.

४ अमुक वर्षाची बाइकोस विकावी, किंवा विकत घ्यावी असा नेम नाही.

५ कुणबिणीस पोरगा पोरगी होतात त्यास यजमानाची मर्जी आसल्यास पोरीचे लग्न करून देतात; नसिले तरी तिलाहि बटीक करितात; व पोरगा होतो त्याचे लग्न करून यजमान कामकाज घेतो. पुरुषास विकीत नाहीत. अन्नवस्त्र आहे तोपर्यंत त्यास द्यावे, नाही तरी सोडून देतात, किंवा तो गुलाम कामाचे उपयोगी नाहींसा जाला तरी सोडून देतात.

६ कुणबिणीस विकितात तेव्हा पाचसात वर्षाचा पोरगा अगर पोरगी असल्यास आईबरोबर ज्यास विकत देतात त्याचे घरी जाते. मोठी असल्यास मुलगा आहे तरी विकीत नाही; मुलगी आहे तरी घरी ठेवितो, अगर निराली विकितो.

७ दुसऱ्यास कुणबीण विकितात. त्यास जो विकतो तो अमुक रुपये घेऊन बनाम+ कुणबीन सडी किंवा पोरगी असे लेहून इचा कोणी वारीसदार उभा राहिला असता, त्याचा जाबसाल आपण करून म्हणून लेहून चावडीस रूजू करून हासील घेत होते.

+ नांवानें.

८ कोणाची कुणबीण असोन तिचा सोयरा पैकेकरी असला, किंवा तिणे पैका मेळविला असतां मालकच राजी जाहला तर पैका देऊन सोडचिठ्ठी घेऊन गावात कसब करून राहातात.

¶*This is another paper which gives information about the manner in which the mode of life of female slaves and their progeny was determined.*

No. 18] [*1830*

श्री

अर्जदास्त ते दीपविज्य कविराज विनंती ऐसी जे. चितोड उदेपुरचे सिशोदे राणे व शाहू छत्रपति भोसले सिशोदे राजे त्याचा कुलगुरु वंशावल्या आहो. याचे वडील राजे चितोड उदेपुराहून निघोनं शके ११२६ चे साली दक्षण देसी आले, तो वडील राजे पूर्वीपासून यांची आदिउत्पत्ति वंशावली घेऊन उदेपुराहून आलो आहो, ती साहेबास दाखवावयास मानस आहे; त्यास आज्ञा असावी हे विनंती.

¶*This document shows that the family of the Chhatrapatis of Satara descended from the distinguished royal Rajput family of Chitore and Udaipur. The genealogy of the Udaipur family was brought to Satara for Pratapsingh's inspection by Kaviraj Deepvijaya.*

No. 19] [*18-10-1830*

पान २४.]

" छत्रपति प्रतापसिंह यांचे रोजनिशींतील उतारे. "

पेटा वाई येथील मामलेदार याचे पत्र तेरीख १६ आगटंबर सन १८३० इसवीचे आले त्यात हसील : उमाजी नाईक रामोसी हा नदीपलीकडे साकुर्डी येथे होता. त्यावर कंपणीसरकारची स्वारी येऊन उमाजी नाईक व भोज्या रामोसी आा धरून घेऊन जाऊ लागले, तो त्याचा जमाव येऊन त्यास सोडऊन घेऊन गेले. साहेब लोकास जखमा लागल्या आहेत. रामोसी यांचा जमाव डोंगरात आहे. याप्रो॥ पत्र विनायक कासिनाथ शेखदार याचे आले.

¶*The fight of Umaji Naik, a famous Deccan robber, with English troops and his escape are reported in this extract from the diary.*

पान ६१.] [*15-11-1830*

राबीसन बोले, दोघेहि बोले, विलायेत जावे म्हाराजानी. पाच लाखात होईल. भाडे १०००००, बाकी खर्च शहरी व बादशा वगैरे ४०००००.

7368

आम्ही बोलो की, न यावे आसे नाही; परंतु पैका पाहिजे. व बाकी दिकत नाही व नाही म्हणे आवघड व गेले तरी चिंता नाही. येक धर्मास आवघड. येताना प्राय-श्चित घेऊ. मुलूक पाहिलासे होऊन इंग्रेज साफी हा फायदा व कामे जाहाली काही तरी बरेच आहे.

¶Robinson proposed to Pratapsinh to visit Europe. The cost he said should not exceed 5 lacs of Rupees. The Raja put forth the difficulty of caste but realized the advantages of travel.

पान ६२.] [*16-11-1830*

नाशककरानी ब्राह्मण पाठविला हरिबा मोहिते विद्यमाने की नवा करून देणे. आमी ज्ञाती सुध्धा व शास्त्राधार पहिला आहेच. हाली ग्रंथासुत्धात पार आहो हुकूम येईल तेव्हा. पेशवे गेले, गफलत जाहाली. सबब भरवसा या मुलुकचे ब्रम्हणाचा नाहीं, हे मनी ठेऊन ठरले प्रो कारनाटकी किंवा हिंदुस्थानीं आला, नाही न म्हणता देणे. लेहून पाठवणे ठीक आहे. चालीवर नजर ठेऊन वाकडे न बोलता आपण होऊन बोले. सबब गोड आसे केले.

¶A good Brahman was required at Nasik. A Karnataki or Hindusthani one could be preferred as the Deccani Brahmans could not be trusted. This is an extract from the diary.

पान ७६.] [*26-11-1830*

डाकतर की, आलिपिष्टन गेले ते वेळे बालाजीपंत नातू ब्राह्मण आसून बोला तुम्ही जाता, माजा दावा इकडील ब्राह्मण करिता (त.) मग खातरी केली गवर-नुरानी. मग राहिला. नाही तरी नातू जात होते. तेव्हा म्हाराजाचा व इंग्रेजी द्वेष पका ब्राह्मणाचा आहे हे इंग्रेज मनी आले. देवीने केले काम.

¶An extract from the diary. Balajipant Natu was extremely afraid of his position at Satara when Elphinstone left. He was even prepared to accompany Elphinstone to England. The English knew how Pratapsinh hated the Brahmans.

पान ८०.] [*27-11-1830*

बालाजीपंत नातू ब्राह्मण को(क)णस्त आसून भेतो. इंग्रेजास मिला म्हणून द्वेष. आम्हास तरी थोड राज दिले व बामनी बुडाली ते आमी आलो इंग्रजीकडे सबब. आसे सारे हिंदु व ब्राह्मण फार (मिल?) मराठे हाली परभू खटले* * * * * हा द्वेष मनी.

¶Pratapsinh says that Balajipant Natu is afraid not because he is a Brahman, but because he serves the British cause against his own community.

7369

पान ८८.]

[2-12-1830

जनरेल इस्मितसाहेब यास आम्ही सन्मान्य पत्र दिल्हे आहे. तत्रापि आणखी आमचे मनात आसे आहे की, राबिसन साहेब याणी इंग्रजी सरकारास ल्याहावे की, माहाराज सरकारची मर्जी असी आहे की, जनराल इस्मित साहेब याणी आम्हास लढाईचे प्रसंगात बाजीराव यांचे लस्करात आसता गरदी वेले बच्याव केला. मोठी तारीफ आहे. व आमचे हरयेकविसी उणे दिसू न दिल्हे. मरजी ठेविली. हा त्याचा मोठेपणा फार आहे. त्यास याजकरितां हाली ते विलायतेस जातात त्यास हनराबल कोर्ट डरकटर यास लिहिले जाऊन इस्मित साहेब यांजवर विलायतेस मेहरबानी जाली म्हणजे त्याविसी आम्हास संतोष होईल. आणि आम्ही आसे जाणू की, कंपनीसरकारची व इकडील सरकारची दोस्ती आहे. त्याजमुळे आमचे सांगितल्यावर त्याजवर मेहरबानगी केली आसे जाणू; म्हणजे ती मेहरबानी इकडीस संतोषास कारण आहे. हरगोष्टीविसी ते साहेब फार ल्यायक आहेत हे महशूर आहे. इकडील व त्याचा सहवासहि बहुत दिवस होता त्याजमुळेहि आनुभवास आले आहे. त्याचे बरे होण्याचे आम्ही हमेशा च्याहात आहो. ते आले म्हणजे नेहमी आम्हास स्मरण राहील. सदरहूप्रो राबिसन साहेबानी आम्ही व आपले साहेब आसता बालाजीपंत किंवे हास्ते वाचून दाखविले. बरे आहे, देतो बोलले पत्र. खुषी आहे. व इंग्रजीकडे यादहि पाठवितो. उतर आणवावे.

¶*Pratapsinh expresses in his diary the very high regard he entertained for General Smith who had given shelter to the Raja's family when Bajirao ran away.*

पान ९४.]

[9-12-1830

नारू कासकर याजवल हाटसाहेब बोलत होता दवलतखान रिसालेदार. हासील की, ग्रांटानी मुल्क दिला ते वेले जमाबंदीचे आठरा लक्ष. तेव्हा खर्च इतका नाही, तेव्हाचे आसतील सिलक आसे आम्हास लोक बोलतात आसा साहेब बोले. हे दोघे बोले की, इंग्रेजी राज्य येवढे आसून तुम्ही कर्ज व खर्च कमी करिता व ग्रांटानी जमाबंदी केली ती येक साल जालेचे पुढे कधी चौदा कधी तेरा कधी आठ नऊ दाहा व बारा आक्रा. कमी खर्च करीत नाही, तेव्हा कोठील? मग उगेच राहिला. परंतु हासील. आसे आपले लोक कलविणार नसता व दरसाल इंग्रेजी वकील जमाखर्च पाहातात तसे होते. कोणाचा भरवसा नाही. आपले सर्वास ठात्रे आहे लिहिलेप्रो. सबब आसी चाल ठेविली ही ठीक आहे दाखवणे जमाखर्चाची व वागणे आसेच ठेवावे, सबब लिहिली कलमे.

¶*Pratapsinh complains in his diary that although Captain Grant estimated 18 lacs as revenue from the territory of the Satara Raja, the yearly income has since much dwindled. It has never exceeded 14 lacs and has gone down to even eight.*

पान १२१] [23-12-1830

कंपिनी सरकारची याद १४३ आखची आली तेरीख १७ दिसंबर सन १८३० इसवीची, त्यात हसील. विलायतेस पादशाहाचे सांनिध्य हिंदुस्थान वगैरे मुलकाचा आहवाल वगैरे लिहून सर्वास जाहीर करावयाची पंच मंडळी आहे. त्याणी येक बूक छापून त्याजवर माहाराज सरकारचे नाव लिहून माहाराज सरकारास नजर पाठवावयाकरिता दिल्हे. ते बूक विलायतेस सेक्रटारी म्हणजे चिटणीस आहेत त्याणी माहाराज सरकारात त्या बुकासमागमे येक पत्र लिहिले आहे. ते पत्र व बूक थोर आहे व दुसरे येक लाहाण बूक, त्यात कितेक पातशाहा वगैरे लोकानी त्या पंचमंडळीचे कारखान्यात सालीना खर्च देतात त्याची नावे व जमा-खर्च वगैरे लिहिले आहेत. बूक व त्या कामाची क्यामेटी जाहालेली त्याबदल येक छापलेला कागद याप्रो च्यारी येथे आले ते सातार मुा नारायणराव रैटर आहेत त्याजवल दिल्हे आहेत. ते त्यातील इंग्रजी लिहिलेले आहे मजमू माहाराज सरकारात निवेदन करितील यास्तव त्याचे हवाली केले आहेत. व थोरले बुकात काही पारसीहि छापलेले आहे. यास इन्दाबतू नामे येक मुसलमान काबील त्याणे बहुतेक मुल्क पाहून तो विलायेतस गेला. त्यात कितेक मुलकाचा आहावाल त्याणे पाहून तो माारहि त्यात छापला आहे.

¶A book was presented with a covering letter to Pratapsinh by the British Ministry containing various accounts and subjects; being in English, Pratapsinh gave the book and the papers to Narayanrao writer for translating them. This is an extract from the Raja's diary.

पान १२३.] [24-12-1830

गायेकवाडाचे इंग्रेजास मिळून गायेकवाडास बुडविले. इंग्रेजानी बाहादरी केली. दोन लाख नेमणूक केली. जबरी केली. गायेकवाड चाकर आसून इंग्रेजी वकिलासी मिळून तो मारला गेला. कडीस बडुदे गायेकवाडपासून साठ कोसावर. ज्याने कचेरीत मारला त्यास धरला. कबूल न जाहाला. माजे मनास वाटले मारला, त्याला इंग्रेजानी तोफेचे तोंडी दिला. कशास्तव केले हे न बोला. हा हिया मोठा. आशी बातमी आली. परंतु खरे पुढे समजेल तेव्हा पके लिा. हाली चाकरमाने यास मात्र दहशत की, इंग्रेज पैका देतील, बच्याव करतील, परंतु मारला जाईल. सबब ह्यासी वाकडे चालू नये आसे मनी आले येवडे मात्र हासील साधले. बाकी काही नाही. याप्रो मनी भाव आला तों लिहिला आहे. वाचून चालावे सबब लिहिले जाईल. परंतु आसे करतील त्यास वाकडे होणे पाहून कोलापूरवाले आसी चाल नसता त्यावर जबरी. देवी करील ते खरे.

¶Pratapsinh writes in his diary that he received news of a certain person of the Gaikwads of Baroda having joined the English and ruined the Gaikwad, for a paltry gain from the English.

पान २३४.]

[13-4-1831

उमाजी रामोसी बंड प्रकर्णी इंग्रेजाकडील आबा जोसी यास सांगितले की, इकडून बातमीदार पुरंदराकडे पाठविला होता त्याणे भिकाऱ्याचे सोंग घेऊन डोंगरात गेला. तेव्हा रामोशानी पाहून हा आजारी समजून डोंगरातून उचलून पार करून दिल्हा. याआन्वयें त्याची सावधगिरी आहे व पद्या मारल्यामुळें या सरकारचा भरवसाहि त्याला नाही. व इकडील साहेबसुधा त्याला बातमी कलती यामुळे तो लौकर हाती लागण्याचे आवघड आहे. यानंतर उम्याचे जमातीतील येक रामोसी नऊदाहा कोसावर येऊन निरोप पाठविला की, मला हुकूम होऊन बच्याव जाहाल्यास मा हाजार होईन. हाहि मजकूर जोसी यास कलऊन त्यास येण्यास सांगितले. व निरोप घेऊन जी माणसे पाठविली त्यास सांगितले की, तो होऊन आला तर आणावा म्हणजे त्याचे बच्यावाविसी पाहाता येईल. न आला तर तुम्ही धरून आणावा. याप्रो सांगून ते पाठविले होते तो त्यास आणताना वाटेत साताऱ्यानजीक इंग्रजाकडील लोकानी धरून नेला व बरोबर माणसे होती त्यासहि मारहाण केली. हे समजल्यावर पुन्हा जोसी यास बोलाऊन सांगितले की, असे होऊ लागल्यास या कामाचा उद्योग कसा होईल? आगोदर पद्यावरून उम्याचा भरवसा गेलाच आहे व हे वर्तमान कलल्यावर आगदीच जाईल. आता वर्तमान बातमीदार कसे कलवितील? इकडून राबिसन साहेबाचे सांगण्यावरून येत्न चालविला होता, परंतु पुढे या मजकुराचा ठिकाण लागणे आवघड आहे. हा सारा मजकूर साहेबास लिहून पाठवावा म्हणोन जोसी यास सांगितले.

¶*Pratapsinh mentions in his diary some of the measures he suggested for the arrest of Umaji Naik.*

पान ३०९.]

[28-6-1831

उम्याचा भाऊ कृष्ण्या हजर जाहाला तो बोलला, उम्याची साहा महिने गाठ नाही. इनसाफ करीत आसल्यास मुदा घालावा. नाही तरी सचिवाचे हदेतील वतन व इकडील हदेतील सोडावे म्हणजे गेल्या बंगल्यात उम्या हजर होईल. नाही तरी जे करणे ते करावे. खर्चास देत होते, घेतले नाही. उम्याचा भाऊ आण्या आम्हापासी बोलला, आभये देत आसल्यास उम्या हजर होईल. साहेबास कलविले. उतर केले, वचन द्यावयाचे नाही. उम्या इकडील सिपाई वगैरे लोकास बोलतो, तुम्ही आमचे आंगावर येऊ नये. तुम्हाकडे काही नाही. तुमचे वाटे जाण्याचे नाही. त्याचे कारण दिसते, सचिवाकडे व इंग्रजाकडे इनाम जमिनी आहेत, इकडील हदीत काही नाहीत सबब. आसे आसून साफ इकडे

बोलणे वाकडे नाही व उपद्रव नाही. ते व्हो. परंतु उपद्रव लावला फार रयेतेस पलता पलता. हे बोलणे आगाव खरे आहे.

¶*Negotiations for the capture of Umaji Naik are carried on with his brothers Krishnya and Apya, and are mentioned by Pratapsinh in his diary.*

No. 20]

पान १३

[11-10-1832

गवरनर सो बोलले माहाराज विलायतेस कधी येणार. उत्तर जाले हली या खर्चास ऐवज नाही. पुढे खर्चाचे मानाने पाहू. ग्राट सोने जमाखर्चाचा बोवारा केला, त्यात दरसाल येक लाख रुो राहावी आसे केले होते; परंतु हाली वसुलाचे मानाने खर्चासच कमी येते. कारण धारण स्वस्त व लोकास रोजगार नाही, सबब. सदरहू ताा माार ॥१॥ पैके+ पाहिजे खरे आहे खास व वाटणे कोण करितो. व मनहि मोडले. कोठवर वागावे जपून, सबब आसे बोलो. देवी करील ते खरे. च्यार पाच वर्षे पाहू. मगहि ही तोड निदानी करू. कारण लाभ तारि नाही तरी गरज नाही, हे मनी भाव कलमे.

पान १३

[11-10-1832

गवरनर बोलले माझे मनात माहाराजासी फार बोलावयाचे आहे; परंतु हिंदुस्थानी भाषा येत नाही. आणखी बोलले आलपिष्टन मालकम वगैरे सरदार याणी सांगितल्याप्रोच माहाराजाचे मुलकी इनसाफ इमारत रस्ते वगैर बंदोबस्त फार चांगला आहे. ॥१॥ +किती तारीफ तरी येक दिवस आपले कामास सोडणे घटका नाही. आसे मतलबी गोडं लबाड खास हा सेरा भाव कलम.

¶*Report of Pratapsinh's interview with the Governor, who asked him when he was proceeding to England, is reflected upon in this extract.*

No. 21]

पान १३८

[4-2-1833

बडोदेकर गायकवाड याणी म्हराटे ज्ञातीत फितूर करून काही मंडळी शरीर-संमध करण्याबद्दल लोभ दाखऊन फितऊन नेहले तेविसी बोलणे जाले. ते कुणबी आसता, आमचे ज्ञातीचे लोक फितऊन नेहतात आणि बाटवितात. ते आपले ज्ञातीत मुखत्यार, आमचे ज्ञातीत पडावयाचे कारण नाही, येविसी

\+ येथून पुढें स्वतःचें अक्षर आहे.

पान १४६.] [5-1-1831

जिमिसनसाो बोलले की, शाहजी चांगला आहे, परंतु तुलजाबाई त्यास फार फिसाद सिकिवती. सबब रसिदंट याणी आम्हास लिाे की, बाईस तिचे माहेरी पोचऊन खर्चापुर्ते द्यावे. परंतु दोन महिने वाट पाहून ती चाल नीट न दिसे तरी बाईस पोचऊन देऊ असें बोलले. केसरी भाो मुलाजवल असतो तो फिसादी फार असे सांगितले. त्यावरून बोलले खरे आहे.

¶*Pratapsinh writes in his diary thus : Jameson spoke to Pratapsinh that his brother Shahji was a good fellow but was being misdirected by Tuljabai.*

पान १६९.] [23-1-1831

वाई पेठ्याचे मामलेदाराकडील दोनसे येकहतर व सतर आखची दोन पत्रे आली त्यात हसील. उम्या रामोसी पुरंधरकर याजकडील आहे. आजमासे पनाससाठ पांडवगडचे डोंगरात आले आहेत व उम्या व भवाण्या दोनसे आसामीसुधां मांढरदेवाचे डोंगरात होते. त्याणी गावकरास मारामार केली. त्यांचे पाठलागास सचिवाकडील लोक व पनास आसामी संत्रीसुधां कपतान बेटसाहेब गेले. यांची व रामोसी यांची गोलागोली जाहाली. त्यात दोन आसामी संत्रीस गोलीच्या जखमा लागल्या व रामोसी पाो हेटकरी येक धरिला. काल साहेबानी येथे मुकाम करून आज पाहाटे भोराकडे गेले.

¶*News of trouble caused by Umaji Naik near Wai is extracted from the Raja's diary.*

पान १८६.] [9-2-1831

म्हराठे मुले शालेत विलायतेस जाणे कसी बुध्दि आहे ही पाहाविली. दिले उतर न जावे आसे नाही जावे तरी कारण आहे ब्री जावे, आसे पर्याय तेथील मंडलीचे मनात ब्राह्मणाचे की ही पोर आसून आसी जाहाली, तेव्हां ब्राह्मण आता वाडत नाहीत व बुडवितील व हारिसिंग आमचे हाताखाली त्याचा द्वेष की, माधवराव ब्राह्मण आसून (अक्षर लागत नाहीं). म्हराठ्यास सिकवितो हे दाखऊन फसलो. आमी आसे मनी दावा येईलसे नोव्हतो. परंतु आसी ब्राह्मण चाल. आमचे ज्ञातीविसी साहेब लोक यासी लगत आमची नसावी हेंहि मन फार ब्राह्मण लोकांचे, हे हारिसिंगाने बातमी कलविली. मग काम न पडले हाऊसने सिकवावे लिहिले कोणी व नका सिकऊ तरी न ऐकावे. सबब हारिसिंगाचे हाते माधवराव लिहिविले की तुम्ही मुलास सिकविले ते विलायेत जाणे. जबाब लिहिले यावरून खुष मरजी तुम्हवर जाहाली. सबब माजे दिलात आले ते लिहिले. लिहिणार व

सरकार व मुले गोडी आसे (स)बब लिहिविली पत्रे. आपला मरातब न व्होवा सबब मला सिकऊ नका म्हणतात आसे मनी येईल सबब तोड केली आसी बोलणारास न वलख देता लिहिले. (बरेंच ठिकाणीं अक्षर नीटसें लागलें नाहीं.)

¶*These reflections of Pratapsinh on the advantages or otherwise of Maratha boys going to England for Education, are entered in his diary.*

पान २२०.] [*26-3-1831*

मामानी आपली मुलगी लिहिण्यास घातली व मुलगाही आहेच. परंतु मूल घातली हे ठीक न केले. आमचे मनी होते व चांगले सबब जो मामाची तारीफ केली व मुलीस काही देऊ. गोड वाटेल व सर्वा सांगू आसे करणे व कोणी सिकविले आहे? परंतु शालेस नको. आपले घरी सिकवावे, बायेका सबब.

¶*Khanderao Shirke's daughter was sent to school for education—a course which Pratapsinh disapproved, as he mentions in his diary.*

पान २२१.] [*26-3-1831*

विलायतचे इंग्रज बादशाहाचे एकंदर बावन आसामी वजीर अहेत. त्याणी प्रथम सर्वानी विच्यार ठरविला की, बादशाहाचे खासगीकडे सालिना येक कोट सवा लक्ष रुपये जातात त्याचे हिशेबाची तपशलिवार याद द्या, आसे ठरऊन मुख्य वजीर वसली साहेब याणी या मजकुराची याद बादशाकडे पाठविली. त्याणी जबाब दिल्हा की, पेशजी माजे भाऊ गादीवर होते ते वागले त्याप्रमाणे वागू. याद देणार नाही. याजवर बावनापौ प्रथम या विच्यारात आसून पुन्हा बादशाहाचे बोलण्यास मिळून निराळे जाहाले व चोवीस आसामी वसलीसुधा निराळे जाहाले. तेव्हा वसलीनी सांगितले की, याद दिल्ह्यास चिंता नाही; असे असता माजे बोलण्यावर विश्वास नाही त्यापेक्षा मी काम करीत नाही. याजवरून बादशाहानी आठावीसपौ साहेबास मुख्य विजिरीचे काम सांगितले आणि वसलीकडील काडले व चोवीस आहि कामातून निघाले. या आन्वये मजकूर राबिसन साहेबाकडून कलला. तेव्हा यावरून असे दिसते की, पेशजी बाजीराव कामावर आले तेव्हा नाना फडणीस काम नको म्हणाले. परंतु बाजीराव याणी नानाची बहुत तऱ्हेने खात्री करून प्रमाण दाखऊन काम करावयास लाविले. पुढे नानासारखे (अ)क्षार काढून चिव्या तारखा करू लागले हे त्यास समजताच काम सोडले. याप्रमाणे हिंदुसारखा चालीत व्यत्यय होण्यास प्रारंभ जाहाला असे दिसते, व वसलीनी काम सोडावयाचे कारण असे दिसते की, पुढे वागणुकीस काही सवशय असेल यामुळे असे केले.

¶*Duke of Wellington's removal from the Prime Ministership by the King of England is discussed by Pratapsinh in his diary. His remarks are ingenious.*

7373

पान २३४.]

[13-4-1831

उमाजी रामोसी बंड प्रकर्णी इंग्रेजाकडील आबा जोसी यास सांगितले की, इकडून बातमीदार पुरंदराकडे पाठविला होता त्याणे भिकाऱ्याचे सोंग घेऊन डोंगरात गेला. तेव्हा रामोशानी पाहून हा आजारी समजून डोंगरातून उचलून पार करून दिल्हा. याआन्वयें त्याची सावधगिरी आहे व पद्या मारल्यामुळें या सरकारचा भरवसाहि त्याला नाही. व इकडील साहेबसुधा त्याला बातमी कलती यामुळे तो लौकर हाती लागण्याचे आवघड आहे. यानंतर उम्याचे जमातीतील येक रामोसी नऊदाहा कोसावर येऊन निरोप पाठविला की, मला हुकूम होऊन बच्याव जाहाल्यास मा हाजार होईन. हाहि मजकूर जोसी यास कलऊन त्यास येण्यास सांगितले. व निरोप घेऊन जी माणसे पाठविली त्यास सांगितले की, तो होऊन आला तर आणावा म्हणजे त्याचे बच्यावाविसी पाहाता येईल. न आला तर तुम्ही धरून आणावा. याप्रो सांगून ते पाठविले होते तो त्यास आणताना वाटेत साताऱ्यानजीक इंग्रजाकडील लोकानी धरून नेला व बरोबर माणसे होती त्यासहि मारहाण केली. हे समजल्यावर पुन्हा जोसी यास बोलाऊन सांगितले की, असे होऊ लागल्यास या कामाचा उद्योग कसा होईल? आगोदर पद्यावरून उम्याचा भरवसा गेलाच आहे व हे वर्तमान कलल्यावर आगदीच जाईल. आता वर्तमान बातमीदार कसे कलवितील? इकडून राबिसन साहेबाचे सांगण्यावरून येत्न चालविला होता, परंतु पुढे या मजकुराचा ठिकाण लागणे आवघड आहे. हा सारा मजकूर साहेबास लिहून पाठवावा म्हणोन जोसी यास सांगितले.

¶*Pratapsinh mentions in his diary some of the measures he suggested for the arrest of Umaji Naik.*

पान ३०९.]

[28-6-1831

उम्याचा भाऊ कृष्ण्या हजर जाहाला तो बोलला, उम्याची साहा महिने गाठ नाही. इनसाफ करीत आसल्यास मुदा घालावा. नाही तरी सचिवाचे हदेतील वतन व इकडील हदेतील सोडावे म्हणजे गेल्या बंगल्यात उम्या हजर होईल. नाही तरी जे करणे ते करावे. खर्चास देत होते, घेतले नाही. उम्याचा भाऊ आण्या आम्हापासी बोलला, आभये देत आसल्यास उम्या हजर होईल. साहेबास कलविले. उतर केले, वचन द्यावयाचे नाही. उम्या इकडील सिपाई वगैरे लोकास बोलतो, तुम्ही आमचे आंगावर येऊ नये. तुम्हाकडे काही नाही. तुमचे वाटे जाण्याचे नाही. त्याचे कारण दिसते, सचिवाकडे व इंग्रजाकडे इनाम जमिनी आहेत, इकडील हदीत काही नाहीत सबब. आसे आसून साफ इकडे

बोलणे वाकडे नाही व उपद्रव नाही. ते व्हो. परंतु उपद्रव लावला फार रयेतेस पलता पलता. हे बोलणे आगाव खरे आहे.

¶*Negotiations for the capture of Umaji Naik are carried on with his brothers Krishnya and Apya, and are mentioned by Pratapsinh in his diary.*

No. 20]

पान १३ [*11-10-1832*

गवरनर सो बोलले माहाराज विलायतेस कधी येणार. उत्तर जाले हली या खर्चास ऐवज नाही. पुढे खर्चाचे मानाने पाहू. ग्राट सोने जमाखर्चाचा बोवारा केला, त्यात दरसाल येक लाख रुो राहावी आसे केले होते; परंतु हाली वसुलाचे मानाने खर्चासच कमी येते. कारण धारण स्वस्त व लोकास रोजगार नाही, सबब. सदरहू ता मार ॥१॥ +पैको पाहिजे खरे आहे खास व वाटणे कोण करितो. व मनहि मोडले. कोठवर वागावे जपून, सबब आसे बोलो. देवी करील ते खरे. च्यार पाच वर्षे पाहू. मगहि ही तोड निदानी करू. कारण लाभ तारि नाही तरी गरज नाही, हे मनी भाव कलमे.

पान १३ [*11-10-1832*

गवरनर बोलले माझे मनात माहाराजासी फार बोलावयाचे आहे; परंतु हिंदुस्थानी भाषा येत नाही. आणखी बोलले आलपिष्टन मालकम वगैरे सरदार याणी सांगितल्याप्रोच माहाराजाचे मुलकी इनसाफ इमारत रस्ते वगैर बंदोबस्त फार चांगला आहे. ॥१॥ +किती तारीफ तरी येक दिवस आपले कामास सोडणे घटका नाही. आसे मतलबी गोडं लबाड खास हा सेरा भाव कलम.

¶*Report of Pratapsinh's interview with the Governor, who asked him when he was proceeding to England, is reflected upon in this extract.*

No. 21]

पान १३८ [*4-2-1833*

बडोदेकर गायकवाड याणी म्हराटे ज्ञातीत फितूर करून काही मंडळी शरीरसंमध करण्याबद्दल लोभ दाखऊन फितऊन नेहले तेविसी बोलणे जाले. ते कुणबी आसता, आमचे ज्ञातीचे लोक फितऊन नेहतात आणि बाटवितात. ते आपले ज्ञातीत मुखत्यार, आमचे ज्ञातीत पडावयाचे कारण नाही, येविसी

+ येथून पुढें स्वतःचें अक्षर आहे.

बहुत बोलणे जाले. हा बंदोबस्त कंपनीसरकारातून व्हावा. त्यावरून साहेब बोलले याद पाठवावी. सबब स्मरणार्थ याद पाठविली. त्यात हासील, हिंदु-शास्त्र व वहिवाटीत आपले ज्ञातीत सोयरीक करावी, दुसरे ज्ञातीत करू नये ही चाल आहे. आलीकडे कुणबी वगैरे पैकेकरी होऊन या ज्ञातीत फितूर करून बाटवितात. हे जाहाल्यास धर्म राहाणार नाही. ज्याचे ते आपले ज्ञातीत मुखत्यार, हे आसता कुणबी या ज्ञातीत फंद करितात. त्यास येविसी क्षेत्री आपले ज्ञातीचा बंदोबस्त करितील; परंतु याप्रो काही इकडील हदीत व कांही कंपनी सरकारचे वगैरे हदीत त्याचा बंदोबस्त कंपनी सरकारानी केला पाहिजे; म्हणजे कंपनी सरकारचे मोठेपणास व इकडील लौकिकास नीट. बाजीरायाचे कारकीर्दीस सिर्के माहाडिक यात काही खटले पडले, तेव्हा आमचे आम्हीच आपले ज्ञातीत बंदोबस्त केला. हली इंग्रजी दोस्ती आणि कुणबी आसे करितात. इंग्रजी सरकार कोणाचे ज्ञातीस अटकाव करीत नाहीत, आणि हे लोक जवळ पैका फार जाहला म्हणून आसे करितात. इंग्रजी राज्य मोठे; परंतु सारे साहेब लोक तालिवार आसें नाही. आपलाले दैवाने वगैरे गरीब तालिवार आहेत; परंतु ते साहेब लोक पौ जातीचा कायदा सोडून करू लागल्यास बंदोबस्त होतो. मडम लोकानी फिर्याद केल्यावरून, काले मडमेचे आवलादीचे लोकास मोठे काम मिळू नये, त्याजवरून त्याचा बंदोबस्त केला. त्याप्रोच इकडील बंदोबस्त इंग्रजी सरकारास कर्णे प्राप्त, न केल्यास इकडे बहुत लांछन आहे. या लोकानीं आपले मुलकाची सरहद सोडून इकडील व कंपनीचे मुलकातून या ज्ञातीत फितूर कर्णे नीट नाही. त्यास या ज्ञातीपैा त्याणी जे लोक नेहले ते इकडे पोहोचते केले म्हणजे पुन्हा आसे कोणी करणार नाही. हिंदुस्थानात सिंदे वगैरे कुणबी लोक त्यासहि याप्रो ताकीद जाली म्हणजे तेहि आसे करणार नाहीत. सदरहूप्रो जबाब आल्यास ल्याहावे. कमज्यास्त जाहल्यास रासिदंट याची समक्ष गाठ पडल्यानंतर ठरविण्यात येईल. याप्रो याद स्मरणार्थ पाठविली आसे. ॥१॥ ज्ञातिविसी काही दाखला आमचे व राजकारण व परहाद व ज्ञात मुक्त्यारी सबब अटकाव न व्होवा व बाजीराव वेले जाहाले तुम्ही आसून होय व मडम दाखला देणे, तुम्ही आडवे न यावे. मग मुक्त्यारी म्हणे कसे चालल.

¶*The attempts made by wealthy families like the Gaikwads etc., to effect marriage connections with high Maratha families by offering them money and thus to produce an intermixture of castes are condemned by Pratapsinh who reports them to the Resident and requests him to support the ancient religious customs. This is an extract from his diary.*

No. 22]

पान १३९-१४० [5-2-1833

गायकवाड हा कुणबी आसून मराठी ज्ञातींतील काही लोकास पैक्याची लाळुच दाखऊन फितऊन नेहले आणि बाटविणार याजकरिता येथे आवघी मराठमंडळी जमा करून त्याजपो चिमणापा सिर्के कुटरेकर हली गायकवाडाचे प्रकर्णास मूल; सबब त्यास सांगितले तुम्ही ज्ञातींत नाही. आज साताऱ्याबाहेर जावे. या प्रो सांगून ज्ञातींतून काढून लाविले. आपाजीराव मोहिते याचे चिरंजीव गेले; सबब त्यास ज्ञातीबाहेर म्हणून सांगितले. त्याणी जाऊन बाटल्याचे आगो|दर चिरंजिवास घेऊन आले तरी ज्ञातींत घेऊ आसे सांगितले. त्यास सरकारातून नेमणूक दरसाल २०० रुपये होते ते मना केले. रावजी सिर्के डेरवणकर गेले त्याचे चिरंजीव येथे होते त्यास लाऊन दिल्हे. त्यास सरकारातून नेमणूक रुपये होते ते मना केले. राघोजीराव मोहिते याचे बंधु गेले, त्याजबा त्यास सांगितले तुम्ही आपले बंधूस बाटल्याचे आगोदर आणल्यास तुम्हास ज्ञातीत घेऊ; बाटल्या-नंतर घेणार नाही. आसे सांगून त्यास काढून दिल्हे. त्याची आसामी स्वारात होती ती मना केली रुपये ३००. बाबाजी सुर्वे यास तुरपाचे पागेत आ १९२ रुपये सिधासुधा मना केले. त्रिंबकराव आहिराव याचे चिरंजीव गेले सबब आहेरावाची आसामी दरमाहा ३० प्रो ३६० होती ती बाद घातली. पायदल पौ रावजी मोहिते हे गेले त्याचे कमी ८४ जाले. यो १२४६ बारासे [सेचालीस]कमी जाले. बाकी सारे माहाडिक सिरके भो वगैरे मंडळीस सांगितले कीं आम्हापासी रोजगार मिलावयाचा नाहीं. भीक मागून ज्यास आपली ज्ञात संभालणे आसेल त्याणे साफ बोलावे. ज्यास जाणे असेल त्याणे आज जावे. आटकाव नाही. व जे आसामी गेले त्याचे घरी जेवावयास कोणी जाऊ नये व त्याचे घरी लेकी बहिणी दिल्या असतील त्यास आपले घरी आणू नये. याप्रो सांगितले. नंतर आवध्याने रुकार दिल्हा की याप्रो कबूल आहो. कोठे जाणार नाही. ॥१॥ +सोमवार तारिखेस लिहिला आहे. सेरयातील भाव कलमे हासील कलम

¶*Pratapsinh mentions in his diary that he has excommunicated some persons for having lost caste by contracting marital connections with the Gaikwad family and has stopped their allowances. The bigoted orthodoxy of the Raja's mind is herein clearly visible.*

\+ येथून पुढें स्वतःचें अक्षर.

करून दिला आणि आम्ही जाणतो की ते फार चांगले योग्य मनुष्य आहेत. माहाराजाची चाकरी निष्ठेने करीत असतील. सरकारी रिवाजाचा कागद लिहिण्याची पद्धत व खासगी कागद लिहिण्याची पद्धत वेगळी आहे. त्यास त्यास फार फरक आहे तो त्याणी माहाराजांस विदित करावा.

१ आम्ही इच्छा करितो की माहाराजास भेटावें व थोडेसे लिहीत जावे जोपर्यंत हयात आहे तोपर्यंत.

१ करनेल लाडउइकसाहेबास फार विच्यारले म्हणोन कळविले पाहिजे.

१ करनेल लाडउइकसाहेब हे अलफिष्टेन साहेबास अगर आम्हास जागिरदार प्रकर्णी मार समजावितील तर तो मार समजावयास काही चूक व्हावयाची नाही.

१ मेस्तर मारीससाहेबाची प्रकृत चांगली नाही हे ऐकून दिलगीर आहे. ते माहाराजाचे स्नेही आहेत. ते सिकारीच्या घोड्यावरून पडले तेव्हा माहाराजानी त्यास हात देऊन उठविले आणि त्यास चांगले केले ते विसरणार नाहीत.

१ जे कोणी जुनी मंडली आमचे स्मरण करीत असतील त्यांस पुसले म्हणोन कलविले पाहिजे.

१ येशवंतराव मृत्य पावले हे ऐकून फार वाईट वाटते. ते आलसी व रागीट होते, परंतु अकलवान होते.

१ हे पत्र लिहीत होतो ते समयी न्यूजपेपरात पाहिले त्यात शपटबरपर्यंत सातारियांत पाऊस नाही त्यामुले फार वाईट वाटते, परंतु नंतर पडला असेल असी इच्छा आहे.

काकबरन कंपनी याणी माहाराजास लिा आहे की ग्राटसाहेबानी पत्र पाठविले आणि लिा त्यावरून हा कागद १ फेबरवारी सन १८३४ रवाना केला आहे. माहाराजानी काही आज्ञा केली असतां आम्ही संतोषाने काम करू.

¶*This is a Marathi translation of Captain Grant Duff's very interesting letter from England to Raja Pratapsinh of Satara. The letter evinces the high regard the writer entertained for the Raja.*

पान २२१.

आमरसिंग सिरके कुटरेकर याचे चिरंजीव आबा गायेकवाडाकडे जाऊन सोयरीक केली. सबब त्याजवर ज्ञातीनी वाळीत टाकिले. त्याचे बंधु बाल्याबा नागपुराहून आमरसिंगाचे पत्र सरकारात व खंडेराव मामा यास घेऊन लग्नाकरिता आले. त्यास ज्ञातीनी सांगितले की तुमचे बंधूनी लिहून दिले होते की गायकवाडाची सोयरीक करूं तरी कासीत मात्रागमन केल्याचे पातक, आसे आसून सोयरीक करून बाटले व आणखी मंडलीहि फिताऊन नेहली. त्यास आमरसिंगाने येथे येऊन ज्ञातास रूजू व्हावे म्हणजे होणे ते होईल. ते न आल्यास तुमची वागणूक ज्ञातीत होणार नाही. त्यावरून रावजी सिर्के बोलले आम्ही नागपुरास लिहिले. वडिलाचे पत्र आले कीं नागपुर मुा येजमांनानी सांगितले, तुमचे आबा सिर्के वगैरे मंडळी बडोद्यास गेले ते इकडे आणवावे व देसी मंडळी आसेल ती आणवावी, याकरिता आमचे येणे तिकडे व्हावयाचे नाही. तुमचे लग्नाचे बनून आल्यास करून यावे; नसल्यास निघून यावे. यावरून सातार मुा सरकारानी क्षेत्रिय ज्ञातमंडळी जमा करून विच्यारिले की आमरसिंग याचे चिरजीवानी आसे केले. त्यावरून नागपुरास याद पेशजी पाठविली आहे की आमरसिंग याणी येऊन ज्ञातीस रुजू व्हावे आणि बोलावे; तोपर्यंत तेथे यासी ज्ञातीत वागू देऊ नये. ज्ञातीत जे यास वागवितील ते यासारखेच, तेव्हा तेथे सदरहूप्रो जाल्यास ठीक; नाही तर सारे नागपुरवाले क्षेत्रिय ज्ञातवाले यासी वागणूक करू नये आसे होईल, तेव्हा कसे करावयाचे असा सवाल केला; व सरकार बोलले की आम्ही बोलतो, परंतु कदाचित आम्हीच तुम्हातून जाऊन तिकडे मिळालो तर कसे? तेव्हा ज्ञातवाले मंडळी बोलली नागपूरवाले आसोत अगर सरकारहि आम्हातून गेले तत्राप ज्ञातीविषई आमची खंबीरी आहे. जी याद आमरसिंग याजवो पेशजी गेली त्याजविसी आमची खंबीरी आहे. आम्हास ज्ञातीचे जावसालाविसी ज्ञातिधर्म सोडून साफ वागावयाचे नाही. ॥ १ ॥ +नागपूर बदले तरी ठीक हा निश्चये. जाणारानी जावे. जाऊन बाहेरून खेलला तरी, धाकाकरिता बोलो की मग ज्ञातीत आबरू घेऊन जाईन; व ठरलेले लेहून ठेविले. खासगी रुमालात कपाटात व बक्षीजवल व सर्वानी पतकरले व हे होणे कठिण, परंतु कोण काये म्हणतो किंवा ठरलेविसी दंम व आमी गलो तरी कैसे ठरले प्रो यावरून धाक जाणावा की इतपरयत येका ठरलो, बेबदल होणे कठिण सबब आसे केले व मुलजमा केली की माहिती पुढे चालावी.

+ येथून पुढें स्वतःचें अक्षर आहे.

सं. ३- ८०३

व गोडीबदल जेवण विडे विलायेची दिली व सर्वास कलऊन, साल्हबाईस पोटवण लुगडे चालीचे सनगे व पत्र की ज्ञातीविसी ठरऊन कलवावे; व सरकारमरजी होणे म्हणे तरी हिकडीलविसी मरजीने वागावे म्हणजे आम्हास म्हाराजाजवल विनंती करणे नीट पडेल, आसी गोडी दाब व लोभ भाव ठेऊन केलें. हासील भाव खर्च करणे तरी केला पाहिजे; परंतु आधिक होऊ दिला नाही. आजून कलमे भाव कलम.

¶*Pratapsinh writes in his diary some observations as to the marital connection between Shirke and Gaikwad not allowed by the convention of the community and also to the consequent ex-communication of the former.*

No. 24] *[22-10-1833*

पाहटे उठून नाहण होऊन नित्यानेम करून पोषाख केला. आज काम सुटी सा न पाहिली. कारकुन मुछदी सरदार मानकरी शागीर्द पेशा घर मडली खासे व आपासाहेब व जाहागीरदार लोक पौ रामराव डफले आजारी सबब न आले. बाकी जाहगीरदार अकलकोटकर सुध्धा आले. फौज स्वार १५०० सिबंदी २००० किता घोडी १००० पायदल २००० व शागीर्द पेशा २००० पालख्या २५ म्याने २५ हती ३० रयत लोक २५००० अजमासे व इग्रजी पलटणचे लोक ५०० तोफा २ व गवरनर सालमजकुरी आले नाहीत व प्रथम देवीदर्शन घेऊन रेडा मारला. नंतर स्वारी सीमाउलंगनास चाल्ह जाहाली. लोक मुजरे जाले. व इंग्रजी वकील लाडविक साहेब सालाबादीप्रमाणे सामोरे येऊन वगैरे साहेबलोक स्वारी परतली तेव्हा निरोप घेऊन गेले, व इग्रजाकडील पलटणी लोक व तोफा सलामी केली. तोफाचे बार व रायराव इकडील तोफाचे बार व पायदल लोकाचे बार स्वारी येताना व जाताना याप्रमाणे स्वारी सीमा उलंगनास जाऊन वाड्यांत आली. श्रीदेवीचे दर्शन घेऊन सतका नारळ विडे धान्य वाहाऊन प्रदक्षणा करून नंतर आत खासे मंडलीकडे जाऊन सोने देऊन सतके होऊन विडे दिल्हे. खासे बायकानी वोवालिले. बाली अगठी काढली व सतके परस्परे होऊन नंतर कचेरीस एक दरबार सालाबादीप्रमाणे जाला. सोने आपटे याचे व नजराणे इरादेप्रमाणे मोहरा पुतळ्या होन रुा केले. नंतर त्याच वेलेस ललित देवाचे दरसालप्रमाणे होऊन प्रसाध नारळ घेतले. खारखानदार दरकदार वगैरे कारकून किरकोल मंडली मानकरी पो पाहून वजा व जाहागीरदार यास क्षिरापद व नारळ इराद्याप्रमाणें दिल्हे. येकूण कलमे ३५ पाहिली. देवीकृपेने सारे पार आहे.

¶*This is a description of the way in which the Dassara was celebrated by Pratapsinh at Satara as entered by him in his diary.*

१०८ -३

No. 25] *[1-2-1834*

पो तेरीख १७ जून १८३४.

श्री

माहाराज सरकारास ग्रांटसाहेब बाहादूर यांणी तेरीख २९ डिजंबर सन १८३३ चे पत्र मौजे इंडीग येथून लिहिले त्यातील मजमून.

१ माहाराजाचे पत्र व त्याच (स)मागमे दाजीबा जोसी याचे पत्र या प्रो दोनी पत्रे पावली.

१ माहाराजास पेशजी पत्र पाठविले त्यानंतर राबिसन साहेबाची व आमची येथे भेट जाली. दोन दिवस होते. सातारा प्रकर्णी फार बोलणी जाली आणि जागिरदाराविसी मार आम्ही बोललो आणि येविसी माहराजाची मर्जी काय हे त्यांस विच्यारिलें. त्याणी सांगितले की माहाराजाच्या मर्जीप्रो बदोबस्त करून दिल्हा आहे.

१ माहाराजाच्या लिहिण्यांत फलटणचे जागिरीविसी काही मार आहे असे वाटते, परंतु अद्याप येविसी माहाराजाचा काय मनोदये हे पके समजले नाही व अलफष्टेन साहेब यासहि माहाराजाचा काय मनोदय हे समजले नाही. यास्तव येविसी काही मारची माहिती माहाराजास अपेक्षा असल्यास कलली तर वास्तविक असेल ते लिहून पाठऊ व अलफष्टेन सोहि वास्तविक मार असेल तो लिहून कलवितील.

१ जागिरदार लोकांकडे ठरावाच्या यादी दिल्या त्या ज्याच्या त्यास वेगळाल्या दिल्या आहेत. त्या कशाकरिता की काही बखेडा पडू नये व सर्व नित्याप्रो चालावे, याकरिता ठराव यादी जाल्या आहेत. या करार यादीविसी आमचे अनुमत पूर्वी होते, हलीहि आहे. त्यात भाव की ज्याप्रो इंग्रजी सरकार व माहाराज सरकार तहनाम्याप्रो परस्परे चालतात त्याप्रोच जागिरदाराचे करार यादीप्रो माहाराजानी जागिरदारासी चालावे व जागिरदारानी माहाराजासी चालावे.

१ सातारियाचे मुलकातील खासगी सरंजामी जागिरदार आहेत तो सरंजाम त्यांस यावतजीव चालेल, नंतर माहाराज सरकाराकडेस येईल असे आहे असे आम्हांस वाटतें. या प्रकर्णी माहाराजास याद आम्ही दिल्हीच आहे, परंतु हली पकेपणी स्मरणात राहिले नाही.

१ जमाबंदी कसी होत चालली म्हणोन माहाराजानी लिा त्यांच्याविसी या कागदात मी फार लिहीन तर या कागदात जागा पुरणार नाही. त्यास जमा कमी जाली तर खर्च कमी करून बरोबर राखावें.

१ आम्हास वाटते की हिंदुस्थानची आबादी लौकर होईल, त्याबरोबर माहाराजाच्या मुलकाचीहि सोई सोईनें आबादी होईल.

१ आम्हास व अलफष्टेन साहेबास माहाराजानी शब्द लाऊन लिहिलें असो. आम्हास टपका लिहिला असता आम्ही योग्य आहो.

१ सातारियाचे बरे व्हावे म्हणोन जी मेहनत मी घेतली ती मेहनत असी की माझा खासगत सातारा असता तरी इतकी मेहनत मी घेतली नसती.

१ आमचा आहवाल खासगत आम्ही लिा होता व आमच्याचप्रो बडेसाहेब ही गरीब आहेत म्हणोन लिा होते. त्याविसी माहाराजानी लिा की असे लिा ठीक नाही. त्यास आम्ही लिहिले होते की बडेसाहेबांनी चाकरी फार दिवस केली, तत्रापि त्यास पेनसन मिलत नाही. हे लोक पेनसन मागतात आणि त्यास मिलत नाही तेव्हा त्याचे वरली फिर्यादी करवत नाही व मलाही पेनसन नाही. जखम लागल्यासिवाये अगर बहुत वर्षे चाकरी केल्यासिवाये पेनसिन मिलत नाही. मलाही पेनसन नाहीं हे कशासाठी लिहिले कीं माहाराजाच्या उमेदीचे समाधान व्हावे, म्हणोन लिहिलें.

१ माहाराजास स्मरण असेल की आपली खासगत हकीकत लिहून पाठवा म्हणून लिहिले होते. त्याजकरिता सर्व हकीकत लिहून पाठवीत असतों. ते असे समजून लिहितो की जसे पेशजी मी दरवाज्यावरील धाकट्या बंगल्यात बसून बोलत होतो व जुन्या वाड्यात बसून बोलत होतो, तसीच खासगत भाषणे बोलतो आहे असे समजून लिहिले आहे.

१ माहाराजकू कबु तखतपर कबु खलबतखानेमे कबु काहा हम दोस्तीसे कबु दो बातकी सलामी बोल तेथे कबु दस बात चूप आपनी गपसप बी बोलतेथे. आदतसे आलबत लिखने च्याहिये लेकीन माहाराजकू मालुम है के खुशामतकी बात मेरा दस्तूर नही.

१ कबु माहाराजका घुसा बी मेरे उपर बहुत हुवा होयगा. लेकिन माहाराजने आपने दिलकू पूछना की किस्के करनेसे अछा हुवा. आब माहाराज दुष्मनसे खुशामतसें और बडा आदबसे च्याहाता नयी ईस हूरतके दोस्तीकी खलबत हमने किया नयी.

7381

१ खोटेपणा जो आहे तो त्यांत वाईट होते त्यांस इंग्रजींत वोपन फो (open foe) म्हणतात.

१ आम्ही हिंदुस्थानी व मराठी भाषा विसरलों. आम्हास फार आवघड जाते की दुसऱ्याच्या मनात यावयास व दुभाषास समजावयास अवघड जाते.

१ माहाराजाच्या मनांतील गोष्ट लिहावयास आम्हास कठिण पडते.

१ माहाराजाचे लिहिण्यातील व दाजीबाच्या लिहिण्यातील अभिप्राय समजावयास अवघड जाते.

१ आम्ही माहाराजास लिहून पाठविले होते की आम्हीं कधी कधी लंडन शहरास जात असतो.

१ मेस्तर काकवरनेसो[1] साहुकार यास लिहून पाठविले आहे, या मुलकातील जिनस माहाराजास काही पाहिजे असल्यास सवाई किंमतीच्या किफायतीने ते खरेदी करीत असतात. आम्हीं खरेदी केल्यापेक्षा सवाई किंमत त्याचे खरेदीस कमी पडली. ते आपली आडत मात्र सिरस्तेप्रमाणे घेतात.

१ पेशजी सामान काही कॉकबरनसोनी खरेदी करून पाठविले होते ते माहाराजास पावले. आम्ही खुसी जालो.

१ आम्हीं पूर्वी त्यास खरेदीस पैका पाठविला तो ज्याजती जाला त्यापैा सिलक बाकी राहिली ती आमचे हातात आहे.

१ तुमचे लोक जाणतात की आलफष्टेनसो यास गवरनर जनरल करून पाठवितील असे वाटते, परंतु ही गप मात्र आहे. आमची खात्री आहे कीं सांप्रत ते जसे आहेत तसेच राहाण्याची त्याची इच्छा आहे.

१ आगीचे गलबत चालू जाहाले म्हणजे बोलावणे, आम्ही त्या मुलकास येऊन च्यार महिने सातारियास राहावे असी इच्छा आहे. ते समयी डुकराचे सिकारीस चांगला घोडा घ्यावा.

१ जितका मार राबिनसनसाहेबानी सांगितला तो यैकून समाधान जाहाले.

१ राबिसनसाहेबानी सांगितले की माहाराज वारंवार आमचे स्मरण करीत असतात. हे ऐकूण फार संतोष आम्हास वाटला व राबिसनसाहेब बोलले त्यावरून पत्राचा अभिप्रायही समजला नवता परंतु तोहि समजुतीत आला.

१ ती पत्रे लिहिणाराचे अक्षर आम्हास माहीत जाले की आमचे दोस्त नारायणराव याचे अक्षर आहे. चिटणिसाचे बखरीचा तरजुमा त्याणी आम्हास

1 Cockburn.

No. 26] *[1-7-1834*

तरज़ुमा केला

१ जुलई १८३४.

यादी उदेपूर वगैरे लग्न प्रकर्णी कलमें :

१. शिवानंद शास्त्री यांस उदेपुरास पत्रे देऊन पाठविले होते. त्यांची उतरे व ब्राह्मण मंडलीची पत्रे घेऊन आले, त्याच्या नकला रसिदंटसाोकडे दिल्या व राणाजीच्या तसबिरा आणिल्या त्या दाखविल्या आहेत.

२. मुलीस नवरे पाहावयासी शास्त्री यास सांगितले. त्याणी राणाजीचे भाचे १ व कन्येचे पुत्र १ व येक शरीरसमंधी येकून तीन नवरे पाहून पत्रिका आणिल्या. पौ येकाचे वये लाहान व येकाचे पत्रिकेस बनत नाही. येक कन्येचा पुत्र आहे त्याची पत्रिका मिलते.

३. उदेपूरचे लग्न करावयाचे जाल्यास कलमे :

१. खर्च सात लक्ष रुपयेपर्यंत लागेल त्याची तजवीज.

१. हिंदुस्थानात व दक्षणेत इकडे पहिली चाल असी होती की, सरकारांत लग्न जाले आसता मुलकात इनामदार वगैरे याजवर येकसाला वसुलाची लग्नपटी करावी असी चाल होती. त्याप्रो पटी करावी असे गवरनरसाो ठरल्यास येक वर्ष गेल्यावर दुसरे वर्षी लग्न करावे म्हणजे कर्ज होणार नाही व हालीचे जमाखर्चात पाहून करीन म्हटल्यास मुष्कल. कदाचित लग्नपटीची सला गवरनरसाहेबाची न जाल्यास मग आमचा वसूल आहे यातूनच तजवीज करून करावयास येईल. परंतु त्यासहि येक वर्ष गेल्यावर दुसरे वर्षी होईल म्हणजे ऐवजाची तोडजोड होऊन लग्न व्हावे लागते सबब.

२. उदेपूर प्रकर्णी ठरल्यास उदेपूरचे लोक व समारंभास चंदावरकर वगैरे येतील त्यासमागमे स्वार सिबंदी लवाजमा असेल त्यास दस्तके द्यावी लागतील ती कलमे :

१. चंदावरकर समारंभास बोलवावे असे इंग्रजी सरकारचे सल्यास आल्यास चंदावरास कोणी पाठऊं. ते आले तर ५००० मनुष्याचे दस्तक द्यावे लागेल.

३ ४०३

१. उदेपुराहून नवऱ्यासमागमे जमाव २००० व ते राणाजीचे आप्त सा राणाजींचे भाऊ वगैरे कोणी समागमे येतील तो लवाजमा १००० याप्रमाणे दस्तक द्यावे लागेल.

१. देऊळगावकर जाधवराव व पवार हे इंग्रजी सरकारचे सल्यास आल्यास बोलवावे लागतील. आगोधर त्याकडे कोणी पाठऊ. ते आले तर ६०० मनुष्याचें दस्तक दिल्हे पाहिजे.

३

याप्रों दस्तकाचा आजमास आहे. गवरनरसाहेबाच्या मर्जीस सला असला तर तिकडे कोणी पाठऊ व किती सरंजामानिसी ते येतील हे खास समजेल.

४. उदेपूर प्रकर्णी गवरनरसाहेबाची सला आली तर दोन वर्षे लग्नाचा अवकाश करावा लागेल. कारण की, खर्चाचे यैवजाची तरतूद व्हावी लागली व सिवानंद शास्त्री यास पुढे पाठऊन क्षत्रिय ज्ञातीचे चालीप्रमाणे येकताटी खाणे होण्याचे ठरऊन, त्याचे पत्र आले तर ज्ञाती पौ काही मंडली तिकडे पाठऊ. येकताटी खाना जाला म्हणजे लग्नाचा होईल. यास वर्ष दोन वर्षे आवकाश आहे.

५. मार्गसीर्ष मासी मुलीचे लग्न करू ते समयी यावे म्हणोन गवरनरसाहेब यासी रुबरू बोलण्यात आले होते. त्यास उदेपूरचे ठरल्यास दोन वर्षे आवकाश पडेल आणि गवरनरसाहेब जाणार; तेव्हा मार्गसीर्ष मासी गवरनरसाहेबानी यावें; त्या महिन्यात आपासाहेब माहाराज व बलवंतराव राजे भोसले सेनापति याचे लग्न करू. त्या समारंभास पाच साहा दिवस लागतील.

६. उदेपूरचे करू नये असे ठरल्यास मग पेशजी गवरनरसाहेबासी रूबरू बोलल्याप्रो इकडील मंडलीतच मुलीचे लग्न करू. ते समयी गवरनरसाहेबानी मार्गसीर्ष मासी यावे. शुध पक्षी मुहूर्त नेमिले आहेत. कदाचित विटालसीपणाचा अटकाव पडल्यास मार्गसीर्ष वा पक्षी करू. तोपर्यंत गवरनरसाहेबानी नहरास अगर सातारियास राहावे. मुहूर्तसमयी येथे यावे. आल्यानंतर लग्न समारंभात सूचनेप्रमाणें यावे लागेल. केवळ भेटीप्रमाणें दोन रोजात होणार नाही. आठ दाहा दिवस समारंभास पाहिजेत. येविसी आगाव समजले म्हणजे तयारी खबर माार लिहून पाठऊ.

७. गवरनरसाहेबाचे येणे, लग्नाचे दिवसात आवकाश नसल्यास दसऱ्यास यावे. कारण की गवरनरसाो जाणार सा.

८. मुलीचे लग्नसमारंभास साहेब लोकानी यावे :

१ गवरनरसो	९ मारी सो
२ जरनेल चीप	१० वार्थीन सो
३ रसिदंट	११ निसबट साहेब
४ पुण्याचे कलक्टर	१२ जिमीसन सो
५ सदरलेन साहेब	१३ वडे सो
६ न्यून सो	१४ वार्डीन सो
७ अडरसन सो	१५ समसीन सो
८ करनेल ब्रूक, सोलापूरचे कमांडिंग.	

याप्रमाणे जसे गवरनर साचे युक्तीस येईल त्याप्रो त्यास बोलाविता येईल.

९. उदेपूर प्रकर्णी आमच्या मुलीविसी सला न आली आणि न होय तर पुढील जून महिन्यात सिवानंद शास्त्री यांस उदेपुरास पाठऊ. राणाजीस पत्र देऊ. येकताट होत आसल्यासी काही क्षत्रिय ज्ञातमंडली पाठऊ. येकताट जाले तर इकडील मंडलीच्या मुली तिकडे व तिकडील मंडलीच्या मुली इकडे परस्परे लग्ने होण्याचा सिलसिला ज्यारी ठेऊ, जसे नागपूरचे मंडलीचे घरी आहे तसे.

१०. सदरहू प्रो गवरनरसाहेबाच्या समजुतीत यावयास रसिदंटसाहेब याचा सला आल्यास येथून कोणी गवरनरसोकडे पाठवावयास येईल.

१०

उतम सला कोणती हे कळावे. इकडून कोणतीहि अडचण नाही. असी सला तरी कोणास पुसावी ? असे अकलेचे लोकहि नाहीत.

¶*This is a draft containing Pratapsinh's proposals and arrangements regarding the celebration of the contemplated marriage of his daughter with a relation connected with the family of the Rana of Udaipur. These proposals were to be submitted to the Governor for his approval through the Resident.*

No. 27] [*July 1834*

राणाजीस पत्र. मसुदा

श्री

विशेष सिवानंद शास्त्री इकडून ज्ञातीप्रकर्णी मााराकरिता पाठविले ते दर्शन घेऊन परत आले. त्याणी ज्ञातीप्रकर्णी शास्त्रार्थाचा माार व या वंशांतील असे पूर्व स्मरून बहुता दिवसी इकडे शास्त्रीस पाठविले येणेकरून आनंद जाला. हा

सं. ३ नं. ८०३

मजकूर व आपली सुखरूपता व पूर्ववंशपरंपरा चालीप्रो लोभयुक्त आसीर्वाद सांगून पाठविला ते सर्व श्रवण होऊन भेटीतुल्य लाभ होऊन संतोषाभिवृद्धि आसी जाली की, जसे नंदीग्रामी जो भरतास आनंद तद्वत जाले ते पत्री कोठवर लिहावे ? इकडून पत्र न गेलेवरून चित उद्विग्न फार जाले म्हणून शास्त्रीस भाव सुचविले. त्यास चिताचा धर्मच तसा आहे. आपल्याविसी उत्कंठा व्हावयाचीच. परंतु पत्र न गेले तोहि मार शास्त्री याणी प्रत्योतर केलेच आहे. शरीर-समंधाविसी माराचे सहजी भाव शास्त्रीबावापासी बोलण्यात आला की, इकडील शरीरसमधीयास कन्या द्यावी व करावी त्यास वडिलाचे आज्ञेबाहेर काये आहे ? इकडील मंडळीची तिकडे व तिकडील इकडे व्हावे हे मनोदय इकडीलहि आहे. आज्ञा जाली ती नीटच जाली. या देशचे ब्राम्हणाचा द्वेश कर्माविसी आहे ते नीट करून लिहून कलविता येईल. नंतर तिकडून लिा येईल तसे करिता येईल. उदेपूरचे विस्वासु ब्राम्हण आश्रित आसतील त्याप्रो वैदिक कर्म चालवावयाजोगे व मंत्रशास्त्री आनुष्टानी व जोतिसी मुहूर्त वगैरे सागणार यैसे इकडून लिहिले येताच रवाना होय असे जाले पाहिजे. इकडून खलिता रवाना जाला त्यावरून मर्जीस नीट न वाटल्यावरून हली पत्र लिहून नंतर लिहिले येईल तसे इकडून लिहिता येईल.

आबाजी राजे सिरके व वोसंपन्न सितळप्रसाद शास्त्री, सिवानंद शास्त्रीके बडेभाई व येसरसिंग व बळदी यैसे पाठविले आहेत. इकडील सुखरूपता कलवितील.

¶*This is a draft letter to the Rana of Udaipur regarding the contemplated marriage of the daughter of Pratapsinh with the former's relation.*

No. 28] [*13-10-1834*

[छत्रपति प्रतापसिंह रोजनिशी पान नंबर ४]

हरि त्रिंबकपंत कोणी लुच्या याणे मुंबईहून तुफानी पत्र लिहून डाकेतून पाठविले ते पाहून सेनापतिहाते रसिदंट लाडविक यास दाखविले. त्यात हसील की अदालतीचे साहबाबरोबर कोल्हापुरास आमची रवानगी जाली. तेथून परत आल्यावर गवरनर दापोडीस आले; सबब तसेच पुढे गेलो तो आज्ञा जाली कीं इंदूर देसी जावे. ते समई बहुत येत्न केला की राजश्री बालासाहेब भोसले व गोविंदराव दिवाण किंवा खलोजी लिंगोजी कासकर यातून कोणाची तरी येकांती भेट होईल, त्याजपासी नवल विशेष समजाऊ; त्याद्वारे माहाराजास निवेदन होईल; परंतु भेटीचा योग जाला नाही; आणि आदालतीची मंडळी निकडीने बानकोटास गेली तेथे फुरसत पाहून हे पत्र लिहिले आहे. त्यास हलीचे कायदे

९०५ ३

विदितच असतील. हे पत्र येकांती आपण उभयेता व बालासाहेब पाहून मनास आल्यास येत्न त्वरेने करावा तरी पुढे बहुत उपयोगी पडेल. त्यास मुंबईत डाकतर इसमिटण सो आहेत याचा अत्यंत श्नेह करून घेणे. पत्री लिहितो त्याप्रो साध्य करून घेणे. तो मार रघुनाथ राम जोसी वैद्य हे साहेबाचे कारभारी लोभातील आहेत, याचे हातून परिस्फुट न होता कार्य होईल. त्यास सरकारानी येक पत्र साहेबास पाठवावे की तुमचे कारभारी याचे कारण आहे. त्यास सातान्यास पाठवावे. यात वर्कड आदालतीचे साहेबाचे वगैरे इष्टत्व आनायास होईल. वैद्य यास कोलापुरकर छत्रपति नेणार, त्याचे पूर्वी मुदाम कारकून पाठवावा. हा उद्योग कोणासच कळू नये. आपले बुधीनेच लिा म्हणून पत्र ल्याहावे. याप्रो सरकारचे नावे पत्र; व सेनापतीचे नावे लिो त्यात की बुबासाहेब माहाराज याचे पत्र तुमचे लाखोट्यात भिडले ते येकांती माहाराजास उभय बंधूस समजाऊन त्वरेने करून घ्यावे व गोविंदराव दिवाण यास नमस्कार सांगावा. याप्रो. ॥ १ ॥ कलम.

¶*Extracted from the diary. A treasonous letter was received through post by Pratapsinh and was handed over by him to Resident Lodwick.*

No. 29] [*27-10-1834*

पान १७

जोतपुरचे लाहानसे राज्यास जिंकावयास इंग्रज तयारी करितात असे नाही; परंतु मध्यभागी काही मोठे प्रकर्ण आहे. जेनेकरून सिंधुनदी स्वाधीन होईल आणि रंजितसिंग व सिंधी लोक व रूसचे दरबारास येकदाच धका बसेल व रूसाचा हिंदुस्थानासी संबंध तुटेल. कारण जोतपूरचा मुलुक घेतल्याने त्यास दुपट अवघड पडेल; व विलायेत व इरानाहून खबरी येतात की शाहासुज्याचा मुलुक घेण्यास रूस लवकर येण्याची तयारी करितात; व इरान येक वेळ आटोपले म्हणजे लवकरच हिंदुस्थानावर रूस येऊ लागतील. ॥१॥ विलायतेहून येऊ न देणे हे न लिहिले तेव्हा सारी भुलताप व आता जाहाले तेव्हा जोतपूर हाती लागणे कठिण आहे; व होलकराचे मोघम लिहिले, परंतु जडच लिहिले आहे; व आसे जागोजागी छयावनी आसी न उठू दिलियातहि लक्षण चांगले दिसत नाही. आता मोड जाहाला तरी हे प्रकरण मिटेलसे नाही. पाचसात वर्षात काही तरी ठरते. आम्हासारखे गरिबास आवघड आहे. देवी सर्व काम दये पार करील. बाकी आधार नाही; व बुधी नीट ठेऊ. प्रज्यापालन व स्वधर्म व इंग्रजासी वाकडे न राहणे.

¶*Russian invasion against India through Afghanisthan is alluded to by Pratapsinh in this extract from his diary.*

No. 30] [14-10-1834

(छत्रपति प्रतापसिंह रोजनिशी पान नंबर ६.)

सरहदी प्रकर्णी गवरनर यास पत्रं लिहिले त्याचा तरजमा करणेविसी रसिंदट याजकडे दिल्हे गेले; मागील वहीवर बार केले आहे. ते विसी आज रसिंदट लाडविक येथे आले. तेव्हा बोलले की गवरनरास माहाराजानी पत्र थोडक्यात फार चांगले लिहिले व मजकूरहि माहाराज सरकारचा खराच आहे; व आमी आलो; परंतु वार्डीन याने कौंसलात बेवकुफीने किंवा आदावतीने लिहिला आसेल तो आसो; परंतु लबाडीचा माार लिहिला व कौंसलातून मागील कागदपत्र पाहून हुकूम करावा तो न पाहता गाफलगिरीने वार्डिनाचे लिहिण्यावरूनच लिहिले. त्यास हली मी नहरास गवरनराकडे पत्र बरोबरच घेऊन जाऊन माार समजावीन. नंतर सरकारमर्जीप्रोच होईल यात दिकत नाही, कारण माार खरा आहे. सबब; * * * * * * * * परंतु सरहदीविसी मात्र लागलेच होणार नाही. थोडे दिवसात होईल. मी कंसलात जाईन ते वेलेस उतर येईल. याप्रो बोलले ॥१॥

कौसलात इतकी गाफलगिरी व सुस्ती होण्याचे कारण पुढे होणारासारखी बुधी होती, आसा भाव दिसतो, व धाकहि नाही. कोणी पुसेल सबब वारडिनास वाकडे वाटले तरी आता * * * * करा म्हणज जाहाले हा कलम भाव. व वारडिन लिहितो की ही चुरस या रसिदंट लोकाची आहे. तहनाम्यात जे लागले तेच सरहाद आसे भाव मनी आले का असे हे कोण बोलतो जबरेस.

¶Resident Lodwick promises Pratapsinh to put the treasonous letter of the previous day before the Governor at Mahableshwar writes Pratapsinh in his diary.

No. 31] [31-10-1834

पान २१

रसिदंट लाडविक याजकडे आज किल्यावर गेलो होतो तेथे बोलणे जाले ती कलमे हासील भाव कलम:

१ विलायतेस बादशापासी कारभारीमंडळ होते पहिले, त्याची घालमेल तेथील रयतेनी केली; आमची चाल देसची आहे आसी खबर आहे; परंतु आसी घालमेल व रयेत बेराजी राहाणे नीट नव्हे; व आसे आहे की इछा तृप्त जाली म्हणजे तितका शोध ठेवणे व पहिले बेताप्रो वागणे होत नाही. याजवर इकडून उतर आले कीं पुढे आसे कांही व्हावयाचे आसले म्हणजे त्याप्रो बेगुमाणपणा वगैरे

होते, त्याजवर रसिंदट बोलले खरे आहे. बाजीराव याचे खाऊन आसे बोलत होते, वाकडे त्याप्रो जाहाले. सेवटी आम्ही बोलो सरहाद व हा दस्तआवज प्रो करणे. नवा आणून देऊन हे तुम्हाकडे व ब्राह्मण लोकाचे मनी सरवोपरी नाही. येथील चागल खरे आहे व मी जाणून आहे लाडविक बोले. कलम.

९ राजे व बादशा याणी दुसऱ्याचे स्वाधीन हुकूम ठेविला म्हणजे सदरहू विलायतेचे वर्तमान लिा त्याप्रो होते; व शाहू माहाराजानी पेशव्याचे स्वाधीन हुकूम केला याजमुळे येवढे थोरले राज्यास धका बसला. तो हुकूम आपले घरात ठेविला आसता तर, आजपर्यंत राज्यास धका बसला नसता. इकडून उतर केले की शाहू माहाराजानी पेशव्याचे स्वाधीन हुकूम केला नव्हता, व विश्वासावर गेले हिंदू धरमाने; परंतु त्याणी बेइमानी केली; व दुसऱ्यापासी हुकूम न ठेवणे हे खरे आहे. फौज व खजिना व हुकूम व इनसाफ या च्यार गोष्टी राजा व बादशा याणे आपलेजवळ ठेवाव्या याप्रो सांगितले.

¶*Pratapsinh's conversation with Lodwick is reported in this extract and refers incidentally to the usurpation of power by the Peshwas.*

No. 32] *[31-10-1834*

पान २३

८ किल्यावर रसिदंटाकडे गेलो ते वेलेस त्याणी नाना फडणिसाची गोष्ट काढली. त्यात बोलले की नाना फडणीस फार हारामी होता. तो इंग्रजासी संमध न ठेवण्याविसी फार हुशारीने वागत असे; व तो म्हणत होता की इंग्रजापासी लेखात वगैरे थोडेहि गुंतू नये. कारण त्यांची चाल, थोडेसे सापडले म्हणजे दाबीत दाबीत व गुंतवीत गुंतवीत साऱ्यावर हात घालितात. याजकरिता प्रथमच त्यासी संसर्ग ठेऊ नये आसे म्हणत आसे; व आमची चालहि याप्रोच खरी आहे. या रीतीने घेतले; व तो फार शाहाणा आसे; परंतु प्रकृत थोडी खोटसल होती, व तलेगावचे लढाईचे वेलेस आमचे लोकास बहुत करून इकडील माहितगारी नव्हती आणि सिकस्ती होऊन आमचे लोकाची आबरू फार कमी जाली ॥१॥ यामुळे हुशार होऊन हा पेशवेयावर दावा उगविला; व बाजीराव

मी उतर केले की खरे; परंतु ते वेले आसे होणे हे पापाचे हाती धरले म्हणजे येश येणे कठिण आसे आमचे शास्त्री आहे. हे खरे ते बोले; खरे आहे. कलम.

¶*Conversation between Pratapsinh and Lodwick is reported in this extract in which Lodwick pays a compliment to Nana Fadnis for his shrewd political sense.*

No. 33] [15-11-1834

पान ३३

२ आलपिष्टन साहेब याचे पहिले पत्र आले त्यात आहे की वर्कड संस्थानिकात कमती न दिसता व पेशव्यानी ठेविले होते त्याप्रो न होता व तहनाम्यात आहे की माहाराजाचे खानदान पुरातन हे जाणून बंदोबस्त करून दिल्हा जाईल. याजवरून शाहू माहाराज आस्त जाहाल्यावर आलीकडे ताराबाई आईसाहेब व रामराजे माहाराज यांची कारकीर्द व बाजीराव वसईस जाण्याचे पूर्वी स्वतंत्रपणे वागत होते तेथपर्यंत आलीकडे वसईहून आल्यावर इंग्रजी सरकारची जरब, होती या भयामुळे इकडील वागणुकेत पहिली सिस्त राहिली नाही; सबब वसईपर्यंत इकडील सरकारचा मगदूर व वागणुकेचे वहिवाटेचे कागदपत्र पाहून त्यात व हलीच्यात कम जाजती कोणते आहे हे इंग्रजी सरकारात बोलावयाचे कारण पडल्यास बोलावयाकरिता निवडून ठेविले +काकी खानदानाप्रो दिल्हे [1]सुटवाल व बरकडाहून कमी न दिसता, तरी सिंदे नवाब होळकर बावीकर गायेकवाड नागपुरकर लढाई जाहाली हासील मुल्क किती दिला व मालियत इकडे जिकीर ठेविली किंवा बाहादारी कलम जाहागीरदार हे मोडावे हारयेकाला इंग्रेजी सला, आसे भावना नकलकाराचे बोलणे; परंतु पेशवे जसे चालवीत होते ते व हे इंग्रज कलमे कमी आधिक कलली; आधिक आहे तरी कलली नाही तरी न कलली याप्रो केले आहे. मनात कलम भाव हासील कलम भाव मनचा.

¶*This extract refers to the relations between Pratapsinh and the English as enunciated by Elphinstone in a letter to him.*

३ शास्त्रीमंडळ पौ शास्त्र जाणत्यास कोणी शास्त्रनिर्णय विच्यारिला आसता येथार्थ सांगावा. लोभाने किंवा भयाने किंवा पुसणाराचे मर्जीनरूप सांगू नये. ज्या ज्ञातीस जे विहित व बहुत ग्रंथाची समते असा सांगावा व याप्रा आपण पाहून दुसरे विद्वानाचे समत घ्यावे. याउपर विपरीत शास्त्रार्थ सांगितला आसता त्यास निर्णयाचे सभेत बोलाऊ नये व त्याचा शास्त्रार्थ ऐकूं नये. असे लोकाची सरकार गरज ठेवणार नाही. याप्रो जाहीरनामा करविला. ब्राह्मणाने दहशत व भये ही जावे सांगणाराचे व लबाडासहि आसे फितूर कलवणे की महाराजाची मरजी गेली आसे फितूर लोक आहेत; सर्वास जाहीर कलले हेहि ठीक जाहाले व आमी यामुळेच बोलत नाही; ज्ञाती कलम समत पुसत नाही. कलम भाव हासील लिहिला आहे कलम.

+ सिकत (स्त). १ येथून पुढें अक्षर स्वतःचें.

४ ब्राह्मणपैकी जे मद्य मांस भक्षण करतील त्याजकडे मुदेसुद दोष लागू जाहाल्यास शक्ति पाहून दंड घ्यावा.

¶*The king gives in this extract instructions regarding the way in which justice should be imparted in strict compliance with the Shastras.*

No. 34] [*28-12-1834*

पान ७४

रसिदंट तहनाम्यातील कलमाविसी बोलले. तहनाम्यातील कलमे सरकारची खरी आहेत व आसे होऊ लागल्यास तहनामा कशास पाहिजे. ही कलमे गवरनराचे दिलात खरी आसी आली; परंतु विलायतेचा हुकूम हली असा आहे की लढाईखेरीज घेणे व आपले हुकमाने मुलुक देणे हे या गवरनराकडे नाही. हे कलकत्याचे गवरनराचे हुकमासिवाय नाही; परंतु हली गवरनराकडे मुंबईस मी जातो. तेथे गेल्यानंतर हा सारा माार समजाऊन सरहदी प्रकर्णी व जाहागीरदार प्रकर्णी बंदोबस्त होये आसे होईल.

¶*The king writes that the Resident proposed to go to Bombay in connection with the disputes over boundaries between him and the Jahagirdars. A difference also arose over the terms of the original treaty.*

No. 35] [*2-12-1834*

पान ४८

+लग्नपत्रे डाकेवरून पोहचती करावयाकरिता रसिदंटाकडे उदेपूर व चंदावर व करवीर ही तीन पाठविली. त्याजपौ दोन थैल्या इकडून निरोपाप्रो रवाना केल्या. करवीरकराविसी किंबे हाते सांगून पाठविले की करवीरकरानी इंग्रजीत लिहिले होते की सातारकर आमचे आप्त नव्हेत. आसे ते लबाड मनुष. त्यास कदापि लग्नचिठी माहाराजानी पाठऊ नये आसे आमचे विच्यारास येते. नंतर सरकार मर्जी आसे सांगून पाठविले. ॥१॥ ठीक म्हणून सांगितले व करविरास पत्र लिा होते ती थैली परत घेऊन ठेविली याप्रो केले. कलम.

¶*Pratapsinh sends invitations to Udaipur and Tanjore for the marriage ceremony of his daughter but does not send one to Kolhapur as the king of that place disowns any relationship with Satara.*

+ हे लग्नपत्र प्रतापसिंहाची कन्या गोन्याबाई इचा विवाह रघुनाथराव गुजर याचे पुत्राबरोबर झाला त्या समारंभाबद्दल आहे.

No. 36] [15-12-1834

पान ५७-५८

३ गवरनर क्ष्यार यास पत्र सरहदी प्रकर्णी वगैर ल्याहावयाचे, त्यात ल्याहावयाचे की, हे पत्र पाठविले आहे, येविसी जुने माहितगार बालाजीपंत नातू आहेत यास साहेबानी मुंबईस बोलाऊन विच्यारिले म्हणजे दरोबस्त जुनी माहिती कलवितील व पत्र सदरहु लिहिण्याचा मसुदा रसिदंटानी बालाजीपंत किंबे हाते लिहून दिल्हा. त्यात काही इकडून शोध घातला तोहि रसिदंटानी पुन्हा इंग्रजीत लिहून घेऊन, ठीक आहे म्हणून मसुदा पाठविला किंबे हाते. त्याप्रो ल्याहावयाचे त्यात कलमे :— बिा

१ आलपिष्टनसो विलायतेस जावयाचे पूर्वी इकडून त्याजला पत्र लिहिले होते त्यात मार की तहनाम्या प्रो जे जाहगीरदार इकडे लागले त्याप्रकर्णी कितेक कलमे संशयात्मक आहेत, ती तुम्ही उलगडून द्यावी म्हणौन लिहिले होते, त्याचे उतर समजून आलपेष्टन याणी ते समई पाठविले त्याची नकल हाली पाठविली आहे. त्यास आपले जाणे विलायतेस होण्यापूर्वी आलपिष्टन याणी इकडे लिहून पाठविले त्याप्रो आपण इकडे ल्याहावे.

२ हा मार इकडील ज्यास माहितगिरी आहे त्यास ल्याहावे; परंतु ते या मुलकात आसले तर ल्याहावे. त्याचे मागे कोणास ल्याहावे येविसी इलपिष्टन साहेबाचे पत्र आले, त्यात कोणास ल्याहावे येविसी सला आला होता की जे कामावर आसतील त्यास ल्याहावे. ते समजून चालतील.

३ तहनाम्याप्रो जाहागीरदार बेवारस जाहाल्यास ती दौलत या सरकारात यावी आसे इकडून बोलणे आहे, व जाहागिरीची वहिवाटहि हालपर्यंत इकडील हुकमानेच होत आहे.

४ तहनाम्यासमागमे याद आहे त्यात दरोबस्त मुलुक अकलकोटकर, सचिव, डफले, सेखमिरा, फलटणकर निंबालकर वगैरे कलम साफ असा शब्द लिहिला आहे, तो कशासाठी की इकडील मुलकाप्रोच त्या जाहागिरी आहेत, याजकरिता तो शब्द लिहिला आहे.

५ जाहागीरदारास वस्त्रे या सरकातूनच जाली आहेत व नजराणा व चाकरी या सरकारातच घेत आले.

६ हाली पंतसचिव आहेत यास दतक घेतेसमई त्याजकडून चाकरीबदल ऐवज ठराव करून घ्यावयाचा तो या सरकारातून दरसाल घ्यावयाचा ठरला. दतक घेतेसमई इंग्रजी सरकारचे पत्र सचिव यास आले, त्याची नकल पाठविली आहे त्याजवरून कलेल. याच आन्वये आकलकोटच्या जाहागिरीची दखलगिरी इकडेच आली आहे.

७ सेखमिराची जाहागीर तहनाम्यात लागू नव्हती, परंतु तहनाम्यासमागमचे यादीत त्याचे नाव दाखल केले. कारण की ते या सरकारचे जाहागीरदार सबब यास व पुढें इंग्रजी सरकारची पत्रेहि आहेत.

या अन्वये कितेक संशयाची कलमे आलपिष्टन याणी उलगडून दिल्ही. त्यास आपण या मुलकातून जावयाचे पूर्वी इकडील सरकारासी लेख आहेत त्या प्रकर्णी ही सर्व कलमे उलगडून द्यावी म्हणजे पुढें दिकती पडणार नाहींत. जे कामगार इंग्रजी सरकारचे येतात ते गैरवाकब आसतात. ते तहनाम्यातील इकडील मुलखाचे कलमाविसी दिकती काढतात, सबब उलगडून दिल्हे पाहिजे. ॥१॥ वारसा आसे लिहिले आमी म्हणजे बाकीवर नाही आसे होते. सबब ही आक्षरे गाळली; मागील पुढील कागदास व बोलण्यास आटकाव न व्होवा सबब कले भाव लिहिला.

¶*These are a few extracts from Pratapsinh's own diary in which he states clearly the terms agreed upon with Elphinstone, especially in connection with his powers over the Jagirdars about which a keen dispute had arisen.*

No. 37] [*22-12-1834*

पान ६६-६७

२ पेशजी गवरनर सो लिहिले होते की मी विलायतेस जाणार व मला खर्चहि फार होऊन कर्ज जाले. त्यास माहाराजानी माझे दोन रथ आहेत त्याजपौ येक आथवा दोनी विकत घ्यावे. येविा माहाराज सरकारातून ते वेळेस उतर जाहाले होते की आम्हास लग्नाचा वगैरे जाजती खर्च जाहाला, त्यास हली सोय नाहीं. याजवरून याप्रो गवरनरास लिा होते. येविसी हली उतर आले आहे की माहाराजानी माझे रथ घेतले आसते त्याजपेक्षा हे उतर माहाराजानी केले याजवर मी फार संतोष जाहालो. कारण जमाखर्च पाहून कर्ज न होता व्येवस्थेने माहाराज चालवितात ही फार चांगली चाल, याजवर फार खुसी जाली असे लिा आहे, आसे रसिदंटानी सांगितले. ॥१॥ यातील भाव आपलेकडून जवाब गेला तो लौकिकात खाली पडला आसे दिसू नये व जातीचा थोरपणा की आपले बोलण्याप्रो केले नाही म्हणून वाकडे वाटले नाही. गुणच घेतले व आपला आयब छ पावला.

¶*The Governor requested Raja Pratapsinh to purchase from him his two landeaus as he was sailing home. The Raja had the boldness to decline the Governor's offer on the ground of having incurred heavy expenses on the occasion of his daughter's marriage and of his unwillingness to incur more. The Governor while mortified at being refused, compliments the Raja for the scrupulous economy he observes in the management of his raj.*

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थल प्रत
सं. ३ क्र. ५०३
ता. ....
ठाणे.

No. 38] [22-12-1834

पान ७०

३ बालाजीपंत नातू यास पत्र जरनेल स्मित याचे लष्करात आसता पाठविले. त्यात पेशजी व इकडील मनोरथ सर्व सांगोन नरहर मल्हार चिटणीस पाठऊन आलपिष्टन यास मजकूर कलऊन, इकडील ऊर्जित व्हावे, दोस्ती घडावी आसे बोलून वचन घेऊन आले. त्या भरवशावर स्वस्थ होतो; परंतु आम्हास बाजीरायाने लस्करात आणिले. त्याजवर आलपिष्टन व तुम्ही सातारियास गेला, तेथे फडणीस व खंडेराव सिर्के यासी बोलणे होऊन, वचन पके जाले ती वर्दी येऊन पोहचली. त्या संकेताप्रो संधि पाहून जनरेल स्मित याचे लस्करात मिलावयाकरिता बंधु मातुश्री सुा उभे राहून जरनेलास नाव सांगून भेटलो. त्यांस सांगितले आलपिष्टन याची भेट जलद करावी. करितो म्हणून बोलले. याउपर साहेबास बोलून साध्य जे करणे ते करावे. ॥ १ ॥ तुम्ही आपले से ना ही आमी आलो व याप्रो आलिपिष्टण पत्र तुमचे इमानावर ठेवले तेहि सर्वापेक्षा कमी देऊन नीट वागले आसता आसे तेव्हा विलायतेस येक वेला व भरवसा इंग्रेज चालीचा पका समजला सबब केले तरी होईल. परंतु लाडविक सरहद कायेत केलीयावर करणे सबब दाखविले.

¶*Pratapsinh records in his diary a past incident,—how he was taken by Bajirao in his army and how he sought an interview, with Elphinstone through General Smith.*

No. 39] [17-1-1835

पान ८९

२ गायकवाडाचा जावाई कदम गिरवीचा आपले गावी आला त्याजबरोबर सिपाई आले त्याचा जमादार हुजूर दर्शनास आला होता. कारण त्याचा भाऊबंद या सरकारात सिबंदीत चाकरी आहे, सबब त्यास भेटावयास आला होता तो क्षत्रिय ज्ञातीचा कछवा आहे. त्याणे विनंती केली की आमचे घराण्यापैा कोणी पुरुष चाकरी करिता कोठेहि गेला तरी सातारा माहाराज किंवा उदेपूर राणाजी किंवा कछवा राजा या तिहीखेरीज कोठेच मुजरा जमीनीस हात लाऊन करावयाचा नाहीं आसा शिरस्ता आहे, व घराण्यांतील हुकुमहि आहे. मी गायकवाडापासी चाकरीस आहे, परंतु ते कुणबी लोक सबब रामराम मात्र करितो, मुजरा करीत नाही. आम्हास या लोकानी लाखो रुपये दिल्हे तरी यांची सोयरीक करणार नाही; व याणी आम्हा लोकाची मुलगी मागितली आसता तरवारीसी प्रसंग पडेल. दौलतराव सिंद्याने रामपुरेवाले कछवे यास मुलगी मागितली होती; त्याजबदल कछवे फार

+ एथून अक्षर प्रतापसिंहाचें अत्यंत गिचमीड.

खराबीस आले; व पाच वर्षे लढत होते; व काही मुलुकहि सिंद्यानी घेतला, परंतु मुलगी दिल्ही नाही; व आम्ही आपले ज्ञातीस पोशाख करून ढाल तरवार लाऊन जेवावयास बसावयाची चाल आहे वगैर ज्ञाती प्रकर्णी बोलला. सरकारची व आमची ज्ञात येकच आहे. नंतर त्यास विडे दिल्हे, व आपले ज्ञातीचा सबब त्यास व त्याचे बरोबर दुसरा त्याचाच भाऊबंद होता या दोघास सेलापागोटी पंचवीस रुो प्रमाणे दिल्हे. + ज्ञाती वाटणे व हालके हिंदुस्थानास जात्रे समजात्रे व राजवाडे लोकात लौकिक जावा, सबब खर्च केला सनगे वो. सदरहू प्रो मनचा भाव लिहिला.

कलम.

¶*This entry mentions the family conventions of a certain Kachhva Kshatriya of Northern India of making salute and marriage relations with none but the Satara and the Udaipur ruling families.*

No. 40]

पान ७६ [*1-1-1835*

६ लग्नाकरितां पुण्याची ब्राह्मण मंडळी काही बोलाविली होती. त्यास पुण्यात इंग्रजींतून दक्षणा सालाबादीची आहे, यास चिंतामण दीक्षित चितपावन याणे सातारियास आले याचा द्वेष मनात,—इकडून बोलाविले तरी न आला, द्वेष मात्र—आणून त्याचे दक्षणेस आटकाव करविला. तेथे बालाजीपंत नातू होते त्याणीहि सांगितले, कीं या ब्राह्मणास लग्नाकरिता माहाराजानी नेहले ठेवले होते व याप्रो येथून लाडविक रसिदंटाचे लिहिणे पुण्याचे साहेबास पाठविले. नंतर त्या ब्राह्मणास दक्षणा मिळाली. यांवर हा भाव मंडलीस सर्वास जाहिर जाहाला आहे. देवी कृपेने ठीक जाहाले, की हे आसे कारण नसता द्वेष करता ते व्होऊ नका; नास तरी सरसाक्षी व दस्तऐवज करील,—तरलल बुडवण्याविसी बोलणे जागा, इंग्रेज दाखला सबब भाव लिहिला; हा कलम भाव.

¶*Brahmins invited from Poona on the occasion of the marriage of the Raja's daughter were prevented from receiving Dakshina at Poona by Chintaman Dikshit. They were allowed to receive it through the intercession of Lodwick.*

No. 41]

पान १८८–१८९ [*6-5-1835*

२ विलायतेहून पत्र आले त्यातील मजकूर कोर्ट डरकतरातून पत्र आले की गौवरनर क्लार गेला व याचे नावे पत्र आले की माहाराज सरकारचे मुलकाचा बंदोबस्त व दौलतीचा व आदालतीचा व शालेचा वगैरे हरयेक बंदोबस्त चांगला

\+ येथून हस्ताक्षर प्रतापसिंहाचें.

१ येथून हस्ताक्षर प्रतापसिंहाचें.

आहे व याची खुशी फार वाटली असे लाडविक साहेब याणी सांगत होते व कर्ज करीत नाहीत, व खर्चेहि ठीक आहे, व माहाली जाणे, जमाबंदीस जाणे हे रयेत हावालास ठीक आहे व मेहनत हुशारी व याविसी विलायेतेत फार खुषी वाटली. दरसाल हावाल वकिलाने गवरनरास लिहीत जावे. त्याणे विलायेतेस लिहिणे, +सबब भाव लिहिला की देवीने ठीक केले, व एखादे वेळे लिहिणे जागा जाहाली, ही खुषी वाटली; परंतु फार जपून वागवणे व आकल देऊन देवी कृपेने पार आहे.

९ कोर्ट डकतरातून पत्र आले की जाहागीरदाराविसी माहाराज सरकारचे सरहादीतचे व आमचे हादीत जे मुलुक आसेल तो आमचा, हे कोर्ट डकतर याणी लिहिले. यावरून हे गौरनर याचे पत्र खरे नवे आसे दिसते. कोर्ट डकतर याणी लिहिले हेच खरे. गौरनर याचे हे लिहिणे बाद. ॥१॥ +दमाने केले सबब हे जाहाला नकशा लौकिक राहून; दाबाने नाही तरी आवघड व वकिलास व कोणी जाला तरी बोलणे जागा की तुम्ही जबरे आसून करता. पुढे आसे होते तो-ही लिहिले सबब ठीक जाहाले. कलम.

¶The purport of two despatches from the Court of Directors about the good administration of Pratapsinh and of the boundary dispute between him and the Jahagirdars is recorded in these two entries.

No. 42] *[13-4-1835*

पान १६७

३ सिवानंद शास्त्री पोषाख देऊन उदेपुरास पाठविले, ते पोषाख राणाजीस पाऊन त्यास फार खुशी त्याची याद आली. त्याजवरून इकडेहि फार खुशी जाली. +राणाजीने ठीक केले; व दर कारणास नीट जाहाले. पुढे देवी करील ते खरे. हा भाव कोलापुरावर व इकडील ब्राह्मणावर दाबोण सेवटास नेहणे. देवी कृपा. कलम.

¶Pratapsinh writes in his diary that he sent robes of honour to Udaipur, which were gladly accepted.

No. 43] *[17-7-1835*

पान ३००

तंजावरास आपा भट वालिंबे पाठविले होते. तेथून परत रोजगुा आले त्याप्रकर्णी मजकूर. ९ लग्नाबाा पोशाक आणखी कोणास पाठविले. याणी

+ येथून हस्ताक्षर प्रतापसिंहाचें.

सांगितले उदेपुरास व येथे पाठविले. उदेपूरचे वर्तमान साधन केले हे कसे विचारले, ते ऐकून फार संतोष जाला, फार चांगले केले म्हणोन. करवीर नागपूर हे आपले घराण्यातील, यास पोशाक पा की काये? भटजी बोलले करवीरकर हे कोकणस्ताचे नादाने फार वागतात व वागणूक येक प्रकारची, सबब तिकडे पत्र पाठविण वगैर मार्ग नाही. त्यावर बोलले की चालच तसी, बैदाच जाला आहे. कोणी येथे आकलकोटाची गोष्ट काढली. खासे बोलले ते आपले मंडळीतील नव्हेत. प्रीतभाव व करवीर नीट चाल नाही सबब न पाठविला. आपलेवर प्रीतभाव व उदेपूरपर्यंत पैगाम आपली वोलख ठेविली हे भाव

९ वेदकर्माचा मजकूर ठरला आहे ते भटजीनी सांगितले. येजुर्वेदोक्त कर्म क्षेत्रियास उक्त तोच शिरस्ता उदेपुरी, तसे सातान्यात वगैरे आपले ज्ञातीत होणार; ते बोलले. येथे रुगवेदोक्त आम्ही करितो; परंतु सातान्यास उदेपुराप्रो होऊ लागल्यास त्याची वाक्ये वगैर इकड लिहून पाठवावी, त्याप्रो आम्ही करीत जाऊ, असे लोभयुक्त बोलले व आसे कमजास्त कर्णे जाले तर प्रायश्चित घेऊन आम्ही करीत असतो आसे बोलले. हे+ वैद्य करमे आमी करीत आसता मुख्य जागा ठरेल तरी हे टाकू. वचने लिहिणे हा डाव; परंतु आपले खरे आहे तेव्हा ठीक; परंतु मरम काये की शास्त्र वचन आहे तरी एकू, नाही तरी मात्र ऐकणे नाही. कलम भाव.

१० श्रावणी वगैरे ब्राह्मण व ते येक सभेत बसून सहतंत्र करितात. ब्राह्मणास गाइत्री व क्षेत्रियास सावित्री आसा शास्त्राप्रो क्रम आहे. ॥ १ ॥ +हा वरणधर्म जाणतो न जाणतो हे पाहिले; परंतु ठीक आहे, उतर कलल हा कलम भाव. कलम.

११ आप मंडळीचा वगैर सर्व झाडा लिहून दिल्हा. आपली वंसावली लिहून दिल्ही. + ही जात निरमल पहिलेपासून ते आहेत. वगलेले टाकले आहेत. हे निरमल चाल भाव दाखविला, आमचे मनी दिकत न यावी सबब.

¶*The above entries refer to the inter-relationship between the Bhonsle families of Kolhapur, Nagpur, Tanjore and Satara and to the Raja's attempts to get his sacraments performed in accordance with the Vedic rites.*

No. 44]

पान ३०३-३०४ [*20-7-1835*

२ लाडविक रसिदंट याणी बाळाजीपंत किबे याजबरोबर निरोप सांगोन पाठविला की बाबाजी सुभेदार याणे नूसपेपरात गैरवाका मार वलगना वगैरे छापविला,

---

+ येथून अक्षर प्रतापसिंहाचें.

तेविसी माहाराजानी मनात काही वाकडे आणू नये. कारण नूसपेपरवाल्याची चाल की कोणी काही छापविले तरी ते छयापीत असतात. त्याप्रा खरे मानू होते आसे नाही. ॥ १ ॥ इकडून उतर सांगून किवे बरोबर पाठविले की त्याचे शुभ व अशुभ या दोहींचेहि मनात आणणे गरज नाही. आपली चाल नीट आसून दुसऱ्याने वाईट म्हणाल्यास ते मनास आणावयाची गरज काय? इकडे काही येक मनात नाही. याप्रा सांगून पाठविले आहे. यां लाभाची खुशी व गेलियाची दिलगीर नाही. ईश्वराखेरीज कोणाची गरज नाही. ॥ १ ॥ त्याचे मनात याद पाठवितील ही निकड किंवा रुबरू बोलणे; व छयापले उलट तरी वाकडे, गवर-नरास पत्र लिहिले तरी वाकडे, खटले व खात्री केली की आसे होतेसे नाही, हा भाव.

¶*Lodwick asks Pratapsinh to pay no heed to the adverse criticisms appearing in a newspaper. Pratapsinh writes in his diary that he does not mind what others write or say about him.*

No. 45] *[25-8-1835*

लिा अगस्ट २५-१८३५

इंग्रजी पत्राचा तरजमा नकल

श्री

माझे परम मित्र माहाराज

स्काटलंड देशामधे मुा ईडन या नामेकरून गाव आहे तेथे आगष्ट तारीख २५ सन १८३५ पावेतो सुखरूप आसे विशेष. आपली सुकी(र्ति) व उतम नामना मेळविली आहे, श्रवण करून मला संतोष वाटला तो पत्री दर्शविता येत नाही; व ज्या गोष्टी आलीकडेस माझ्या श्रवणी आल्या आहेत तेणेकरून तर फारच हर्ष जाहाला. लॉर्ड उलियम बेनटिक कलकत्याचे गवरनर जनराल नुकतेच हिंदुस्थानांतून विलायतेस आले आणि आमच्या ऐकण्यात आसे आले आहे की गवरनर जनराल साहेबानी आपले थोरपणाची उतम प्रकारे करून वाखाणी केली व बोलले की श्रीमंत माहाराज आपले रयतेला बहुत सुंदर आणि योग्य आहेत, आपले राज्य मोठ्या दक्षतेने आणि उदारत्वेकरून चालवितात व आपला देश सुरक्षित राखिला आहे. इतके आसून कंपनी सरकारासी आकृत्रिम श्नेह करून मिळून आसतात. याजप्रा मी सदोदित आपेक्षा करितो की जे जे उतरोतर गवरनर जनराल तिकडे येतील त्याणी आपली स्तुति बादशाहापासी करावी, जीपासून मला जन्मवर समाधान होईल.

उत्पन्नाला दर हालका लाऊन वसुलात कमती पडली म्हणोन आपल्यास वाईट व कठिण वाटले त्याचे मी आश्चर्य केले नाहीं. कारण कीं हे गाऱ्हाणे सर्वत्र

+ येथून अक्षर खाशांचें.

पृथिवीवर सारखेच जाहाले आहे. परंतु मला खरा भरवसा आहे की हिंदुस्थानदेश इतर दुसरे देशापेक्षा फार लौकर सुधारेल व हे गान्हाने चुकेल. इकडेहि तसेच आहे * का मी जरी तीन हाजार पाचसे बिघ्यांचा विभागदार आहे आथापि मजकडेहि तोच प्रकार आहे व आमच्याहि देशापासून रागड ? देशपर्यंत लोक हीच हाक मारतात. मला वाटते की मी काही महिनेपर्यंत आणखी आपणापासी असतो तर आपले साहयाने खर्च वगैरे उत्पन्नानुसार न्यायाने आणि सर्वत्र समता राखून कमी मानावर बसवून दिल्हे असते, आसे की सर्व सरकारचे कामदार कचेरीकडील किंवा लढाऊखात्याकडील जे असतील ते आपआपले स्थानासी योग्य असले तर जो बंदोबस्त किंवा वेवस्था नेमून दिल्ही ती पाहून संतोष्ट राहातील. सारे रास्त राज करणारे आहेत तितक्यालाहि प्रथम आपले खा। जे आयत खर्च असतील तेवढे तोडिले पाहिजेत.

जेव्हा माझे पाहाण्यात गोष्ट आली की आपण मजविषई आणि ज्या आगेम्य गोष्टी मनुष्यास पूर्वी कळून यावयाच्या नाहीत आशा विशई मेस्तर आलपिष्टन साहेब यास काही समजाविले, तेव्हा मला वास्तविक वाइट वाटले हे की उगीच वृथा किंवा निंदा करावी या उदेशाने सांगतो असे नाही, परंतु आसे जाणोन की सातारा देश माझा खासगत असता तर इतके अगत्ये केले नसते, परंतु आपले देशाचे सर्वकाळ हित व्हावे म्हणोन इतके लिहिले आहे.

माझे पक्के लक्षात आहे की आपण माझ्यावर पूर्ण भरवसा ठेविला आहे आणि जे आंतर आपले आभिप्रायांत पडते ते ते दुसरे कोणत्याहि गोष्टीपासून नाही; परंतु जे लोक माझे श्नेहातले नसतील आणि आपले शत्रु असतील त्याचे भाषणेकरून कदाचित पडले असावे. इतका दुरंदेसी जरी आहे तथापि मला तसले ग्रहस्ताची नावे दाखऊन द्यावयास किमपि कठिण पडणार नाही आणि मी आझुनहि त्यास बज्यावतो आहे की त्याचे कृत्याविशई मला जितकी माहितगारी आहे तितकी त्यास नाही असो. याविषई आपली पकी खातरी आसावी की मजकडून श्नेहांत किंवा लक्ष ठेवण्यात तिळभर अंतर पडावयाचे नाही. मला पूर्ण भरवसा आहे की जे मी आपणास विस्वासाने सांगेन किंवा उपदेस्टीन त्याचा आपण आपमान करावयाचे नाहीत.

आपले श्नेही आलपिष्टन साहेब यासी येकवेल वर्षापूर्वी दुखण्यापासून आरोग्य जाहले होते, परंतु पुन्हा विक्कातिस्थ आहेत, त्यास दोन वेळा गवरनेल जनरालचे जाग्याची नेमणूक मिलत होती, परंतु त्याणी शरीराचे असमाधानामुले स्वीकारिले नाही. असो ही गोष्ट आपली हितावह जाहली नाही आसे माझे लक्षांत येते, परंतु ते कोणे समई तिकडे येतील आसा भरवसा दिसतो.

7400

सांप्रत लारड आकलंड यास गौरनेल जनराल लॉर्ड विलयम बेंटिक याचे जाग्यावर नेमणूक मिळाली आहे, ते आपले विशाई इकडे परत येऊन खबर देतील त्यापासून मला हार्ष होईल तो आपणास लिहिण्याविषई आनमान करणार नाही. वरकड मजकूर येथास्थित आहे. आम्ही सर्व मंडली इकडे सुखरूप आहो व मोठ्या आदरेकरून आणि परम लोभाने आपला सर्वकाळ मित्र आहे

सही मेस्तर ग्रांडफ.

ता। सांप्रत बैठा पगार किंवा पेनसिल असी गोष्ट कोठेहि नाही. कोणतेहि सरकाराच्याने पेनसल चालवीत नाही. कचित कोठे फार दिवसाचा अवल विश्वासिक चौकसींने उतरलेला मनुष असल्यास ती गोष्ट आलाहिदा आहे.

¶*This is a Marathi translation of Grant Duff's letter to Raja Pratapsing of Satara.*

No. 46] *[12-11-1836*

पान ११

बाल्याबापासी लाडविक साहेब हालीचे तुफानी प्रकर्णी बोलले, कीं संत्री लोक याणी मजपासी कलविले असते तर मी माहाराजाकडे कलऊन मग काये करणे तसे केले असते; परंतु पलटणचे सो लोक यास कलले, तेव्हा मला मधे ठेविता येत नाही. त्यात हालीचे साहेब लोक आलपिष्टन सो वगैरे ते वेलेचे साहेब लोका-प्रमाणे नव्हेत. याचे मनातून दुसऱ्यास बुडऊन आपले सरकारचा फायेदाच करावा हे आसते; व येथील चौकसी होऊन उलबी साहेब वगैरे गेले. हे प्रकर्ण गौरनर साहेबानी येथेच काये ते ठराविले म्हणजे नीट होईल; नाही तर त्याचे मनात माहाराज विलायतेस पाठवितात हा राग आहे व हेहि जाले आहेच. यास्तव त्याणी कलकत्यास हलीचे चौकसीचे प्रकर्ण लिहिणे तर तेथून कसे ठरून येईल व काये होईल याचा नेम समजत नाही. व या कामाचे कसे लेहून येईल हेहि कलत नाही. ॥ १ ॥ यातील भाव व हासील की केले हे आपल्यावर येऊ नये, सबब साफी वाटण्याकरिता हे बोलणे; परंतु मनातील बाहेर पडले व साहेब लोक दिवसेदिवस आसेच फायेदा करणारे यावयाचे; तेव्हा यांची अस्ता धरून तरी उपयोगी काये, हे अगोदरच समजून याद दिल्ही. त्यातच लिहिले आहे की घ्यावयाचेच आसल्यास घ्यावे. इकडून वोड नाही.

¶*Lodwick's interview with Balyaba Senapati is reported in this extract of the diary. The Resident says that the present-day English officials do not possess the broad and liberal outlook which men like Elphinstone and others had of old.*

No. 47] [28-3-1837

पान १०४-१०९

१ रसिदंट बोलले, गवरनराचे मला लिहिणे आले त्यात डाकतर मिलन साहेब व दुसरा साहेब यास माहाराजानी भेटीस व मदतीस बोलाविले की काये; इकडून उतर, तो आलपिष्टनसोंपासून दोस्त, इकडील आहावाल इंग्रजी सरकारात कलविणेकरिता बोलाविले होते.

२ सो बोलले, रसिदंटाखेरीज दुसरे साहेबाचे हाते केल्यास पाचवे कलमाप्रो बरबाद होईल आसे गवरनराने लि॥ आहे. त्यास विलायतेहून जबाब येई तों स्वस्थ असावे ही आम्ही सला सांगतो; नाही तर आसे काही जाले तर राज्य जाईल व माहाराजाची आबरू ती आमची आबरू. इकडून उतर, इंग्रजी सरकारात इकडून बोलण्यास काही दिकत नाही. पाचवे कलम परराज्याविसी आहे. इंग्रज सरकारातच बोलण्यास दिकत नाही. इतक्यावर इंग्रजी सरकारची मर्जी. इंग्रजी सरकारात कळावे म्हणोन सो लोकासी बोललो आसता, आणि पाचवे कलमाचा आंदेशा ठेऊन राज्य घेतल्यास इंग्रज सरकारची मर्जी; परंतु आम्हास इंग्रजी सरकारात मजकूर कलवणे प्रात; व इंग्रजी सरकारचे लाहानमोठे जाहागीरदार व इकडील जाहागीरदार परभारे मुंबई व पुण्यास बोलतात, त्यास पाचवे कलमाची शहा नाही आणि इकडे मात्र येती व पेशजीपासून कारण लागल्यास गवरनरसो यासी रसिदंट ब्रिकसो याचे वेलेस इलपिस्तानसोसी व राबिनसनसो याचे वेलेस मालकंसोसी इकडील कामगार जाऊन बोलत होते ते वेलेस हा पाचवे कलमाचा आंदेशा आला नाही, आणि हली येतो त्यास हे कलम जबरदस्तीचे आहे.

३ सो बोलले, माहाराजानी कलकत्यास अगर विलायतेस जे कांही ल्याहावयाचे असेल ते आम्हाकडे द्यावे; आम्ही पाठविण्यास तयार आहो; परंतु माहाराजानी दुसरे सो लोकाचे हाते आगर दुसऱ्या कोणाचे हाते लिहून पाठऊ नये. इकडून उतर. हलीचा मुकदमा पडला ते वेलेस ते दोन सो लोक व तुम्ही येक येकूण तीन आसाम्यानी चौकसी केली; आणि समजला आसे विच्यारिले तेव्हां आम्ही बोललो की कच्या नकला करून पाठवाव्या म्हणजे दिलात येईल. त्यास कागदाच्या नकलाहि दिल्ह्या नाहीत, व चौकसी जाली हे तुमचे दिलात कसे आले हेहि समजाविले नाही; तेव्हां खरे खोटे कसे समजेल? आमचे माणसाकडून गैरवाजबी जाले आसे इनसाफाने दिसल्यास आम्ही पारपत्य करू, आसे बोललो आसता व इकडून सांगूनहि पाठविले की साहेब पुण्यास जाते वेलेस

साहेबानी भेटून जावे तेहि न भेटता निघून गेले. त्यावरून आम्हास आंदेशा आला, व आम्ही उगीच बसावे तरी कलकत्याचे व विलायतेचे अधिकारी आम्हावर शब्द ठेवितील की आसा मजकूर जाला आसता आम्हास का कलविला नाही, आसा ठपका ठेवितील; मग जवाब काय द्यावा; व तिकडून येखादी गोष्ट टपक्याची, हुकूम आल्यास, पुढे आम्ही इतला केल्यास बोलतील की आम्ही ठरून पाठविल्यावर तुम्ही बोलता. त्यास आता ते कसे फिरेल? नाही तर साहेबानी येक याद पाठवावी त्यात आसा मजकूर लिहिण्यात यावे की कलकत्याहून व विलायतेहून जबाब माहाराजाचे खातरेचा आल्यास ठीकच आहे, नाही तर पुढे माहाराजानी जसा इतला कलकत्यास व विलायतेस साहेब लोकाचे आगर दुसरे कोणाचे हाते करावा तोपर्यंत आम्ही सला देतो. याजवर उगेच राहावे, आसा दस्तयैवज साहेबानी आम्हाजवल द्यावा म्हणजे जबाब येई तोंपर्यंत स्वस्थ बसतो. आसे आसून आम्हास बोलू नका म्हणता, त्यास विलायतेस व कलकत्यास इतला करणे प्राप्त, व तुम्हास आंदेशा कशावरून आला, व येथे आम्ही कैदेदाखल आहो याजकरिता आम्हास तुम्हापासी येणे प्राप्त आहे, आणि दोष नसता दोष लाऊन घेणे आम्हास आसे कर्तव्य नाही.

४ रसिंदट बोलले, हली मोकदमा जाला याची शहा गोविंदराव याजकडे आहे; माहाराज आपलेवर का वोढून घेतात? माहाराजाचा फायदा व्हावा हे आमचे मनात आहे; व चिंतो महिपत याणे आर्जी विलायतेस पाठविली त्याचे उतर आले की नाही? ॥ इकडून उतर कीं गोविंदराव याची संखा तुमचे मनात काय आली आसेल ते न कले; परंतु इकडे मनात काही नाही; व हालकी माणसे दुस्मनी, त्याचे सांगणेवरून शंखा घेणे ठीक नाही. कुशास बहादारी देऊन, त्यास आसामी व बक्षीस देऊन कुशा चाकरी करणार वगैरे त्याच्या चालीच्या जबान्या दिल्या व त्याचे घरी संत्री येणे जाणे होते ऐसे ऐकण्यात आहे, व बाब्या भो याचे बायकोचे बहिणीचा नवरा, त्याणे चोरी केली सबब त्यास फासी दिल्हा हा द्वेष मनांत; हे कोणाकोणापासी बोललाहि होता. त्याच्या जबान्या रुजवाती चौकसीत साहेबाकडे करविल्या, परंतु त्याणी ते वेलेचा माार समजला आस्ता म्हणजे नीट दुष्मनींने केले त्याचे खरे मानणे हे कसे? बाबाजी सुभेदाराचा जबाब विलायतेहून येतो आणि आम्हास मात्र पाचवे कलमाची आडचण; इतके आम्हास मगदूर ठेवीत नाही, याजवरून येकतर्फी आसे दिलात येते.

५ सो बोलले विलायतेचे केले नसते तर हे जाले नसते हे पूर्वी बोललोच आहे, व जाणाराचे नाव काये? इकडून उतर जाले की हे तुम्ही दाहावीस वेला बोलला

हे आमचे दिलात फार आहे. विलायतेचे योजनेपूर्वी तुम्हास विच्यारिले, बदोबस्त खलेलीचा किती दिवसात व मुदत किंवा वहिवाट आहे तसी चालावी; नाही तर विलायेत कलकता कर्णे प्राप्त हे गवरनरासहि कलविले; परंतु काही न जाले, सबब विलायत योजना केली, यास्तव मनात आले आसेल ते करण्यात परक्यासी नाही, इंग्रजी सरकाराचीच आहे, यात पाचवे कलमाची सबब दाखऊन कर्णे आसल्यास मर्जी.

६ सा। बोलले माहाराज आकलवान आहेत, परंतु आपासो। व सेनापति व दिनकरराव याचा सला घेत जावी; नाही तर माहाराज दिवाणे आसे लोक बोलतील. याजवरून उतर जाले की जे वेलेस आमचा व इंग्रजी सरकाराचा तहनामा जाला ते वेलेसहि आम्ही कोणास सला पुसला नाही व पुढेहि पुसावयाचे कारण नाही; व आमचे इंग्रजी सरकारात बोलावयाचे आसेल तेथे बोलू; व वेडेपणा तहनामा घेतला नसता तर कशास व हरवेले आसे का बोलता?

७ आजपर्यंत दोही सरकारची दोस्ती बखलस[1] चालली. आडचण कधीपासून आली येविसी पहिलेपासून दोस्ती बेखलष; परंतु आलीकडे च्यार पाच वर्षापासून व्यत्यय इंग्रजी कामगाराकडून येत चालले. त्यात हली असा मोकदम उत्पन्न केला कीं इंग्रजी सरकारनी आमचे वाजबी देखील समजाविले आस्ता ऐकू नये आसे केले, तेव्हा दुसरा यापरता मोकदमा तरी कोणता राहिला? सबब इकडून गवरनर व कलकता विलायतेस समजोन देणे प्राप्त आहे. याबा। हे (शिक्षा) जाली तरी सोसून घेणे व दोस्ती सा। जातीनेहि कर्णे आसल्यास समजून देणे प्राप्त. परंतु दोष नसता दोष लाऊन घेऊन कोणतेहि कर्णे हे इकडील दिलात नाही.

८ रसिदंटसा। यास सांगतो कीं तुम्हास कांही मजकूर समजोन देणे जाहाला तर येक कलम समजुतीत येण्यास च्यार घटका लागतात, तेव्हां दिलात येते; व लिहून कलऊ म्हटल्यासही किती ल्याहावे. सा। हली सा। लोक यास जाहीर करून द्यावे व त्याबरोबर आणखीहि दोन साहेब लोक इंग्रजी सरकारातून परिनिष्ट साहेब व समजदार आले तरी चिंता नाही. व याप्रा। विलायतेहून व कलकत्याहून सा। लोक आले तरी नीट इंग्रजी सरकारची दोस्ती आहे, सा। ज्या रीतीने मजकूर जाहीर होईल त्या रीतीने करणे प्राप्त आहे.

९ ज्या गोष्टी बोलण्यात व कलविण्यात आले आसे, त्या बोलण्यात आले, आसे आम्ही म्हणाल्यास खरे मान्य होत नाही, हेच कारण हलीचे कलमावरून व वहिवाटीवरून दिसते. सा। लिहिले आहे. हरवेले रसिदंटसा। याचे बोलण्यात

---

१ बे-खलश = बिनदिकत.

येते की बरबादीचे पाचवे कलमाप्रो होईल, आसे गवरनर साहेबाचे लिहिले आले म्हणतात; तेव्हां गवरनर साहेबानी समजोन न घेता म्हटल्यास हे कलम जोरावारीचे आहे. आम्हास केव्हां तरी इंग्रजी सरकारात हेच बोलणे बोलावयाचे; दुसरे काय बोलावे!

१० सयद मीर याचे हातून काय होणार? माहाराज मोठे, तेव्हा मोठे साहेब कोणि केला आसता तर नीट आसे रसिदंट पेशजी व हली बोलले; व त्याजवरून दुसरे साहेब लोक बोलणार केले. त्यास हली आसे बोलतात की साहेब लोक का केले, तेव्हा लाच्यारी आहें.

११ त्रिवर्ग साहेब बंगल्यास आसंता स्वारी गेली होती, तेव्हा संत्रीचे म्हणे रसिदंट माहाराजास बोलले होते: कीं कलकता विलायतेस नेहू. येविसी समक्ष विचारिता रसिदंट बोलले की बोललो नाही, व मला माहीत नाही. संत्री लबाड आहेत. संत्री खुपा सांगतात येविसी चतरसिंग तोतयाने चाकरीचे माणसे फितऊन, त्याजपासून सिकून ज्या कोणास खुना माहीत नाहीत त्या देखील सांगत होता. त्यास संत्रीचे चालीच्या रुजुवाती करून दिल्हा. आसे आसता खरे मानणे व रसिदंटाचेच रुजवातीस खोटे व संत्रीनी तुफान बोलणे कारण गुरु व छावणी बाा द्वेषाने बोलतात हे ज्यानी ऐकिले त्या व संत्रीचे माहितगार लोकाच्या रुजुवाती जबान्या दिल्हा आहेत. आसे लोकाचें खरे कसे मानावे हे रसिदंटाचे कलमावरून इनसाफ मनात येईल.

१२ दसऱ्याचा पोशाख रसिदंटास कळऊन पाठवावयाचा सिरस्ता नसतांही सला घेऊन पाठविला व त्यास सांगितले होते की गवरनर विच्यारतील तेव्हा सर्व आहावाल कळवावा; परंतु पोषाख घेतला नाही व माणसाची गाठ देखील पडली नाही. इकडील माणसाची गाठ न पडे तेव्हा साहेब लोकाचे हाते बोलणे आले.

१३ माहाराज आपले हातपाय तोडून घेणार आसे दिसते आसे रसिदंट बोलले. त्यास उतर जाले की येकपक्षी समजून तसे बोलणे व लिहिणे व इनसाफी न ऐकणे व करण्यात वगैर काही हुरमत राहिली नाही. चपराशाइतका मगदूर राहिला नाही ही गोष्ट बिनतोड आहे.

१४ इकडून तहनाम्यात व लेखात व्येत्यय आसल्यास सरकारची चाल नाही व आसे इकडे साधनहि कोणते हे मनात न येता व इंग्रजी सरकारचे आज कोणते गोष्टीने कमी नाही हे मनात न येता, इंग्रजी सरकारातून तह-लेखात

व्यत्ययाचा उपक्रम वार्डिन याणे समजाविले ते मनन करिता आणिले हे कारण नसता तिकडून जाले व हलीहि तिकडून येतात. उलगडा होत नाही; नेम समजत नाही, सबब विलायतेस पाठवणे केले. येविसी बोलण्यात येते की विलायतेचे केले नसते तर आसे जाले नसते, आसे जोरावारीचे कधीहि बोलणे प्राप्त.

१९ शाहू माहाराज आलीकडे इकडून इंग्रजी सरकाराखेरीज दुसरीकडे दोस्तीची रव्वा[१]सा पटविली नाही. सर्व भरवसा इंग्रजी सरकाराचे दोस्तीवर. त्याला हे आसे निमित्य जाले तेव्हा येविसीची साफी जसी होईल तसी इंग्रजी सरकारचे घरी बोलून केली पाहिजे हेच दिलात आहे.

येकंदर मजकूर लिहिला आहे त्यास कागदपत्र व इनसाफ व चाल व प्रसंग न पाहाता गैरचालीचे हालके माणसाचे खरे मानूण येकतर्फी दिलात येऊ लागल्यास जबरदस्तीचे आहे. याजकरिता गौरनर कौसल व कलकता व विलायतेस कोठें पाठवणे आसेल तेथे ही याद मराठी लिपीची नकल ठेऊन आसल हीच आसी इंग्रजी तरजमा करून पाठवणे जाहाल्यास आक्षरशाहा होऊन त्या तरजम्याबरोबर ही हिंदवी याद जावी.

¶*This is an important extract from Pratapsinh's Diary defending his position against charges brought against him and proposing to despatch his own agent to Europe to explain his grievances to the Home Government. The dispute started with the doubtful meaning of the fifth clause of the treaty of installation.*

No. 48] *[29-3-1837*

पान ११३–११७

रसिदंट लाडऊक साहेबाकडे तारिख २३ मार्च छ १९ जिल्हेज नंबर १९९ ची याद इकडून गेली. नंतर त्याणी सेनापति यास बालाजी कासी किबे याचे हातून निरोप पाठऊन बोलाविले. त्याजवरून तारिख २९ रोजी सेनापति व सेनाकर्ते गेले, तेथे बोलणी जाली ती :—

कलम.

१ साहेब बोलले गवरनर सोांचे पत्र मोकले आले आसा कायदा नाही. हे मगरुरीसारिखे दिसते व मी वाचून पाहिले. सेनापति बोलले तुम्ही वाचून पाहाणेकरिता मोकले पाठविले. थैली करून पाठविली तर तुम्ही फोडून वाचून पाहणार सा आसे केले. ते बोलले काही कलमे कलमेवारी आहेत, व काही कलमे पेशजी लिहिली तीच पुन्हा लिहिली, याणे मजकूर फार जाला. याचे कारण दिसत नाही, त्या कलमाचा तपसील.

---

[१] चाल, रीत

१ माहाराजानी दोन साहेब लोक चौकसीकरिता आले होते त्याजपासी जबानीच्या नकला हिंदवी करून मागितल्या. त्याणी देतो म्हटले, परंतु दिल्या नाहीत हा मजकूर ठीक आहे.

२ साहेब बोलले चौकसी त्याणी केली त्यात खरेखोटे हे कांही माहाराजास कलविले नाही हे कलम चांगले आहे.

३ माहाराजानी त्यास पुन्हा भेटीस बोलाविले, परंतु ते न भेटता गेले हेहि कलम चांगले.

४ साहेब बोलले इंग्रजी सरकारसी दोस्तीची ख्वाहिष आहे, दुसरी कांही दिलात नाही; व शाहू माहाराजापासून दोस्तीचा सिलसिला आहे हे कलम फार चांगले.

५ टपका न घेता कोणतेहि जाल्यास नीट नाही. तरी टपका घेऊन कर्तव्य नाही, येविसी इंग्रजी सरकारात आम्हास बोलणे प्राप्त म्हणून लिहिले हे कलम चांगले आहे.

३ साहेब बोलले गोविंदराव याजवर शहा आहे, याजकरिता मी माहाराजास बोलो की येक हात गुंतला, दुसरा हात तोडून घेऊ नये; कारण येक वेल चौकसी जाली यात येक हाताचा उलगडा जाला. पुन्हा माहाराज मिलन साहेबास बोलण्यात घालतात तेव्हा दुसरा वाद उत्पन्न होईल, या भावाने मी बोलो. याजवर सेनापति बोलले, तुमचे बोलणे माहाराजास कशावरून समजेल, याबदल जबान्याच्या नकला मागितल्या. तुम्ही म्हणाला की सुभेदार लोक याणी क्रिया केली, त्यास ती गोष्ट खोटी कसी होईल ? तेव्हा आम्ही बोललो आम्हास साफ खोटी वाटती. कारण पूर्वी हे सुभेदार मजकडे सिवानंदशास्त्रीचे पत्र घेऊन आले तेव्हां लाखोटा फोडून माझे हतात दिल्हा; तेव्हाच आम्ही बोललो की कर्नेलसो देखील आमचा लाखोटा फोडीत नाहीत आणि तुमचे कारण काय? तेव्हा ते सुभेदार लोक बोलले की आमचेहि पत्र त्यात होते सा। फोडिला. त्यानंतर पाव घटकेने बोलले की आमचे कांही येकांती बोलावयाचे आहे. आम्ही बोललो कीं येकांती बोलावयाचे आमचे काय कारण आहे ? मेजरसोचे पत्र आणले म्हणजे काय तुमचे बोलणे किंवा काम करून देऊ. तेव्हा संत्री लोक पुन्हा बोलले कीं ते कांही नाही, आमचे येकांतीच बोलावयाचे आहे. आम्ही त्यास बोललो की आम्ही तुम्हासी येकांती बोलावयाचे नाही. नंतर विडे आणून दिल्हे ते वेलेस आर्धली हावलदार आणखी पाचच्यार आसाम्या होते, हे आपणाकडील सुभेदार लोक याची आम्ही येकांती बोललो आसतो, तरी आसेच तुफान होते, व आसे लोक तुम्हाकडील येऊ द्यावे तरी आसी आडचण, न येऊ द्यावे तरी येऊ न दिल्हे ही आडचण, त्यास आसे लोक घरात घुसून लोकाचे घर फार बुडवितील; तेव्हा या लोकाची आम्हास शफेत

देखील प्रमाण नाही; व आंतू घारया हा तुमचे लस्करात राहणार व तुमचे सुभेदार व घारया तुम्हास सांगतो ते तुम्हास खरे वाटते; व पेशजी ग्रांट सो याचे वेळेस आमरसिंग सुभेदार होता ते वेळेस चतेरसिंग याचे बंड जाले होते तेव्हा मजपासी बोलला की या बंडास तुम्ही सामील व्हा म्हणजे माहाराजाचे राज्याचा आर्धा हिसा मिळेल. त्यासहि आम्ही बोललो की ही गोष्ट तुम्ही आम्हापासी बोलू नका. तुम्ही आपला पाहारा करा. तेव्हा आसी जी माणसे त्याचे खरे कसे मानावे? व कोणते वेळेस काय करतील व काय बोलतील आणि क्रियाहि करितील हा सत्यपणा कशावरून वोळखावा?

४ साहेब बोलले, आम्ही चौकसीचे वेळेस माहाराजास व तुम्हास आंतस्त इषारा केलाच होता की हे सुभेदार आमके दिवसी माहाराजाकडे आले व माहाराज काम कोणते करीत होते व मंडळी कोण कोण जवळ होती आसा त्याचा इषारा केला हे लिहिण्यात ते वेळेस का न आले. याजवर उतर. हे कायदे इंग्रजी सरकारचे कामगारास माहीत आम्हास काय माहीत. फंदफितुराचा त्याचा मुदा पता व दस्तैवजानिसी खरा साबूत जाल्यास ते कलम मात्र आम्हास समेजते.

५ साहेब बोलले माहाराजाचे वाकडे मी आपले समोर करून घेणार नाही, परंतु माहाराजाचा दील आमचे ठिकाणी नाही. त्यास आमचे मागे काये होणे ते होऊ. इकडून उतर सेनापतीने केले की मर्जी साहेबाची.

६ साहेब बोलले, आम्ही माहाराजासी बोललो की आपासो व सेनापति व दिनकरराव यांची सला माहाराजानी घेत जावी. कारण येखादे वेळेस आकलेस कमज्यास्त होते; सा। मी आसे बोललो. सेनापति बोलले मर्जी.

७ साहेब बोलले, यादीत पेशजी मजकूर लिहून गेलेला आहे, सा। या मजकुराचे माझे नजरेस येत नाही. सेनापति बोलले आपण यातील जी कलमे तरजुमा करून पाठवावयाची आसतील ती पाठवावी; परंतु आमची हीच याद हिंदवी नकल ठेऊन हीच आसल पाठवावी. त्यावर सो बोलले, दोनतीन रोज पाहून मग तुम्हास बोलाऊ. मग काय करणे ते करू.

८ उदेपूरची येक दोन पत्रे वाचून पाहिली, आणि बोलले की मी सारे वाचून पाहतो.

९ सो बोलले, बाबाजी सुभेदार याचे कलम मी बोललो तेंहि लिहिले. याणे मजवर लबाडकी यावी आसे लिहिले. त्यास हे आमचे सरकारात कळल्यास नीट नाही. सेनापति बोलले यातील हासील की आशा हलके माणसाचे देखील दाद लागती या परियायान लिो.

१० सो बोलले, मिलन सो वगैरे कोणी बोलणार केले आसता पाचवे कलमाप्रो होईल की कसे ? सेनापति बोलले की बाळाजीपंत किबे आपले आहेत; आणि त्याचे हुकुमात मला वागावयास सांगितले; आणि त्याणी मजवर जुलुम केला; आणि मी तुम्हापासी फिर्याद केली, तरी मी परक्यापासी गेलो आसे होते की काये? तेव्हा याजवर पाचवे कलमाचे कसे? याजवर त्याणी काही उतर केले नाही.

११ सो बोलले, स्वारी प्रतापगडास कधी जाणार ? आणि गेल्यावर गवरनराची भेट जाली म्हणजे ठीक; नाही तर माजूरपणा येतो. त्याणी न घेतल्यास माझोरपणा त्याजकडे. उतर कानावर घालून कलऊ.

१२ त्याणी सारी याद किबे याजकडून वाचून अर्थ समजोन घेतला, त्याची उतरे केली. जी समजली नाहीत, त्याची उतरे काही केली नाही.

¶*This is a report entered by Pratapsinh in his diary, of a conversation between Resident Lodwick and the Senapati on the memorandum submitted by Pratapsinh. Lodwick approved some of the articles in the memorandum and disapproved of the defiant attitude towards the Governor, entertained by Pratapsinh.*

No. 49] *[3-4-1837*

पान १२०

सदरी मजकूर लिहिला ते वेळेस रसिदंट लाडऊक याचे व सेनापति व सेनाकर्ते याचे आणखी बोलणे जाले, ते बोलणे तेडीचे फारच बोलले. बुडेल म्हणून वगैरे; व येविसी रंगोबाकडे सांगून पाठऊन, निरोप आणऊन, व याचे जसे ठरेल तसे.

१ मिलन सोची खबर पकी आणावी की याद तुम्हाकडे गेली आसली तरी न घेणे खास आसे. त्यास तुमचा पकेपणा कसा आहे हे कळावे म्हणजे याद माघारी आलेली, घेत नाहीत सा ठेऊ. आणि येथे बोल्ह की मिलणाकडे याद पाठविली त्यास तुम्हाकडून कसी मजबुती कसी आहे हे पुसून येणेकरिता नरसोबास पाठविले ; व याप्रोच दलवी याजकडील कर्णेल यास हे विच्यारून यावे आसे सांगितले.

२ उदेपुरास रघुनाथसिंग याजबरोबर पत्रे गेली त्याची उतरे आली सिवानंद शास्त्रीकडे. ती खुद सरकारास व आपासाहेब माहाराजास व सेनापतीस आसी तीन ती रसिदंट याजकडील कारकून किबे याजपासी सेनापतीकडून दिल्ही, आणि सांगितले कीं यात फितूर वगैरे आहे किंवा काय हे पाहावे, आणि असल पत्रे

पाहिजेत तर रसिदंटाकडे ठेवावी. नकला इकडे पाठवाव्या. त्याजवरून किबे याची चिठी आली सेनापतीकडे ती आपासाहेबाकडे आहे. पाहिली म्हणजे उतर जाण वगैरे पाहून मग.

¶*This is another conversation between Lodwick and the Senapati reported in the diary. Pratapsinh wished to ascertain if Dr. Milne was firm in his assertions and whether he would undertake to report the true facts to the Government and mediate with them on behalf of the Raja.*

No. 50] [*4-4-1837*

पान १२१

सेनापती व सनाकर्ते रसिदंट लाडऊक सो याजकडे जाऊन बोलणे जाले ते कलमे

श्रीा

१ बालाजीपंत किबे सेनापतीकडे सकाली येऊन बोलले की पंधरा कलमाची याद घेऊन साहेबानी आपणास बोलाविले आहे. उतर की बारावर दोन वाजता येऊ.

२ गेल्यावर सो बोलले की हली याद कलमे गाळून पाठविली ती ठीक आहे; परंतु येके ठिकाणी आसे आहे कीं ही इंग्रजी सरकारची जबरदस्ती आहे व कांही खाऊन मरावे आसे शब्द माहाराजास आसू नयेत; व याणे गवरनर सोसहि घुसा येईल. सेनापति बोलले की आम्ही जो मजकूर लिहून याद पाठवावयाची ती पाठविली. तुम्हास इचा तरजुमा करून पाठवावयाची आसल्यास पाठवावी नाही तर माघारी पाठवावी. त्याजवर सो बोलले पाठवितो.

३ सो बोलले की या यादीतील अर्थ काये? उतर जाले की या यादीत हसील इतकेच की तुमचे दोन सो कमिशने होऊन आले होते, त्याणी परभारे चौकसी केली आणि जबान्याच्या नकला देतो म्हणून बोलले ते दिल्ह्या नाहीत; व भेटून जातो म्हटले तेहि भेटले नाहीत, व मजकूर कांही कलला नाही; यास्तव ही चौकसी येकतर्फी आसी शाहा आमचे व माहाराजाचे मनात आहे; व लिहिले गेले म्हणता, त्यास येकतर्फी समजुतीबरहुकूम आल्यास त्याप्रो चालावे आसे म्हणाल; मग तुमचे हती काये; याजवर सो बोलले हे खरे आहे. याजवर सेनापति बोलले, याकरिताच आगोधर आम्ही तुम्हास बोलतो. ऐकिले तरी ठीक; नाही तर गवरनरापासी बोलू. त्याणी न ऐकिल्यास लाटापासी बोलू. त्याणी न ऐकिल्यास कोर्ट डरकटर्ज्य याजपासी बोलू. त्याणी न ऐकिल्यात पादशा सरकारात बोलू आणि समजूत देऊ. याजवर सो बोलले ठीक आहे. परंतु आम्ही माहाराजाचा मजकूर समजून देण्यास सिध्ध आहो; व माहाराजाना जबान्याच्या नकला कमिसनानी दिल्या नाही, भेटले नाही, ही साक्ष मी देईन.

५११८

४ सेनापति बोलले गवरनर याचे भेटीविसी पोषाखासारखे न व्हावे व तेथे नेऊन फसऊ नये. तसेच आसल्यास कारण नाही आसे मनात आहे. याजवर सो बोलले, येविसी याद पाठविली आसता चिंता नाही; आगार समक्ष येऊन बोलून ठरऊ.

¶*This is an extract of Pratapsinh's Diary reporting a conversation which Balvantrao Senapati had with Resident Lodwick. Pratapsinh had submitted a memorandum of 15 articles in which he asserted that he was unable any longer to bear the persecution and would rather like to put an end to his life. The Resident objected to this language. The Prince replied, what else could he do, if the enquiry against him was all an* ex parte *affair and if he was not to be given a chance to explain himself.*

No. 51] [*22-5-1837*

पान १४७

बालाजीपंत नातू आज आले. सामोपचारी बोले वगैरे ता :—

१ गोविंदराव प्रकर्णी माराविसी बोलो, की सर्व तुम्हास माहीत आहेच. याजवर ते बोलले, इनसाफाचे रुईने पाहाता इंग्रज सरकारानी केले हे गैरवाजबी आहे. बाकी आपलेकडून जाहाले हेच कायम कर्णे, जबरदस्तीने पाहिजे ते ठीकच आहे आणि इनसाफानी लागू असल्यास गवरनरानी करावयास आवघड नवते आसे बोलले. याजवर त्यास सांगितले कीं इकडून बोलणार डाकतर मिलन साहेब केले आहे, तेविसी बलवंतराव चिटणीस मार कलवितील, इतकेच सांगितले; आणि बलवंतराव यास सांगितले कीं जो मार सांगावयाजोगा आसेल तोच सांगावा व जो तसाच आहे तो सांगावयाचे कारण नाही आसे त्यास सांगितले. नंतर खुषी करिता बोललो की आम्ही पाचवडास येऊ. यांजवर नातूनी विनंती केली कीं मी पुढे बुधवारी जाऊन तरतूद करीन. नंतर स्वारी यावी ठीक आहे आसा हुकूम जाला. नातूचे सिध्याचा व चंदी वगैरेचा बंदोबस्त ठेवणेविसी कामगारास हुकूम दिल्हा व नातूस सेख खानमहमद याचे जागिरीबा याद आली तो मार सांगितला. ते बोलले यादी किती आल्या तरी आपले बोलणे तहनाम्या-खेरीज दुसरे नाही.

¶*This is a report of a conversation between Pratapsinh and Balajipant Natu; the former offering to visit the latter at his home at Panchwad and the latter accepting the offer after he had time to make arrangements for reception.*

7411

No. 52] [11-6-1837

पान १६३-१६८

सो बोलले ते ही जितकी आम्ही सक्ती वगैरे दोन तीन वर्षापासून केली हे आमचे सरकारानी मला लिाखेरीज मी केली नाही; परंतु ती गोष्ट आता येथे मुंबईत मला बोलावयाचे कारण नाही, मी विलायतेस गेलेवर पाहीन ॥१॥ यावर जबाब सरकारातून जाला तो. तुमचे दिलात पके आसावे की या गोष्टीचे इनसाफाविसी आम्ही इंग्रजी सरकारासी कसे बोलतो हे तुम्ही ऐकूनं केलेले ते वेलेस ग्रांटसो व इलपिस्तन व राबिनसन सो यासहि लिहू; परंतु पके दिलात ठेवावे की हे कृत्य संत्री लोक याणी केले हे खास आम्हास माहीत आहे; परंतु आजपर्यंत आम्ही काहीहि बोललो नाही; कांकी तुम्हास खरे वाटेना. सा व ते चौकसीचे वेलेस बोललो, की कुस्या व संत्री व घारया वगैरे चालीचे आहे; आणि तुम्ही आमची चाल मनात आणीत नाही आणि बोलता व विलायतेस आम्ही पाठविणार हा घुसा तुमचे मनात येऊन खरे नं वाटले. जबरदस्ती पुढे उपाय काय? आता मात्र या इनसाफाची साक्ष तुम्हावर घाद्ध ती खरी असी बोलावे; नाही तरी आम्हाकडे लबाड येईल. नंतर लाडऊईक बोलले की हे पके दिलात ठेऊन याप्रो बोलेन; व बोलले की संत्री व कुस्या बेकूब आहे. नंतर सरकारानी उतर केले की यास्तव लाहान मनुष्याचे कधी खर मनू नये; व गौरनर सुधाहि रागास आले तत्रापि या कामाचा सेवट लागला नाही. तेवेलेस आमचे बोलणेची खंबेरी व चाल व जुबानी कुसव्हा निघाला तरी परत फिरणार नाही; व खांदानीचे चाली व लोभावर न ठेविता व इंग्रजी सरकारचे ऐकणार नाही. हे कृत्य तुम्हास दोन वर्षानी समजले. नंतर फार खूष लाडविकसो होऊन बोलला की हे करावे.

कलम

३ रसिदंट याचे बोलणे वावीनसो फार चांगला. त्याचे मनात माहाराजाचे स्वहित व चांगले करावे हेच आहे, व त्याचे माझे बोलणेहि जाले. कलकत्याचा हुकूम वावीनसा याजवर येईल. माहाराजानी नरमच आसावे, हे दोस्तीस्तव सांगतो. ॥ १ ॥ याचे उतर वोवीनसो याचे प्रकर्ण पहिल्या कलमातच लिा आहे.

कलम

४ रसिदंट बोलले जे इकडून लिा गेलेने त्याची दरयाफ्ती कलकत्यास फार होती. त्यास हा हुकूम त्याजवरच आलासा वाटतो. सरकारनी उतर केले की आमचे बोलणाराकडून काही समजले नाही वं कलकतेवाले याजवर सर्व राज्यभार आहे, तेव्हा त्यास सर्व पाहाणे प्राप्त. त्यानी वर लिा आसेल; व त्याणी पाहिल्याल नीट नाही; येपक्षा आम्हास विलायतेस सुधा पाहणे प्राप्त.

५ रसिदंट बोलले जे कलकत्यास व विलयतेस कोणी बोलणार पाठविला हे करण्यात फायदा आहे हे माझे नजरेस आले नाही. सरकारी उतर. तुम्ही येथे लेखाप्राो करीत नाही सा इतके करणे प्रास.

६ रसिदंट बोलले जे छापखान्यातून आमचेविसी विपरीत अर्थ छापला व पंधरा कलमाचे आली होती ती नूसपेपरातील आर्थ त्यात नाही. मग माहाराजाचे कारकून याणी याद दिल्ही किंवा कसे बोललो असेल ते असो ॥१॥ याजवर सरकारी उतर. इकडल मार्ग व चाल माहीत नाही (अक्षरें लागत नाहींत) ? बोलण्यावरच सर्व मतलब माहीत होतो आसे नाही; व सेनापति सेनाकर्ते याजवर माझी खातरी आहे. तुमचे मागे दुसरे साो यासी बोलावयाचे नाही व तुम्हाकडेहि उदईक येऊन तुमची खातरी करतील व मीहि परवाचे रोजी दसहाराबाा माहुलीस जाणार, तेव्हा तुम्हास व मडमसाो यास बंगल्यास येऊन मजकूर सांगीन व तुम्ही जेवावयास. तुम्ही व मडमसाो यावे नंतर येऊ बोले.

¶*This is an extract of the diary recording a conversation between Pratapsinh and Resident Lodwick. The former proposed to send his ambassador to England conveying his protest against the action of the India Government. The Resident tried to dissuade the Raja from sending his ambassador to England.*

No. 53] *[21-6-1837*

पान १७७

रोज गुाा सेनापति रसिदंट बोवन साहेब याजकडे गेले होते, तेव्हा त्याणी जातीने आपली मंडळी बाहेर घालविली, नंतर बोऊणे जाले ते :—

१ सेनापति बोलले सरकारी सांगणे नाही, मी बोलतो. साहेबाचे म्हणण्यात संत्री फार दिवसी चाकर. लबाड कसे बोलतील. त्यास आमचे चाकर तीन तीन पिढ्याचे आसून चोऱ्या लबाड्या करितात, व संत्री मजकडेहि येकांती बोलण्यास आले होते. त्यास मी सांगितले कीं ब्रिगिट मेजराची चिठी आणावी म्हणजे ऐकू; व सिवानंदशास्त्रीने मालेगावाहून डाकेत लाखोटा आमचे नावे पाठविला तो सुभेदाराने परभारा फोडला; तेव्हा सुभेदाराचे मनात तुफान आहे आसे वाटले, व सुभेदारानी आपले पलटणचे तोफखान्यात विस्तू ठेऊन त्याजवर तुफान आणिले यात त्याला नफा कोणता? यास माहाराजाचे मनात इनसाफाने पदरी पडल्यास चिंता नाही. त्याजवर ते बोलले, गवर्नर कसे करील ते कळेना. सेनापतीने उतर केले की इनसाफ न केल्यास गवनरावर फिर्याद करून आपली काळोखी काडणे प्रास. याजवर ते बोलले गवरनर जुलूम करील आसे वाटत नाही.

कलम

२ गोविंदरायाचे घरी संत्री गेले ही गोष्ट खरी की खोटी? याणी उतर केले कुशाचे घरी संत्री मनसबा करणार तोच साक्ष; व घाऱ्या सुभेदाराचे बिऱ्हाडी राहणार व चोर, व दोन संत्री फितविल्याने काय होते, हे माहाराजास कलत नाही की काये हे पाहावे. इंग्रजी सरकारची दोस्ती इकडील चाकराच्या तसद्या किती सोसून केली ती आसे कर्ण्यासाठी केली की काये हे पाहावे.

३ रोजगुा समक्ष बोलणे जाले त्याचा तरजमा स्मरण धरून केला हा फार संतोष जाला म्हणून सेनाकर्ते याजबरोबर रसिदंटाकडे सांगून पाठविले की तुम्ही समजून घेऊन लिहिले याणे च्यार वर्षाचा सीण गेला. ते बोलले मजकडे हेच आहे, माझे हातून उपयोग होईल तितका करीन. येथे राहाणे माहाराजाकरिता आहे.

¶*This is a report of a conversation between the Senapati and Resident Ovans. Pratapsinh complained about the Subhedar-Major who carried false reports against the Maharaja and who therefore deserved to be punished. The Resident assured the Senapati of his full sympathy and services in the interest of Pratapsinh.*

No. 54] *[15-7-1837*

पान १९६-१९७

बाल्याबा व दिनकरराव मार बोले वोवन साहेबासी तो ता व याद यावी तो ता, कलमे बोले ती कलमेच यादीत लिहून याद नंबर २७ ची इकडून पाठविली, त्यात इकडून सेनापति व सेनाकर्ते यास रसिदंट साहेब याजकडे पाठविले ते बोलले, त्यास उतर जाले की याप्रो यादी द्यावी. त्याजवरून कलमे लिहिली आहेत :—

१ प्रथम बाजीराव याचे लस्करातून फक्त इंग्रजी सरकारचा बादशाई चालीचा भरोसा व दोस्तीचीच इछा धरून इंग्रजी सरकारचे लस्करात आलो. फक्त पूर्वीचे इशाऱ्यावर इंग्रजी सरकारचा भरवसा दोस्तीवर नजर ठेऊन येणे जाले. बाजीराव वगैरे लोक पुरे चालीचे रीतीचे भरवसा देत आसता त्याचा भरवसा धरिला नाही.

२ पुढे तहनामा इंग्रजी सरकारानी केला त्या वेलेस ठरावाची कलमे कमजाजती काही न बोलता फक्त दोस्तीवर नजर देऊन इंग्रजी सरकार समजदार आहेत, सर्व समजोनच कर्णे ते करितील हा पूर्ण भरोसा ठेऊन जो तहनामा लाट साहेबाचे लिहिणेचा दिल्हा तो ठेविला.

३ हली वीस वर्षे दोस्तीवरच नजर देऊन चालविले आहे. फक्त दोस्तीची ख्वाहिष व पेशजी इंग्रजी सरकारची नेक नजर होती त्या वेलेस हलीचे मोकदम्याप्रो कोणी काही समजाविल्यास येऊन पुसोन इकडील मनुष्य असल्यास इकडे चौकसी करून समजण्यात येत होते. परभारे आसलियास नाही किंवा आहे हे सागणे होताच, परभारें असलियास तिकडील तिकडे चौकसी करून निराकर्ण करून घेऊन इकडे पुन्हा पुसत नव्हते. नेक नजर होती तोपर्यंत आसे चालले होते. हली आलीकडे पाचच्यार वर्षे तसे काही दिसण्यात न येता कमजाजती होत चालले. हलीचा तूर्त मोकदमा असा होत आहे. त्यास इंग्रेजी सरकारची नेक नजर होती तोपर्यंत कोणतेहि लोकास फिरयाद करावी हे मनात वाटत नव्हते; व इकडूनहि आसे चालीचे आढलले ते तेच वेलेस ब्रिकसाहेब याचे वेलेस हवाली करून दिल्हे आहेत. आसे चाल इकडून ठेविली आसतां हली इंग्रजी सरकारची नजर नीट नाही आसे समजल्यावरून सेकडो पाहिजे ते रचना करून, कोण काय करील व बोलेल तो नेम नाही. हाजारो इंग्रजी सरकारचा डोला दिसेल तसे बोलतील. आमचे आम्हास देखील डोळा पाहून बोलणे सुचणे आवघड, तेथे दुसऱ्याचे काय ल्याहावे? फंद फितूर पाहाणें त्यास इकडील लाहान मोठे हिंदु लोक जे आहेत, ते इकडील दुषमानी किंवा दोस्ती कसी आहे ते इंग्रजी सरकारास वाकबच आहे. त्यास बारीक नजरेने पाहिल्यास लाखो रुपये कोणास दिल्हे, किंवा फौज ठेविली आसे आसल्यास वाजबी गोष्ट आहे. नेक नजर आहे तर आमचे बोलणे भांडणे होते. तशी नजरच दिसत नाहीं त्याअर्थी भाडण नाही; व पेशजी आमचे नोकर लोक गाईकवाड भोसले व पेशवे वगैर होत त्याणी काय उद्योग केला? सर्वश्च आपणच हाती होते ते यख्त्यारी शाहू माहाराज आलीकडे करून इजाच दिल्ही. हली इंग्रजी सरकारानी दोस्तीने जे केले, त्याजवरच दील ठेऊन चालविले होते. ते त्यास हली तसी नेक नजर दिसत नाही, संशयेच दिलात वाटतो, त्याअर्थी हली जे इंग्रजी सरकारानी हवाली केले आहे ते इंग्रजी सरकारानी सांभालावे. माहाल मुलुक व वहिवाट पाहावी. हाली मोकदमा जो चालविला आहे हा नसावा. ज्या लोभासाठी संशये ते जिकडील तिकडे घ्यावे म्हणोन सदरी लिहिले आहे, तेव्हा कोणती आडचण व बेहुरमत आसू नये. इकडून फक्त दोस्तीची गरज आहे. लोभावर नजर नाहीं. ज्या वेलेस भरवसा वाटून इंग्रजी सरकारानी आपले दौलती प्रो इकडील सरकारचे दौलती संपादतील आसे नजरेस वाटेल, तेव्हा इकडूनहि पाहाण्यास नीट आहे.

येकूण तीन कलमे लिहिली आहेत. छ १२ राखर ता। १६ जुलई सन १८३७ इसवी. याप्रो याद रेसिदंट वोबीन साहेब याजकडे पाठविली.

¶*This is the substance of a memorandum submitted by Pratapsinh to Resident Ovans reported in this extract of the Diary. Pratapsinh complains that the British Government do not now entertain for him the same regard and affection which were shewn at the time when he deserted Bajirao and came over to join the British in 1818.*

No. 55] *[16-7-1837*

पान १९८

आज बाल्याबा व दिनकरराव मोहिते रसिदंट वोविन सो याजकडे याद सतावीस नंबरची रोज गुाचे तेरखेस बार केली ती घेऊन गेले होते. ती याद दिल्हावर साहेब बोलले, गोविंदराव याचे वेळेस याद दिल्ही त्यास व यास काय फरक आहे, किंवा भाव येकच आहे. सेनापतींनी उतर केले कीं त्यापेक्षा यात जाजती आहे. ते आता या सरकारावर कोण कसी आदावत घेईल न कले; व हली घेतच आहेत; तरी हे इकडील खानदानीस नीट नाहीं. सबब जे इंग्रजी सरकारानी दिल्हे ते घ्यावे; व हली जो क्रम चालला आहे तो महकूब व्हावा. कारण इंग्रजी सरकार जबरदस्त जाणून सर्व लोक आम्हावर आदावत घेतील तरी हे या मातबरीस नीट नाही. याजवर साहेब बोलले ठीक जाहे. मी याप्रो गवरनराकडे लिहितो; परंतु महकूब कर्णे मला परभारे करिता येत नाही. सबब हुकम आणऊन महकूब करीन; व जबाब यादीचा येईल तोहि कलवीन.

¶*Conversation between Senapati Balyaba and Resident Ovans is reported. The Resident finds fault with Pratapsinh for defying the British authority but promises to forward his representation to Government.*

No. 56] *[17-7-1837*

पान १९९

बालाजीपंत नातूकडून व आबा पारसनीस व राघवाचार्य व कासीपंत बंदरे हे ता। १७ सोमवारी बोलले की आबा माहाडीक वगैरे इंग्रजी सरकारात कबूल जाले आहेत; आणखी पुषकल मुदे तयार करतील, त्यास सारे लोक कबूल होतात, आणि येकटे माहाराजानीच कबूल केले नाही, तर साऱ्यास खोटे करून येकट्याचे खरे कसे होईल? त्यास माहाराजानी मजपासी येकीकडे इतकेच म्हणावे की, आम्हास माहीत नाही, परंतु मंडळीकडून जाहाले आसल्यास महकूब करावे, म्हणजे सारे मिटते. व गोविंदराव याची चौकसी केली त्यास माहाराज बोलले की चौकसी खोटी केली, त्याजवरून राग येऊन गवरनर व कौसलवाले व लाडविक इतक्यानी प्रतिज्ञा केली आहे की हे माहाराजाचे आंगी न लाऊ तर

आम्ही पाण्यांत बुडऊन घेऊ, आसी त्याची प्रतिज्ञा आहे. त्यास आणखी त्यांजपासी पुषकल मुदे आहेत; व नवे उभे करणार, आणि माहाराज चौकसी करावी आसें बोलत होते. त्यास हे माहाराजाची रूजुवात करून, चौकसीने माहाराजाचे पदरी मुदा घालून माहाराजापासून लिहून घेतात हे खास आहे. याजकरिता सदरी लिाप्रो माहाराजानी बोलावे. याजवर इकडून उतर केले, की तुम्ही लोकाचे घराभोवते संत्री उभे करून, बायका मुलादेखतां घेऊन जाऊन, जरब देऊन, तुम्हास काले पाण्यावर पाठऊ व ज्यानतलक ठेऊ, आसी जरब देऊन पाहिजे ते बोलतील व खोट्या रचना करून साधने तयार केली. आता आम्ही चौकसीत बोललो आसता कसे निभेल? हे मंजूर नाही. नंतर आणखी ते बोलले इतके करण्याचे कारण मिलोन माहाराजानी विलायेत व कलकत्यास खोटे केले म्हणून लिहिले, त्याजकरिता तो मुदा उडविण्याकरिता हलीचे साबूत करून माहाराजापासून लिहून घेतात.

¶*Balajipant Natu and others advised the Maharaja to confess to the charges brought against him : but he refused to agree to this advice or do anything that was against his conscience.*

No. 57] · *[23-7-1837*

पान २०२

वोविन साहेबासी बोलो कलमे तो ताा. इंग्रजी सरकारची व या सरकारची दोस्ती येकच आहे. याजकरिता इकडील हुरमतीस कमी न पडावे. हे ठीक नाही. आम्हीच मंडळीसुा बंगल्यात येऊन बसतो; व काल सेनापति आले होते त्याणी मिलन साहेबाविसी बोलले त्याप्रोाच आहे. साहेबाचे व सेनापतीचे बोलणे ज्या तारखेस जाले त्या तारखेपासून काही येक नाही व तुम्ही पाहिजे तर शोध ठेवा ॥ १ ॥ साहेब बोलले याविसी काही आंदेशा नाही; परंतु या प्रकर्णाचा रस्ता कसा कर्ण्याचा माहाराजाचे दिलात आहे? इकडून उतर. इकडील चाल व वागणूक कसी आहे ती पाहून कर्णे आसेल तसे करावे. यास रस्ता तो हाच व आता साफ चालावयाचें, जिर्द[१] करावयाचे नाही आसे इकडील नजरेस येते. साहेब बोलले ठीक आहे. माहाराजाकडून याद याप्राो आली म्हणजे मी गौरनर-साहेबाकडे पाठवीन. हुकुम येईल त्याप्राो कलवीन. मला हुकुमाप्राो कर्णे प्राप्त. नंतर स्वारी परत आली. मग सदरहू मजकुराची बोलण्याची इकडून जालेयाची याद नंबर ३२ ची लिहून पाठविली ॥ १ ॥

¶*Pratapsinh's conversation with Resident Ovans is reported in this extract. The latter asked the former to put down what he had to say on paper and promise to forward the same to Government.*

---

१ जिद = निकड, निकर, भांडण.

No. 58] [2-7-1840

नकल.

श्री

शेवेसी विनंती. शेवक रंगो बापूजी चरणावर मस्तक ठेऊन विज्ञापना. ताा छ २ जौवल मुाा ताा २ जुलई सन १८४० इाा परियंत मुाा शहर लंडन येथे सुखरूप असो. यानंतर मी मुंबईहून निघालो तो सरकार हुकुमाप्रमाणे ताा ३० जून आषाढ शुाा १ मंगलवारी प्रात:काली पावलो. नंतर कपतान राबट कोगन साहेबाची भेट घेऊन नंतर दुसरे कोणी दोस्ताच्या भेटी तेच दिवसी घेऊन नंतर आपले मंडलीचे बिराडास संध्याकाली आलो. दुसरे दिवसी कामाची सिस्त कसी चालली ती संकळित समजून घेतली. त्यात कंपणी बोलण्यावरून कागद छ्यापून बुके पारलमेंटात द्यावी असा हुकूम जाला आहे. श्रीमंत राजेश्री सेनापतिसाहेब कैलासवासी जाले व सरकारास या संकटात हे दुख जाले. ईश्वर खऱ्यामागे अनेक तऱ्हेच्या अडचणी आणून क्लेश होत गेले हे कलोन शोकार्णवी जालो. असो; ईश्वराची मर्जी. खावंद सरकार धैर्यवान समर्थ, तेथे विनंती काय लिहूं ? सारांष, इंग्रजी सरकार अवल इनसाफी आहेत. श्री येश घेऊन सरकारी काम शेवटास नेणार समर्थ आहे. मंडलीपासी खर्चास नाही. मी येताना काही तजवीज व्हावी तो वेल वैरियावर देखील नसावा असे जाले. येथील खर्च कसा निभेल ? खर्च तरी भारी. ईश्वर कसे निभावील हा मात्र मोठा घोर आहे. मी मात्र प्रेत्नेकरून या मुकामी येऊन पावलो. परंतु विस्तारे विंनंती लिहिण्यास लाच्यार. सरकारापासी तरी पैसा नाही. येथे आहो त्यास तरी पोटास अन व आंगास वस्त्रे पाहिजेत. यातून कोणी परत जावे कोणी राहावे असे कोणी दोस्त याचे म्हणण्यात. परंतु अलियाणे जावे तरी पैसा नाही. राहाणे तरी खावयास पैसा नाही. आम्हा सर्वत्र मंडलीचा व मीर अफजलअलीसुद्धा खर्च दरमाहा अजमासे तीन हजार परियेत लागतो. मग शेपनास कमजास्ती काय होतील ते असो. तेव्हा बारमाही तोड लागणे. येथे तरी स्वदेश नव्हे. खेरीज कोडत कागद छापणे वगैरे हाहि खर्च मोठा आहे. खर्चाची तरी अडचण म्हणोन कोणी जावे कोणी राहावे जाले तरी जनांत मात्र कार्य न होता, बोलणार उठोन गेले आले हा दुर्लौकिक होणार. अशा अडचणी अनेक प्रकारच्या आहेत. तेव्हा मति कुंठित आहे. मंडलीपासी तरी या महिन्याची बेगमी होईल न होईल असे आहे. हा मजकूर या समई सरकारास मी न ल्याहावा, परंतु तजवीज निघाली पाहिजे. करणारानी तर पैशाची पुरवणी न व्हावी, माणसे पोटास न

मिळे तेव्हा उठोन येतील. म्हणोन असा प्रसंग सरकारावर गुजरला. ईश्वर कसी आबरू राखील ती न कळे. आज्ञोतर आले पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Rango Bapuji who along with four others was deputed to represent the Raja's grievances to the Home Government writes him from London about the extreme straits to which the party has been reduced for want of funds.*

No. 59] [*2-7-1840*

नकल.

श्री

शेवेसी विनंती. शेवक येशवंतराव राजे सिरके व भगवंतराव विठल व चिटकोजीराव सुर्वे व रंगो बापूजी याणी चरणावर मस्तक ठेऊन कृतानेक विज्ञापना. ता। छ २ जौवल मु॥ ता। २ जुलई सन १८४० इ॥ आषाढ शु॥ ३ गुरुवारपरियंत स्वामीचे कृपेकरून मु॥ शहर लंडन प्रा॥ इंगलिस्थान येथे सुखरूप असों. यानंतर विनंतीची कलमे:

१ लेडिन हाल स्त्रीट्र येथे ईस्ट इंडिया केंपणी मालक मंडली प्रापेटर जमून जनराल कोर्ट वर्षातून च्यार व्हावयाचे त्याप्रा॥ जनराल कोर्ट जाल्याचे दर्शऊन चेरमन बोलले. जनराल कोर्ट जाहाले, यांत सांगावयाविसी आम्हास हर्ष आहे कीं, कुवईन इकटोरिया प्रं+च्य आलबर्ट याजला जाहाले. यांत सांगावयास आपलेकडील बहुमानपत्र कुवईन म्हणजे राणी बादशा सरकारास पाठवावे की, तुम्ही आमचे खावंद. तुम्हास ईश्वरानी हमेशा सुखी राखून आयुष्य फार द्यावे आणि तुम्ही रयतेचे पालण चांगले करावे. तसेच प्रापेटर यासहि त्याच पत्रात लिहावे म्हणोन बोलले. त्याजवरून सर्वत्र कंपनी मालकानी रुकार दिल्हा. ठीक आहे बोलले.

२ चेरमेन ता। ६ मे रोजी जनराल कोर्ट जाहाले त्या वेळेस कंपनी मालक यांचे बोलणे जाले की, सातारियाचे राज्याचे प्रकर्णी जे कागद असतील ते सारे कागद आम्हा मालकांचे पुढे ठेवावे आणि आम्हास दाखवावे. त्याजवर उतर जाले की, सातार प्रकर्णी कागद आहेत ते पाहावे. परंतु कागद फार आहेत सा॥ असे करितो की, येथे जी मालकांची कोठडी

+ Prince.

आहे त्यात हे सारे कागद ठेवितो. नंतर ज्या मालकाचे मर्जीस येईल त्याणी पाहिजे तेव्हा येऊन कागद पाहात जावे. असे बोलून कागद पाठीमागे आगोधरच आणून ठेविले होते ते पुढे आणोन दाखविले. ते कागद दोन वोझी असतील. असो. त्यानंतर डिसुमेंच(?) बोलले, हे कागद छापविले पाहिजेत. तेव्हा चेरमेन बोलले की, छापावयाचे तुम्ही म्हणता. परंतु इतके कागद छापण्यास दोन हजार पवंड म्हणजे वीस हजार रुपये लागतील. याजवर बोलणी मालकांची डरेकटर यांची दोन तर्फेची बहुत जाहाली ती लिहिली नाहीत. त्यांत डरेकटर यांची कागद न छापण्याबदल बोलणी फार जाहाली. नंतर सर्वांचे विच्यारे ठरले की, सातार्‍याचे कामाविसी येथून लिहिणी गेली व इंडिया म्हणजे हिंदुस्थानातील गौरमेंट यांच्या मिनोटी[1] म्हणजे कागदपत्र आले व आणखी कसकसे जाहाले असेल तो वगैरे हासील मजकूर घेऊन छापावे. याप्रमाणे ठरले आहे.

३ मुंबईहून मजुरदार लोक यास कंपणीचे कामगार याणी मोरिस या मुलकात पाठविले. त्याजवर जबरी जाहाली. हे वर्तमान बोभाट प्यारलेमेंटपरयंत गेला. हे वर्तमान डरेकटर याजला समजले, त्याजवरून त्याणी सदरहू मजकूर मालक कंपणीस समजाऊन त्याचे विचारास आणून देऊन ठरले की, प्यारलमेंटास उतर अर्जी द्यावी. त्याजवर चेरमेन म्हणजे बोरड कंत्रोल बोलले त्याजवरून मालक ज्याचा तो आपलाला विच्यार बोलूं लागले. त्यातील हासील की, इंडियाचे रयतेस इंडियातच ठेवावे. इंडियात जमिनी खाली पडसर फार आहे. त्या जमिनी परमुलकात माणसे न पाठविता त्याजला देऊन त्यांचा बंदोबस्त राखावा. मोरीस या मुलकांतील लोकहि बोलतात की, आमचे आम्ही मजबूद असता हे लोक इकडे आणावयाचे कारण नाही वगैरे. येविसी बोलणे तकरार फार जाहाली. त्यात इंडियाचे लोक दुसरे मुलकात पाठवावे हे बोलणे मालक कबूल करीत नाही असे आहे.

४ ता॥ २३ जून सन मजकूर रोजी प्यारलमेंटांतील मेस्तर हूम साहेब याणी बोर्ड कंत्रोलचे मुनिमास विचारिले की, तुम्हास सातार प्रकर्णी मजकूर पेशजी विच्यारिला ते वेलेस तुम्ही सांगितले की, सातारप्रकर्णी कागद मी देईन. त्यास हा वेलपरियंत कागद का येऊन पावले नाहीत? त्याजवरून

[1] Minutes.

बोर्ड कंत्रोलचे मुनिमानी उतर केले की, ते कागद डरेकटर याणी आपले कंपणी मालकास तयार करून दाखविले आहेत. आपणासहि पाहावयाचे असल्यास मोशन म्हणजे सर्वादेखत हुकूम करावा म्हणजे कागद हजर करीन. त्याजवर मेस्तर हूमसाहेब याणी जबाब दिल्हा की, उदईक हुकूम करीन. नंतर ता। २४ मिनहू रोजी मोशन केले आणि बोर्ड कंत्रोल यास ते कागद आणून देण्याविसी हुकूम केला. त्याजवरून सदरहू बोर्ड कंत्रोलचे मुनीमानी कबूल करून कोर्ट डरेकटर यास हुकूम सांगून पाठविला की, हौसाफ्लॉर्ड व हौस कामन या दो जागी कागद द्यावयास तुम्ही बुके छापवीत आहा. त्यास आणखी जाजती बुके मालक वगैरे यास देण्यास दोन हजार छापावी म्हणोन हुकूम दिल्हा. सदरहू बुके छापणीचे काम चालले आहे.

५ ता। ३० जून रोजी राजश्री रंगो बापूजी व रावजी बापाजी माणसेसुधा मुा मजकुरी सुखरूप येऊन पावली. खावंद सरकारचे चरणप्रतापे सर्वांच्या भेटी होऊन सर्वत्र येक जागी राहून येक विचारे चालत आहों. येविसीं येकंदर अंदेशा नसावा. सारांष सरकार शेवा घडावी हीच निष्ठा आहे. त्या प्रमाणे श्री शेवटास नेईल ही विनंती आहे.

६ माहाराज सरकारची खासगी दौलत व कारखाने वगैरे सर्व माहाराज सरकारचे माहाराज सरकारात असावे व सेनापतिसाहेब यास रस्त्यात आडऊन तसलमात यैवज येणे म्हणोन त्या ऐवजात दागिने वगैरे घेतले त्याजाविसी व त्याचे खासगीची पगाराविसी यादी ता।१ जून रोजी कोर्ट अफ डरेकटर याजकडे दिल्हा व सदरहूप्रमाणे ता। १५ मिनहूस बोर्ड कंत्रोल याजकडेसहि दिल्हा. त्याचे उतर अद्यापि आले नाही व सदरहू यादी दिल्हा त्याचे तरजुमा होताच नकला हुजूर पाठऊन देऊ.

—

६

येणेप्रो साहा कलमे लिा आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

सही—येशवंतराव राजे सिर्के.

सही—भगवंतराव विठल.

¶*This is a letter sent by Yashwantrao Shirke, Bhagwantrao Vithal and Rango Bapuji from England to King Pratapsinh, giving news of the Satara case which was being reported to the Court of Proprietors.*

7421

No. 60] [4-7-1840

इंग्रजी पत्राचा तजुमा नकल

श्री

मेहेरबान दोस्ता डाकतर ज्यान मिल्न साहेब मुा

मुबई सलम हू

दिगर तुमचे पत्र ताा २९ अप्रेल संन १८४० रोजीचे आले ते पावोन संतोष जाहाला. ऐसेच निरतर पत्र पाठऊन वर्तमान कलवीत असावे. यानंतर इकडील मजकूर येणेप्रमाणे.

१ तुम्ही आपले खासगीचा मजकूर लिहिला तेविसीचा तपसील आम्ही तुम्हास पुढील आगबोटीतून लिहून पाठऊ. मेस्तर फारकिसनसाहेब याची व आमची भेट जाहाली नाही. कारण त्याचे मुा येथे येक दोन रोज लंडन मुकामी होते, परतु मला असे दिसते की तुमचे कामाचा उलगडा अद्याप जाला नाही.

२ दुसरी खुष खबर की राजश्री रंगो बापूजी लंडन मुकामी ताा २७ जून सन १८४० रोजी सुखरूप येऊन पोहोचले. ते गरीब बिच्यारे त्याजला खर्चास नाही, त्याजमुळे मालथ्यास होते त्यास पत्र लिहून नोराचा पतकर आम्ही घेतला आणि त्यास येथे आणविले व माहाराजाविसी अथवा त्याचे लोकासी हाच आमचा देण्याघेण्याचा पहिला व्यव्हार, हे आपले ध्यानात असावे. मेघडलीन साहेब यास लवरपुल येथे तुमचे पत्र आले होते की माहाराज सरकारचे लोक आले आहेत, त्यास खर्चास द्यावे व आम्हासही याप्रमाणेच लिहून आले होते. बरे आहे ते बिच्यारे गरीब वकील लोक निराश्रित येथे आले आहेत त्यास खर्चास दिल्हे पाहिजे; अथवा आप-आपल्यात वरगणी काढून त्यास खर्चास पोचवावे. कोणीकडून त्यास खर्चाची सोय केली पाहिजे व माहाराज सरकारचे मोकदम्याविसी मदत करणार ते पूर्वीचे साहेब लोक आहेत. त्याखेरीज दुसरेहि साहेब लोक अनकूल होत चालले आहेत. मोकदम्या प्रकर्णी कागदपत्र दाखवीत असतो. पारलमेंटात मोकदमा नेण्याची तजवीज केली आहे, परतु कागद आद्याप छापले नाहीत. त्यास ते कागद छापविण्याबदल येक महिन्यावर दिवस लागतील. सबब हाली पारलमेट बसले आहे यास ते कागदपत्र पोहोचतील असे दिसत नाही. परंतु प्रापरायेटर याचा विच्यार असा आहे की राणी सरकारास अर्जी देऊन मोकदम्याचे तपासणीविसी कमेटी मागावी असे आमच्या ऐकिण्यात आहे.

३ मोकदम्या प्रकर्णी मुबईस गवरमेटचे कागदपत्र जे आले ते आम्ही सर्व पाहिले आहेत. त्यात असी काही नालस्त लिहिली आहे की ते आपले मनी मानसीहि नसेल. तुमचा व बोबरसाहेब हे कपणी सरकारचे नोकर असून माहाराज सरकारास सला दिल्ही हा त्याजवर गुन्हा आणिला. त्याजवरून असे दिसते की मुबई सरकारचे कवसलदार माहाराज सरकारचे राज्य बुडविण्याचे तजविजीत फार असावे. या मोकदम्या प्रकर्णी कागद कोणाचे द्रिष्टीस पडू नयेत याजमुळे फार बंदोबस्त ठेविले असतील व उलबीसाहेब सकटतार व आणखी साहेब अंतस्त मसलत देणार आणि मेस्तर फेरीस साहेब व त्याची मंडली कौसलदार माहाराज सरकारचे राज्य बुडविण्याबदल फार मेहेनत करीत आहेत असे नजरेस येते. तुम्ही मोठे फजितखोर असी तुमची नालस्ती लिा आहे व तुम्हा आम्हास लोभ दाखऊन मोकदम्याचा पुरावा करण्याबदल इकडे आमची रवानगी तुम्हीच केली आहे असेहि लिहीले आहे. या सिवाय तुमचे नालस्तीचा विस्तार फारच लिहिला आहे तो आम्ही तुम्हास पुढील आगबोटीत लिहून कलऊ. करणेल वोविन साहेब आम्ही पाहिले नाही, परंतु त्याचे लिहिण्यावरून आमचे नजरेस असे येते की ते मनुष फार नादान आहेत. त्याणीहि तुमची व आमची नालस्ती फार लिहिली आहे. असा नालस्तीचा मार अंतस्त लिहितात. येविसी आपल्यास बंदोबस्त केला पाहिजे असे लिहिणार आहेत ते कसे हे इकडे सर्वाचे दिलात आणून देऊन मेस्तर बोबर साहेब याणी चाकरी सोडली हे बरे जाहाले. कारण की ते जर आज कपणी सरकारचे ताबेत असते तरी आज जसे आपण बोलून जबाब विच्यारतील. आपले पेनसनची सा ते लिहितात परतु बाच्याई सरकारचा काईदा सबल आहे. त्याचेनी आपले पेनसीन बंद करवत नाही ही खात्री ठेवावी.

सही राबट कोगन

ताजा कलम. कारणेले सिमीस साहेब यास दरेकटरची जागा जाहाली आहे व पुढे जंदरल राबटरसंन साहेब यास कोर्टडरेकटरची जागा मिलेल. सर च्यारलस फारबस त्याविसी मदत करीत आहेत. राबटसाहेब सर चारलस साहेबास पत्रे पाा ती त्याजकडेस दिल्ही.

येणे प्रो मजकूर लिा आहे त्याजवरून कलेल

लंडन ताा ४ जुलई १८४०

¶*This is a Marathi translation of a letter by Robert Cogan to Dr. John Milne—regarding the help he was rendering to Raja Pratapsinh's envoys and his efforts to obtain justice from the Home Government.*

No. 61] *[9-9-1840*

पौ तेरीख ९ शेपटबर १८४०

नं. १९९

श्री

यादी सरकार श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति राजमंडळ हुजूर सातारा सुरूसन इहिदे आर्बैन मयातैन व आलफ. हाली विलायतेहून तीर्थस्वरूप राजश्री प्रतापसिव्ह माहाराज यास पत्रे त्याजकडील वकिलाची वगैरे येतात त्यापैकी हाली तीन पत्राच्या नकला सापडल्या त्या या यादीबरोबर पाठविल्या आहेत. त्यास उमेद व बदसला देण्याचे आद्यापि पहिलेप्रमाणे काम चालत आहे ते या नकला पाहिल्यावर समजण्यात येईल. त्या नकला बितपसील.

१ रंगो बापूजी याचे पत्र तारीख २ जुलई सन १८४० चे त्याची.

१ येशवंतराव सिर्के व भगवंतराव विठल व चिटकोजीराव सुर्वे व रंगो बापूजी याचे पत्र तारीख २ जुलई सन १८४० चे त्याची.

१ राबट कोगन साहेब याचे पत्र डाकतर ज्यान मिलन साहेब मुकाम मुंबई यास तारीख ४ जुलई संन १८४० लंडणाहून इंग्रजी पत्राचा तरजुमा मराठीत त्याची.

येकूण नकला पाठविल्या आहेत १२ रजब मुा तारीख ९ सपटंबर संन १८४० इसवी

¶*Covering letter to copies of letters addressed to Pratapsinh from his agents in England intercepted by the new Raja and submitted to the Resident.*

Index to Selection No. 42

Papers referring to Pratapsinh, Raja of Satara

(Figures denote numbers of pages)

A

Aba Parasnis—supplies Grant Duff with copies of important old papers for his history 18, 19, 20, 23, 24, 30; 106-107.

Administration—Beginnings of British, training of clerks 53-54; scale of court fees 55-56.

Akalkot—Raja of—12.

Amarsing Shirke—excommunicated by Raja Pratapsinh 68.

Anandrao Kesharkar—12.

Appa Bhat Walimbe—deputed to Tanjore by Raja Pratapsinh to secure uniformity of social practices 88.

Appajirao Mohite—excommunicated for having lost caste by intermarriage 67.

Appasaheb Shahji—Pratapsinh's brother—his illness 6; his allowance 16; 94; 98; 114.

Auckland Lord—succeeds Bentinck as Governor General 91.

Aundh—Pratinidhi of—12.

B

Babaji Subhedar—publishes defamatory news about Raja Pratapsinh 89; 93; 98.

Babaji Surve—excommunicated by Raja Pratapsinh 67.

Bajirao Raghunath Peshwa—his family being escorted to Brahmavarta 10; 43; 63; 66; 80; 81; 85; 104.

Balajipant Kibe—clerk in the Residency 88; 96; 99.

B—*contd.*

Balajipant Natu—2, advises the Maharaja to dismantle his forts 3; 5; 7; 9; his income 11; 12; 15; 16; his overbearing manner 18; 23; 24; asks the Raja to shew to Grant all papers to help him to write an authentic history 25; stands in mortal dread for helping the English against his own people 59; 83; 85; 86; 101; asks the Raja to plead guilty to escape punishment 106-107.

Balaji Vishvanath Peshwa—22; his expedition against Angria referred to 27.

Balwantrao Chitnis—14; his stipend 17; questioned by Duff on various points of Maratha history 18-23, 24; explains how most of the documents of Shivaji's time perished when Raigad was sacked by the Mughals 22; 24; refutes the charge that his family was responsible for making the Peshwa powerful 26; 27; 28; 29; 30; suspected of embezzling government money 42; 101.

Balwantrao Senapati *alias* **Balasaheb Bhonsle**—1; his stipends 17; 91; 96-99; 100-101; pleads the Raja's innocence against the charge of seducing English troops 103-104; 104-106; his death 108.

Bapu Kanho—16; 29; 30; 31.

Bapu Mahadik—starts a discussion that the Chitnis were responsible for making the Peshwa all powerful 26.

Barnett—11; 14; 24.

Bhagwantrao Vithal—Raja's agent deputed to England 109; 114.

MO-I Bk Ca 21—16

B—*concld.*

Bhausaheb (Ramchandra)—the Raja's younger brother 16.

Bhor—Sachiv of—1, 12.

C

Chandrarao More—27; 28.

Chhatrasing Bhonsle—his ashes being sent to Benares 2, his sojourn at Jaipur and Udaipur 29, 30, and respectful treatment he received from the Rajas 31.

Chimanappa Shirke—Kutrekar—excommunicated for having lost caste by intermarriage 67.

Chintopant Bhate—7; 42.

Chitkojirao Surve—109; 114.

Clare Lord—Governor of Bombay 83-84.

Cockburn—supplies the Raja with fancy articles from England 73.

D

Dajiba Mahadik—1.

Dajiba Upadhye—2; 20.

Daulatrao Sindia—reported to have been refused a Kachhava bride 85.

Deepvijayji—Family priest of the Rana of Udaipur 51, 52, 58.

Dinkarrao Mohite—94, 98; 104; 106.

E

Education—opening of a Pathashala at Poona 40-41; subjects taught and encouragement to students 44-47; rules and regulations for the school 49-51.

Elphinstone Mount Stuart—Governor—2; expresses satisfaction at the progress of the Maharaja's education 4; his appointment

E—*contd.*

as Governor of Bombay reported 7; tries to recover money secreted by Bajirao and his ministers 6, 9; reported to be visiting Satara 10; 42; starts a school at Poona 44; 49; directs printing of books in Dev nagari script 52; 72; 85; his ill-health prevents him from accepting the Governor Generalship 90; 91.

F

Ferris—113.

G

Gadadhar Pralhad—27.

Gaikwads of Baroda—their connections with high caste Marathas denounced by Raja Pratapsinh 66.

Govindrao Mahajani—Raja's Diwan—suspected of trying to seduce English troops of the Satara Residency 93, 97, 101, 104; 106.

Grant (Duff) Captain—Resident at the Court of Satara—asks the Maharaja to keep a daily record of his work 1; his solicitude for training the Maharaja in the administration of his State 2, 3, 4, 6, 7; punishes the sentries for rioting 8; 9; collecting material for his history 10; his salary 11; draws up the paper defining the relations between the Raja and his Jagirdars and also the treaty between the Raja and the Company 12-13; 14; 15; 16; makes detailed inquiry in respect of several historical topics 17-32; 42; 43; his letters inquiring about the Raja's welfare from England 70-73; 89-91.

H

Hart—60.

Hume—interests himself in the Raja's case 110.

J

Jagdevrao Jadhav—29, 30.

Jagdevrao Patankar—prohibited from visiting Pratapsinh 5.

Jodhpur—78.

K

Kashipant Bandre—suspected of espionage by the Raja 43 ; asks the Raja to plead guilty to satisfy the Governor 106-107.

Khanderao Mama Shirke—68.

Kharda—Battle of—48.

Kolhapur—Prince of—disowns any relationship with the Satara branch 35 ; 88.

Krishnarao—suspected of embezzling Government money 42.

Kusaji Mahadik—granted an annual allowance for capturing Chhatrasing's Pretender 15.

L

Lodwick—Resident at Satara 69 ; 73 ; 78 ; 79 ; 80 ; 85 ; 86 ; 87 ; 88 ; assures the Raja of his favourable consideration in presenting his case 91 ; charges the Raja with infringement of the articles of the treaty 92-96, 96-99 ; 100-101, dissuades the Raja from sending his agent to England 102-103.

Lytton—11.

M

Madhavrao Rastia—receives the first printed book in Marathi 52.

Mahadji Sindia—48 ; 52-53.

Mai Saheb—Chhatrapati's mother—2 ; 6 ; 16.

Malcolm, Sir John—settled 43.

Malharrao Chitnis—invited to Satara to explain to Grant Duff intricate points of Maratha history 20 ; explains the true nature of Chauth and Sardeshmukhi and clears up several points 21-22 ; 27.

M—contd.

Morris—73.

Munro, Thomas—42.

Milne, Dr.—92 ; 99 ; 100 ; 107 ; 112.

N

Nana Fadnis—his shrewd political sense praised by Lodwick 80.

Narhar Malhar Chitnis—despatched by Pratapsinh while in the Peshwa's custody to negotiate with Elphinstone 85.

Nilkanth Shastri—29, 30.

Nizam, the—48.

O

Ovans—Resident—starts inquiry into the Raja's attempt to seduce the troops 102, 104, 106 ; his unscrupulous character 113.

P

Parashurampant Pratinidhi—27.

Pralhad Niraji—first Pratinidhi—19.

Pratapsinh—Raja of Satara—celebrates the Dassara with pomp 1, his initiation into the administration of the State under the direction of Captain Grant 2, 3 ; declines to raze ancient forts in his State 3 ; declares his loyalty for the Company 4 ; sends seasonal greetings to Elphinstone and Smith 5 ; 6 ; learns of the appointment of Elphinstone as Governor 7 ; resents highhanded conduct of the English sentries 8 ; his large charities to Brahmans evoke the President's disapproval 9 ; learns of the capture of Ashirgad by the English 10 ; learns to read and write 10 ; notes down an earth-quake 1 and other uncanny happenings 11 ; 19 ; concludes the treaty with the Company 12 ; his Dassara cele-

P—*contd.*

Pratapsinh—Raja of Satara—contd. brations 13; proclaimed Raja in his territory 14; being initiated into the administration 15, 16; unwilling to leave papers with Duff 23; 24; 26; his anxiety to confirm his descent from the Sisodia family 29; requests Grant to prevent cow-slaughter in the Residency 42; compares the rule of the Company with the effete administration of Nana Fadnis 43; asks Grant to stop the improper conduct of the soldiers 43; receives the reins of Government from the Company 48; discusses with Resident Robinson a visit to Europe 58-59, 65, hates Brahmans 59; expresses appreciation of the services rendered to him by General Smith 60; his revenue dwindling 60; 61; his views on the education of Maratha boys 62-63; complimented by the Governor for his excellent administration 65; condemns intermarriages between high caste Marathas and low caste Kunbis 66, 67, 68; celebrates Dassara 69; Duff's affectionate regard for him 70-73; thinks of contracting his daughter's marriage with a Udaipur prince 74-77; his talks with Lodwick 78-80; his differences about the interpretation of the treaty with the Company 81-84; 85; his bigotry 85-86; complimented by the Court of Directors for his good administration 87; his ideas about caste superiority, etc., 88; observes cordial relations with Grant Duff after his retirement 89-91; defends himself from charges of sedition brought against him 92-96, 96-99, 99-100; complains of the *ex parte* inquiry against him 100-101; 102-103; complains of unfair treatment by the English 104-106; pleads his implicit trust in the English as a proof of his innocence 104-106; refuses to plead guilty to the false charges preferred against him 106-107; sends agents to England to plead his case 108-113; his letters from England intercepted and delivered to the Resident 114; receives letters from Duff 70-73, 89-91.

R

Raghavacharya Ramanujan—appointed Head Teacher of the Sanskrit college at Poona 47; 106.

Raghojirao Mohite—excommunicated by Raja Pratapsinh 67.

Ramraja—26.

Ramasing—appointed Kotwal of Satara 7; his appointment disapproved by Grant 9.

Rango Bapuji Gupte—Raja's agent deputed to England—writes about his difficulties in England 108-109, reports to the Raja his exertions in moving his case before the Court of Proprietors 109-111; 112; 114.

Ranjitsing of Punjab—78.

Raoji Shirke Derwankar—excommunicated by Raja Pratapsinh 67.

Robert Cogan—108; writes about the Raja's Vakils and his own efforts to obtain justice for the Raja 113; 114.

Robinson—Resident at Satara—advises the King to visit Europe 58-59, 72.

Russel—Resident at Hydarabad—42.

Russia—threatens an invasion on India through Afghanistan 78.

S

Sadashiv Bhagwant—20; 21; 23.

Sambhaji Chhatrapati—30.

Sayyad Mir—Raja's agent to England—95.

Shahu Chhatrapati—reference to his favourite dog 28.

Shaikh Mira—16.

Shivaji Chhatrapati—11; Grant Duff's careful inquiry into the details of his administration 21, and career 26-32; 51, 52, 53.

Shivanand Shastri—deputed to Udaipur by Raja Pratapsinh to secure a prince of Rajput blood for his daughter 74-77; 87; 99.

Sindias of Gwalior—their connections with high caste Marathas, censured by Raja Pratapsinh 66.

S—*contd.*

Slavery—Detailed inquiry into the practice of indigenous slavery 32-40; 57-58.

Smith—General—5; the Maharaja's appreciation of his services to his family 60; 85.

T

Tanjore—Raja of—receives a deputation from Raja Pratapsinh 88.

Tarabai—her struggle for power referred to 29.

Tatya Abhyankar—18-19; 42.

Trimbakrao Ahirrao—excommunicated by Raja Pratapsinh 67.

U

Udaipur, Rana of—receives robes from Pratapsinh of Satara 87.

Umaji Naik—notorious Deccan robber—fights his guards and effects his escape 58; his raids near Wai 62; eluding the police 64.

V

Vithalpant Mahajani—his appointment as Diwan to the Maharaja 1; 2; 4; 5; 7; 9; 12; his monthly stipends 16; 20; 21; 24.

W

Wardin—79.

Warren, Mr.—43.

Wellington—Duke of—63.

William Chaplin—announces the Raja's installation 49.

Willoughby—113.

Y

Yashwantrao—his death 73.

Yashwantrao Sarsubhedar—42; 43.

Yashwantrao Shirke—reports to the Raja how his case was proceeding in England 109-111; 114.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ५११८
संदर्भ शाखा (स्थळ)

REFBK-0005117

REFBK-0005117

MO-I Bk Ca 21—17

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

Selections from the Peshwa Daftar

(Available at the Government Book Depot, Bombay, and other prominent booksellers in Bombay and outside)

Already Printed

No. of Volume.	Title of Volume.	Price.
No. 1.	Letters and Despatches relating to The Battle of Udgir, 1760	As. 13 or 1s. 4d.
No. 2.	Letters and Despatches relating to The Battle of Panipat, 1747–1761 ..	Rs. 2-3-0 or 4s.
No. 3.	Shahu's Campaign against the Sidis of Janjira, 1733–1736	Rs. 2-1-0 or 4s.
No. 4.	Reports about Anandibai, September 1786—October 1788	Re. 1-0-0 or 1s. 8d.
No. 5.	The League of the Barbhais ..	Re. 1-0-0 or 1s. 8d.
No. 6.	Ramraja's Struggle for Power ..	Rs. 2-2-0 or 4s.
No. 7.	Early Activities of Shahu and Balaji Vishvanath, 1707–1720	As. 8 or 10d.
No. 8.	Shahu in his Private Life	As. 9 or 11d.
No. 9.	Bajirao and his Family, 1720–1740 ..	As. 10 or 1s. 1d.
No. 10.	Early Strife between Bajirao and the Nizam	Re. 1-0-0 or 1s. 8d.
No. 11.	Shahu's relations with Sambhaji of Kolhapur	As. 10 or 1s. 1d.
No. 12.	The Dabhades and the Conquest of Gujarat	Re. 1-3-0 or 2s.
No. 13.	Bajirao's entry into Malwa and Bundelkhand	As. 10 or 1s. 1d.
No. 14.	Maratha Conquests in the North ..	As. 12 or 1s. 3d.
No. 15.	Bajirao's advance upon Delhi ..	Re. 1-3-0 or 2s.
No. 16.	The Bassein Campaign ..	Re. 1-8-0 or 2s. 6d.
No. 17.	Shahu and Bajirao—Administrative ..	Re. 1-9-0 or 2s. 9d.
No. 18.	Private Life of Shahu and the Peshwas..	Re. 1-4-0 or 2s. 3d.
No. 19.	Peshwa Madhavrao at cross purposes with his uncle Raghunathrao ..	Re. 1-7-0 or 2s. 6d.
No. 20.	The Bhonsles of Nagpur (1717–1774) ..	Rs. 3-4-0 or 5s. 9d.
No. 21.	Balajirao Peshwa and Events in the North, 1741–1761	Rs. 3-8-0 or 6s.
No. 22.	Extracts from the Peshwas' Diaries ..	Rs. 2-14-0 or 5s. 3d.
No. 23.	Balaji Bajirao—Administrative ..	Rs. 1-13-0 or 3s. 3d.
No. 24.	The Peshwas' Commitments on the West Coast	Rs. 4-2-0 or 7s.
No. 25.	Balaji Bajirao Peshwa and the Nizam (1740–1761)	Rs. 4-12-0 or 8s.
No. 26.	Tarabai and Sambhaji (1738–1761) ..	Rs. 3-10-0 or 6s. 3d.
No. 27.	Balajirao Peshwa and events in the North (1742–1761)—Supplementary ..	Rs. 5-8-0 or 9s.